गुरुवार, १२ जानेवारी २०२३

⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१४४

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६


# आधुनिक केसरी






● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 12 JANUARY 2023

adhunikkesari.com Adhunik Kesari

● YEAR-02 ● ISSUE-144 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-14 ● PRICE-5


# अडीच वर्षांत वसुलीचे उच्चांक

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महाविकास आघाडीवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती : महाविकास आघाडी सरकारच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात वसुलीचे उच्चांक गाठले गेले. ज्यावेळी 'वर्क फ्रॉम होम' ची सुविधा होती, त्यावेळी सरकारमधील काही मंत्री 'वर्क फ्रॉम जेल' असे कार्यरत होते, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी येथे केली.**



विधान परिषदेच्या अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातील भाजपचे उमेदवार डॉ. रणजित पाटील यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी येथील दसरा मैदानावर आयोजित संवाद सभेत ते बोलत होते. या सभेला भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार नवनीत राणा, डॉ. अनिल बोंडे, रामदास तडस, शिंदे गटाचे खासदार प्रतापराव जाधव, विभागातील भाजपचे आमदार उपस्थित होते. फडणवीस म्हणाले, महाविकास आघाडी सरकार हे अनैतिक सरकार होते. जनादेशाच्या विरोधात जाऊन ते स्थापन करण्यात आले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धाडस दाखवले. हिंदुत्वाचे आणि बाळासाहेब ठाकरे यांचे विचार दावणीला बांधणार नाही, असा इशारा देत त्यांनी आमच्या सोबत सरकार स्थापन केले आणि तुरुंगामधून चालणारा मंत्र्यांचा कारभार बंद झाला. आम्ही अमरावतीत उद्योग आणले, या ठिकाणी वस्त्रोद्योग संकुल उभे झाले. पण आता वेग वेगळ्या पक्षाचे लोक येथील गुंतवणूकदाराना, उद्योजकांना त्रास देण्याचे काम करीत आहेत, असा आरोप फडणवीस यांनी केला. या लोकांची नावे आपण घेणार नाही, पण ' ब्लॅकमेल ' करणाऱ्यांना धडा शिकवल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.महाविकास आघाडी सरकारने सातत्याने विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय करण्याचे काम केले आहे. गेल्या अडीच वर्षांच्या काळात या भागाला एक रुपया देखील मिळाला नाही, जो निधी सिंचन प्रकल्पांसाठी मिळाला, तोही केंद्र सरकारने दिला आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांची मुदत २०२० मध्ये संपली होती, पण महाविकास आघाडी सरकारने, विकास मंडळांची हत्या केली. आम्ही या वैधानिक विकास मंडळांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे. सोबतच नव्याने तयार झालेला अनुशेष मोजण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. आम्ही विदर्भाला न्याय मिळवून देऊ, असे फडणवीस म्हणाले.

**देवेंद्र फडणवीस हेच आमच्यासाठी मुख्यमंत्री**

देवेंद्र फडणवीस हेच आमच्या मनात आमच्यासाठी मुख्यमंत्री आहेत. तुम्हीच महाराष्ट्राचा विकास करू शकता असे खासदार नवनीत राणा म्हणाल्या आहेत. गोवा, गुजरात ज्या ज्या ठिकाणी देवेंद्र फडणवीस यांचे पाऊल पडले तिथे न्यायासाठी लढणारा व्यक्ती आपण पाहिला. त्यांच्या पाठिशी आपण सगळ्यांनी उभे राहिले पाहिजे. आपल्या सगळ्यांना माहित आहे की आपण उपमुख्यमंत्री आहात. पण ज्या प्रकारे तुमच्या कामाचा आवाका आहे आणि तुम्ही ज्या प्रकारे आमच्या सगळ्यांची कामे करता ते पाहून आमच्या मनात आम्हाला हेच वाटते की तुम्हीच आमचे मुख्यमंत्री आहात.




पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

पत्रकारांनी आपल्या महत्वाच्या फक्त पाच बातम्या, लेख, वृत्तलेख, अग्रलेख prabhugore@gmail.com या ईमेलवर पाठवावे.

अधिक माहितीसाठी

9075716739, 9822629833


# जॉन्सन अँड जॉन्सनला न्यायालयाचा दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उच्च न्यायालयाने जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीला दिलासा दिला आहे. या कंपनीविरोधात महाराष्ट्र सरकारने केलेली कारवाई अत्यंत कठोर आणि अन्यायकारक आहे असेही कोर्टाने म्हटले आहे. तसंच उच्च न्यायालयाने जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीला बेबी पावडरचं उत्पादन आणि विक्री करण्यास संमती दिली आहे. त्यांची विक्री आणि वितरण करण्याचा परवाना रद्द करण्याचे तीन आदेशही कोर्टाने रद्द केले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीला बेबी पावडरच्या उत्पादनाची निर्मिती, विक्री आणि वितरण हे करण्यासाठी संमती दिली आहे. न्यायमूर्ती गौतम पटेल आणि एसजी डिगे यांच्या खंडपीठासमोर कंपनीने १५ सप्टेंबर २०२२ च्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी केली होती. त्यानंतर त्यांचा परवाना रद्द करण्यात आला होता. तर २० सप्टेंबर २०२२ च्या दुसऱ्या आदेशात उत्पादन आणि विक्री थांबवण्याचा आदेश दिला होता. मात्र आता कोर्टाने कंपनीला दिलासा दिला आहे. या प्रकरणात कंपनीने मंत्री महोदयांकडेही अपील केले होते मात्र १९ ऑक्टोबर २०२२ ला ते फेटाळण्यात आले. महाराष्ट्र सरकारच्या अन्न आणि औषध प्रशासनाने जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीचा परवाना रद्द करून निर्मिती आणि विक्रीवर बंदी घातली होती. मुंबईतल्या मुलुंड येथे जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीचा कारखाना आहे. न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती एस. जी. ढगे खंडपीठाने महाराष्ट्र सरकारच्या अन्न आणि औषध प्रशासन विभागाने केलेली कारवाई न्याय सुसंगत नसल्याचं आणि योग्य नसल्याचे म्हटल आहे. बेबी पावडरचं उत्पादन निकृष्ट असल्याचा दावा करत कंपनीचा परवाना रद्द करण्याचे आदेश अन्न आणि औषध प्रशासन विभागाने सप्टेंबर २०२२ मध्ये काढले होते. त्याला कंपनीने हायकोर्टात आव्हान दिले होते.

# शिट्या-भोंगा वाजवा बिबट्याला पळवा

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यातील आपेगाव परिसरात मंगळवारी दुपारच्या वेळी बिबट्या दिसुन आला यांची माहिती प्रथमदर्शी बिबट्या पाहीला असलेल्या शेतकरी प्रविण औटे यांनी प्रत्यक्ष फोटो काढला व वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. बुधवार रोजी वनरक्षक राजु जाधव व सहकार्यांनी घटनास्थळी पाहणी करून ठसे आढळुन आल्याने, त्यावरून बिबट्याच असावा असा निष्कर्ष काढुन शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी व शेतात जाताना हातत काठी आणि शिट्ट्या व भोगा, फटाके वाजवत राहील्यास बिबट्या अथवा हिंस्र प्राण्यापासुन संरक्षण होवू शकते अशी माहिती दिली. शेतकऱ्यांना प्रविण औटे यांनी भोंगे व शिट्या वाटप करून प्राथमिक जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



# बीसीसीआय भाजपच्या 'हातातील खेळणे : राजा

आधुनिक केसरी न्यूज

**लाहोर :** पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे माजी अध्यक्ष रमीज राजा यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयवर गंभीर आरोप केले आहेत. भाजपचा प्रभाव असलेल्या मानसिकतेने बीसीसीआयचा ताबा घेतल्याचे त्यांनी म्हटले आहे. जिओ न्यूजनुसार, लाहोरमधील एका सरकारी महाविद्यालयात संबोधित करताना रमीज राजा म्हणाले की, आयसीसी बीसीसीवर प्रभाव टाकते कारण बहुतेक कमाई भारतातून येते. यासोबतच आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानवर बंदी घालण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे माजी अध्यक्ष रमीज राजा यांनी बीसीसीआयला 'हातातील खेळणे' असा आरोप करत भारतीय जनता पक्षावर निशाणा साधला आहे.

# त्र्यंबकेश्वर यात्रेसाठी यंदा पायी दिंडी सोहळे रंगणार

## अनेक ठिकाणांहून दिंड्यांचे त्र्यंबकेश्वरकडे प्रस्थान; महिला-तरुणांची विशेष उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

बंडू खडांगळे

लखमापूर : महाराष्ट्रातील तमाम वारकरी सांप्रदायाचे प्रमुख दैवत त्र्यंबकेश्वर येथील श्री संत निवृत्तीनाथ महाराज यांचा यात्रा उत्सव येत्या १८ जानेवारीला संपन्न होणार असुन महाराष्ट्रांतुन लाखो भाविक, व ग्रामीण भागातील अनेक भाविकांच्या पायी दिंड्या त्र्यंबक नगरीकडे प्रस्थान करीत असुन यंदा भाविकांच्या उत्सव व्दिगुणीत झाला आहे. मागील काही काळात कोरोना महामारीने रौद्र रुप धारण केले होते. त्यामुळे अनेक तीर्थक्षेत्रावरील विविध धार्मिक विधी वर, यात्रेवरी बंदीची कु-हाड कोसळली होती. त्यामुळे अनेक ठिकाणच्या यात्रा बंद पडल्या होत्या. परंतु यंदा मात्र सर्व धार्मिक क्षेत्रातील यात्रा सुरू झाल्याने प्रत्येक दिंडी चालक, दिंडीतील वारकरी, भाविक भक्त यांना वारी चालू झाल्याने आनंद मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणाहून हजारो दिंड्या या अनेक भक्तांच्या उपस्थितीत त्र्यंबक नगरीत येत असतात. कारण त्र्यंबकेश्वर येथील पौष वारी म्हणजे वारकरी सांप्रदायातील भाविक भक्तांची एकप्रकारे महापवर्णाच मानली जाते. यासाठी लाखो भाविक त्र्यंबकेश्वर येथे येऊन श्री संत निवृत्तीनाथ महाराजांच्या चरणी लीन होत असतात.






यंदाच्या अनेक ठिकाणाहून व तीर्थक्षेत्रातून हजारो दिंड्या विविध अधिकारी व्यक्तीच्या नेतृत्वाखाली दिंड्याचे नियोजन करून त्र्यंबकेश्वर कडे प्रस्थान करीत असतात. यासाठी नामांकित गायक, वादक, टाळकरी इ.उपस्थिती मोठ्या प्रमाणावर असते. विश्वाचा तो गुरु, स्वामी निवृत्ती दातारू यासाठी श्री पांडुरंग परमात्मा, ज्ञानोबा, तुकोबांच्या नामाचा जयघोष करीत दिंड्या त्र्यंबक नगरीकडे येत आहे. यंदाच्या दिंड्यामधील प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे प्रत्येक दिंडी चालक यांनी भाविक भक्तांच्या अनमोल सहकार्याने सुसज्ज असे पालखी रथ तयार करून सर्वाचे आकर्षन निर्माण केले आहे.


प्रत्येक दिंडी मध्ये ५० ते १५०० पर्यंत भाविक भक्त पायी चालत असतात. त्यासाठी नियोजन करून भोजन व्यवस्था, मुक्काम व्यवस्था, भजन, किर्तन, भारूड, गौळणी, इ. कार्यक्रमाचे महत्त्वपूर्ण नियोजन केले जात असत. सध्या बोराळे, बहादुरी, हुन निष्काम कर्मयोगी जिवनेश्वर संत काळुबाबा, खेडगाव, शिंदवड, विखारा पहाड, विजय नगर, अवनखेड, तसेच दिंडोरी तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील अनेक दिंड्या या स्वामी नवनाथ महाराज शेलार, रमाकांत महाराज डोखळे, अशोक महाराज वैद्य, बंडा महाराज लखमापुरकर, युवराज महाराज दळवी, रामकृष्ण महाराज पिंपरखेड, कृष्णा महाराज जोपळे, मनु महाराज, माणिक महाराज शिवारपाडा, काळेबाबा विजयनगर इ. कीर्तनकार दिंडीसोबत चालत असतात.

यंदा प्रत्येक दिंडीमध्ये भव्य दिव्य रथ, चोपदार, तुळसधारी महिला, वासुदेव, इ.मुळे दिंड्याचे जनतेच्या मनातील आकर्षण निर्माण झाले आहे. प्रत्येक दिंडीत नियोजन, हे परिपूर्ण अवस्थेतमध्ये तयार केलेले असते. यंदा सर्वच भाविक मोठ्या प्रमाणावर दिंडीत सहभागी झाल्याने यंदा दिंड्यामधील भाविकांची संख्या उंचावत असुन यंदा त्र्यंबक नगरी ही विविध दिंड्या, असंख्य भाविक भक्तांनी उजळून निघणार आहे. व आम्ही समस्त वारकरी या पौष महावारी पवर्णासाठी सज्ज झालो आहे.

**-हभप भागवताचार्य स्वामी नवनाथ महाराज शेलार.**

( जिवनेश्वर काळुबाबा दिंडी चालक बोराळे, बहादुरी क्षेत्र )



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# कवितांच्या गावा जावे...


आधुनिक केसरी

अशा वेळी मातीशी आपली नाळ घट्ट जोडलेली असली की पाय जमिनीवर राहतात, विचारातूनच उत्तर मिळतं. म्हणून विंदा म्हणतात, ' रक्तामधल्या प्रश्नांसाठी पृथ्वीकडून होकार घ्यावे. उसळलेला दर्या कधी कधी आपल्याला त्याच्या रौद्र रूपाने भयचकित करतो, पण ती भव्यता त्याच्याकडून घ्यावी. ' भरलेल्या भीमेकडून तुकोबांची माळ घ्यावी...' किती सुंदर ओळी ! इथे कवितेला अध्यात्माचा स्पर्श होतो. कारण जीवनामध्ये तेही आवश्यक आहे. कवितेच्या शेवटच्या ओळी तर कवितेला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवतात. आपली प्रवृत्ती नेहमी घ्यायची असते. आपल्या हातांना नेहमीच घ्यायची सवय लागलेली असते. ती प्रक्रिया उलट सुद्धा झाली पाहिजे म्हणजेच घेणाऱ्या हातांना द्यायची पण सवय लागली पाहिजे. म्हणून ' घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे...' ही विंदांची कविता पाहिल्यानंतर



मला आणखी एका कवितेची आठवण झाली. विंदा या कवितेत आपल्याला कोणाकडून काय घ्यायचे ते सांगतात तर ही दुसरी कविता आपल्याला ' कोणी काय द्यायचे ' ते सांगते. ही सुंदर कविता आहे दत्ता हलसगीकरांची. अप्रतिम कविता आहे. या कवितेची २२ भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत. दत्ता हलसगीकरांच्या शब्दात सांगायचे तर ही त्यांची ' भाग्यवती कविता ' आहे.

रायगड जिल्ह्यातल्या जांभुळपाडा या गावी अनाथ विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह चालवण्यात येत होते. या आश्रमातील मुलांच्या मदतीसाठी तेथील कल्पक संचालकांनी ही कविता मोठ्या अक्षरात तेथे लावली. येणाऱ्या जाणाऱ्यांचे लक्ष ही कविता वेधून घेत होती. या कवितेत कवीने केलेले आवाहन वाचकांच्या काळजाला हात घालत होते. नंतर या आश्रमाला देणग्यांचा ओघ सुरु झाला. अनाथ मुलांची सोय झाली. ही कविता अतिशय प्रसिद्ध आहे. आपल्यापैकी अनेकांनी ती वाचली, ऐकली असेल. तरी आपण तिच्या पुनर्प्रत्ययाचा आनंद घेऊ या... या कवितेचं नाव आहे ' उंची ' **क्रमशः**



## आनंदी पहाट

# व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तीचे अंतर्बाह्य स्वरूप

आधुनिक केसरी

व्यक्तित्व म्हणजे वेगळं, निराळं अस्तित्व असलेली व्यक्ती. प्रत्येकास जन्मतः स्वतःचं असं व्यक्तित्व असतंच. या व्यक्तित्वावर सामाजिक परिस्थितीचा प्रभाव पडल्यावर व्यक्तित्वाचं व्यक्तिमत्वात रुपांतर होत असतं. एखाद्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्ती जशी आहे तशी, म्हणजे व्यक्तीची शारीरिक ठेवण, बुद्धी, चारित्र्य, कर्तृत्व, गुण आदींचा समावेश त्यात होतो. व्यक्तीचा शारीरिक, भावनिक आणि सामाजिक विकास होत असतो. ह्या विकासातून तिचा पिंड घडत असतो. व्यक्तीचा हा घडलेला पिंड म्हणजे त्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व असतं. इंग्रजीत पर्सनेलिटी ही संज्ञा व्यक्तिमत्वास वापरतात. पर्सोना या शब्दापासून पर्सनेलिटी हा शब्द तयार झाला. पर्सोना म्हणजे मुखवटा; रोमन काळात नट तोंडावर मुखवटा घालून बोलत असत; अर्थातच जसं पात्र तसा मुखवटा. जसा मुखवटा तसा आवाज आणि भाषण. त्यामुळेच व्यक्तिमत्व म्हणजे बाह्य दर्शन असा अर्थ घेतला जात असतो. व्यक्तिमत्वाचा हा अर्थ एकांगी असल्याचं म्हंटलं तर निश्चितच वावगं ठरणार नाही. ह्यामध्ये व्यक्तीच्या स्वभाव वैशिष्ट्यांचा, बुद्धीचा, भावनांचा, गुणांचा आणि वृत्तीचा अंतर्भाव होत नसल्याचं स्पष्ट होतं. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते. त्यामुळे ही व्याख्या परिपूर्ण होऊ शकत नाही. व्यक्तिमत्वात व्यक्तीची शरीरयष्टी, चेहरेपट्टी, ठेवण, बांधा, त्याची बुध्दिकौशाल्ये, क्षमता, अभिरुची, आवडनिवड, संपादित गुण इत्यादी बाबींचा प्राधान्यक्रमानुसार साकल्यानं विचार केला पाहिजे. ह्या सर्वांची व्यक्तीच्या जैविक देणगीपासून व्यक्तिजीवन जगण्यापर्यन्त झालेली वाटचाल म्हणजे व्यक्तिमत्व, असं म्हणल्यास ते व्यक्तिमत्वाच्या व्याख्येच्या दृष्टीकोनातून योग्य ठरू शकतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### तोचि प्रिय भक्त

होता कार्य सिध्दी | सुख ओसंडते ||
जळोनिया जाते | दुःख सारे.||१||
सत्कार्याचे फळ | पुण्याचा संचय ||
पापाचा तो क्षय | होत असे.||२||
जरी गरीबीचा | फाटका संसार ||
नेकीचा व्यवहार | सुख देई.||३||
नको भुलु राजा | ऐहिक सुखाला ||
अंती सोबतीला | कोणी नसे.||४||
परमार्थ करूनी | व्हावे ताप मुक्त ||
तोचि प्रिय भक्त | ईश्वराला.||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**नका हो, तुमच्या अपयशाचे खापर अन्य कोणावर फोडू नका. यामुळे तुम्ही फक्त स्वतःसच फसवत आहात. कमतरता शोधा, कामाला लागा. क्षमता वाढवा.**

**सौंदर्य आणि आनंद यांचा संबंध नैसर्गिक आहे. जे आनंददायी नाही ते सुंदर असू शकत नाही.**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

**अणू एक परकाश में, सर्व ज्योति परकाश । तेज रासि द्युति क्या भनो, गणितातीत प्रकाश ।।७४। (स्वर्वेद पंचम मंडल अष्टम अध्याय) ०५/०८/७४**


**मराठी अनुवाद :** त्याच्या म्हणजेच परमेश्वराच्या अणू मात्र प्रकाशात भौतिक समस्त ज्योतींचा (प्रकाशांचा) प्रकाश आहे. त्याच्या तेज राशीच्या प्रभेचे वर्णन कसे करता येईल, कारण त्याच्या प्रकाशाच्या तुलनेत भौतिक प्रकाशांची गणना काहीच नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## काव्य-चरितावली



पुष्प ९वे

आधुनिक केसरी

**रोजच्या दिनक्रमाला श्रीमहाराज कंटाळले**
**घरी, गोंदवल्यात राहूनही ते बेचैनसे राहिले**
**वागण्यात त्यांच्या बराच फरक तो पडला**
**प्रहरी रात्रीच्या ते ध्यानात फार राहू लागले ।।**
**पाहुनी हे रावजी-गीतामाईंनी विचार केला**
**लावून देऊ लग्न नातवाचे निर्धार ही झाला**
**मोठ्या थाटात श्रीमहाराजांचे लग्न लावले**
**नव्या जोडीला घेऊन रावजी पंढरीला गेले ।।**
**श्रीमहाराजांच्या जीवनात पंत आजोबांचे**
**स्थान मोठे भावनिक महत्वाचे हो आहे**
**आजारी आजी राधाबाईंच्या पाठोपाठच**
**पंतांनीही देह ठेवणे अतिशय दुःखाचे आहे ।।**
**पंत रावजी खरे गोंदवले -भूषणच होते**
**यांच्या सहवासात श्रीमहाराज हो घडले**
**पंत आजोबांच्या भावभक्ती,सद्गुणांचे**
**श्रीमहाराजाकडून सदा आचरण घडले ।।**
**म्हणे अरुणदास -श्रीसद्गुरूची कृपा आहे**
**लेखनात मज नित्य भास होतो आहे ।।**




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# नाम हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन

आधुनिक केसरी

संसारातील सार । आपला करावा रघुवीर ॥ कलि अत्यंत मातला। नीतिकर्तव्याचा विसर पडला ॥ अनाचार होतसे फार । आता नाही रामावाचून दुजा ठाव ॥ चोराने घरफोड केले । मग जागृतीचे कारण नाही उरले ॥ म्हणून असावी सावधान वृत्ति । अखंड राखावी भगवंताची स्मृति॥ भगवंतासी अनन्य होता । दुःखाची नाही तेथे वार्ता ॥ अभिमानवृत्ति सोडावी बरी । त्यास घडे रामसेवा खरी ॥ सरे मीपणाची उरी। ब्रह्मरूप दिसे चराचरी ॥ म्हणून ज्याने जन्माला घातले । ज्याने आजवर रक्षण केले ॥ तो माझा धनी हे ठेवून चित्ती । भावे भजावा रघुपति ॥ रामाचे व्हावे आपण । राम जोडावा आपण ॥ हेच जन्माचे । प्रपंचाचे, मुख्य कारण ॥ म्हणून रामाविण न मानी कोणी त्राता । धन्य त्याची माता पिता ॥ प्रपंच तसा परमात्म्यावाचून। हे जसे अलंकार सौभाग्यावाचून ॥ अलंकार सर्व घातले । पण सौभाग्यतिलक न लावले । तैसे रामाविण राहणे । आहे खरे ॥ ऐहिक आणि पारमार्थिक । न जाणावे एकाहून एक परते ॥ ऐहिक आणि पारमार्थिक सुख। रामावाचून नाही देख ॥ म्हणून शुद्ध असावे आचरण । तसेच असावे अंतःकरण । त्यात भगवंताचे स्मरण । हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ॥ रामचरणावर ठेवावा विश्वास । हेच परमार्थाचे भांडवल खास ॥ ऐहिक वागण्यात रामाचे



स्मरण । हीच परमार्थाची खरी शिकवण ॥ माझे हित भगवंताचे हाती । हीच ठेवावी मनाची प्रवृत्ति॥ राम कर्ता ही असावी भावना । तो जे करील ते आपल्या हिताचे जाणा ॥ भाव ठेवावा रामापायी। पण व्यवहार चुकू न देई ॥ परमात्म्याचे राखणे अनुसंधान । हाच परमार्थाचा मुख्य मार्ग जाण ॥ बाह्यांगाने करावी प्रपंचाची संगति । चित्ती असावा एक रघुपति ॥ प्रयत्न करणे आपल्या हाती। यश देणे भगवंताचे हाती ॥ प्रयत्नाला न पाहावे पुढे मागे । परि परमात्मा उभा आहे मागे। ही ठेवावी जाणीव मनामध्ये ॥ प्रपंचात दक्षतेने वागत जावे । धीर सोडू नये । भगवंताचे आधारावर निभ्रांत असावे ॥ सर्व कामधंदा घरी करी । पण चित्त लेकरांवरी । ऐसे जैसे करी जननी जाण। तैसे वागावे आपण । काया गुंतवावी प्रपंचात । मन असावे रघुनाथात । नीतिधर्माचे आचरण । पवित्र असावे अंतःकरण । त्यात कर्तव्याची जोड पूर्ण । त्या सर्वात राखता आले अनुसंधान । तर याविण दुजा परमार्थ नाही जाण ॥ व्यवहार उत्तम प्रकारचा केला । पण परमात्मा विसरला । तो व्यवहार दुःखच देता झाला ॥

**आजचे बोधवचन आहे - १०. जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.**

## हरिपाठ

आधुनिक केसरी

सायुज्यमुक्ती ही केवळ शाश्वत असते, हे जाणून घ्यावे.}
"निर्गुणीं अनन्य असतां । तेणें होये सायोज्यता ।सायोज्यता म्हणिजे स्वरूपता- । निर्गुण भक्ती ॥ ३० ॥" {निर्गुण परमात्म्याशी अनन्य असणे हीच सायुज्यता होय. सायुज्यता म्हणजे स्वस्वरूपता. तिलाच निर्गुण भक्ती म्हणतात.}

# तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी घेतली पीरबावडा आरोग्य उपकेंद्रातील रिक्त पदांची दखल


आधुनिक केसरी न्यूज

**बाबासाहेब बोकील**

**पीरबावडा :** पीरबावडा येथील आरोग्य उपकेंद्रामध्ये चार पदे रिक्त असून एक कर्मचारी येथे असताना येत नाही. यामुळे अनेकदा उपकेंद्र बंद राहत असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे. याविषयी पीरबावडा येथील सरपंच डॉ. सारंग पा. गाडेकर यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांच्याशी बोलून सदरील रिक्त पदे तात्काळ भरण्यासाठी सूचना केल्या तसेच दै.आधुनिक केसरीने या विषयी वृत्त प्रकाशिकत करून वाचा फोडली होती. या सर्व प्रकरणाची दखल घेत तालुका अरोग्य अधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पत्राद्वारे सदरील पदे भरण्यासाठी विनंती करणारे पत्र दिले आहे.


आधुनिक केसरी
अपूर्ण कर्मचाऱ्यांमुळे पीरबावडा येथील उपकेंद्र बंद
परिसरातील रुग्णांचे हाल; तीन पदे रिक्त

आधुनिक केसरी IMPACT


महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय आरोग्य अभियान
तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, फुलंब्री
आरोग्य सेवा



# यंत्रणांचा गैरवापर करून बदनाम करण्याचा प्रयत्न : जयंत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विरोधी पक्षात जे ठामपणे उभे राहतात आणि सरकारला विरोध करतात त्यांच्याविरोधात सर्व यंत्रणांचा गैरवापर करून त्यांना बदनाम व नामोहरम करण्याचा प्रयत्न काही लोक करत आहेत असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री हसन मुश्रीफ यांच्या घरांवर ईडीचे छापे पडल्यानंतर जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे. हसन मुश्रीफ यांच्या घरावर याअगोदरही आयकर विभागाने धाडी टाकल्या होत्या मात्र त्यामध्ये काहीच सापडले नाही परंतु आता ईडीने धाड टाकली आहे असे समजते असेही जयंत पाटील म्हणाले.



# वसंत मुंडे यांना ज्ञानदेव मोहेकर राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज


**कळंब :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा कळंब (जि.उस्मानाबाद) तालुका पत्रकार संघाने मंगळवार दिनांक १०जानेवारी २०२३ रोजी यावर्षीचा कै.शि.म. ज्ञानदेव मोहेकर राज्यस्तरीय पत्रकारीता पुरस्कार देऊन गौरव केला.यावेळी जेष्ठ पत्रकार राजकिय विश्लेषक अभय देशपांडे, मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, विधिमंडळ मंत्रालय वार्ताहर संघाचे अध्यक्ष मंदार पारकर,वृतनिवेदीका निकीता पाटील, प्रदीप नंणदकर, पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक शिंदे, प्रमुख सतिश टोणगे आदी उपस्थित होते. तब्बल चोवीस वर्षां पासून पुरस्काराची परंपरा चालू आहे.

# सहकार चळवळ मोडीत काढण्यासाठीच भाजपाकडून विरोधकांवर ईडीचे छापे

## अतुल लोंढे यांचा भाजपवर आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माजी मंत्री हसन मुश्रीफ यांच्यांशी संबंधित ठिकाणांवर ईडीने छापे मारले यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही. भारतीय जनता पक्ष हा सीबीआय, आयकर, ईडी सारख्या तपास यंत्रणांचा विरोधी पक्षांना नाहक त्रास देण्यासाठीच गैरवापर करत असल्याचे देशाने पाहिले आहे. ईडीची आजची छापेमारी ही त्याचाच एक भाग असून सहकार चळवळ मोडीत काढण्यासाठी भारतीय जनता पक्षाचा हा डाव आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे नाही केला आहे. यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे पुढे म्हणाले की, बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी उभारलेली सहकार चळवळ मोडीत काढण्याचा चंगच भारतीय जनता पक्षाने बांधला आहे. त्यासाठी केंद्रात स्वतंत्र सहकार खाते निर्माण केले. राज्यात ईडी, सीबीआयसाठी सुपारी घेऊन काम करणारे भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या त्यासाठी एजंटचे काम करत आहेत. विरोधी पक्षांच्याच साखर कारखान्यांवर ईडीचे छापे का पडतात? भाजपा नेत्यांच्या कारखान्यांवर हे छापे का पडत नाहीत? नोटबंदीमध्ये सहकारी बँकेतील पैसे घेण्यास रिझर्व्ह बँकेने नकार का दिला होता ? भाजपाच्या काही नेत्यांनी सहकारी साखर कारखाने उभारले पण ते त्यांना चालवता आले नाहीत.



पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा सहकाराच्या माध्यमातून समृद्ध झालेला आहे. सहकारी संस्थांवर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व आहे, हे वर्चस्व मोडून काढण्यासाठी सहकारी संस्था व त्यांच्याशी संबंधित लोकांना त्रास दिला जात आहे. या कारवाईसाठी देण्यात आलेली कारणेही हास्यास्पद आहेत. अनुभव नसलेल्यांना कारखाने चालवण्यास दिले असे त्यांचे कारण आहे. असे असेल तर मग देशाच्या संरक्षणाशी संबंधित राफेलच्या देखभालीचे कंत्राट उद्योगपती अनिल अंबानी यांना कागदाचे विमानही बनवण्याचा अनुभव नसताना कसे दिले? सोमय्या यांनी आतापर्यंत ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले आणि नंतर हेच नेते भाजपात गेले त्यावर सोमय्या काहीच का बोलत नाहीत? भाजपात गेल्यावर हेच भ्रष्ट नेते पवित्र होतात का? हा खेळ आता जनतेच्या चांगलाच लक्षात आला आहे, असेही लोंढे म्हणाले.

# सत्तार व इतर मंत्र्यांविरोधात याचिका दाखल करणारच

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात पाऊण लाख



कोटींच्या अर्थसंकल्पीय घोषणा सरकारने केल्या. पण त्यासाठी नियोजन शून्य आहे. मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेट मधील मंत्री आमदारांना खूश करण्यासाठी घोषणा केल्या आहेत, असा आरोप विरोधीपक्ष नेते अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत केला. शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीचे उमेदवार विक्रम काळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ते औरंगाबादेत आले होते. त्यानिमित्त त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. शिंदे -फडणवीस सरकारमधील चार मंत्र्यांच्या विरोधात महाविकास आघाडीने पुराव्यासहित भानगडी बाहेर काढल्या होत्या. पण सरकार त्या भ्रष्टमंत्र्यांच्या बाबतीत फारसे गंभीर नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अब्दुल सत्तार व इतर तिन्ही मंत्र्यांच्या भ्रष्टाचार प्रकरणी जनहित याचिका दाखल होणारच आहेत असे अजित पवार म्हणाले. हसन मुश्रीफ यांच्यावर झालेल्या ईडीच्या कारवाई संदर्भात मुश्रीफ यांचा आपल्याला फोन आला नाही. पण सरकार यंत्रणांचा चुकीच्या पध्दतीने वापर करत असल्याचे अजित पवार म्हणाले. अनिल देशमुख, संजय राऊत, नवाब मलिक या मंत्र्यांना बेकायदेशीररित्या अटक करण्यात आली होती. जनतेमधे संभ्रम निर्माण करण्यातच सरकार यशस्वी झाल्याचे पवार म्हणाले. राज्याचे नुकसान करणारे निर्णय का घेतले जात आहेत. याबाबत कोणीही खुलासा करत नाहीत. दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सरकार विरोधी बोलणे टाळले. सरकारमधील नाराज आमदारांची धुसफुस या प्रकरणी बोलताना ते म्हणाले की, पत्रकार काही दुधखुळे नाहीत उगुच माझ्या तोंडून काही वदवून घेण्यापेक्षा बहुमत आहे तोपर्यंत सरकार चालेल, असे पवारांनी पत्रकारांना ठणकावले.



# मसलेकरांची कविता बुद्धाच्या करूणेशी नातं सांगणारी

## प्रो.डॉ. मनोहर सिरसाट यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** अशोक मसलेकर यांच्या सामाजिक, राजकीय,विद्रोही अर्थात "साराvि" या काव्यसंग्रहाचा एकूण प्रपंच हा तथागतांच्या विचाराशी नातं जोडणारा आहे.स्वातंत्र्य',समता' व बंधुता या मूलभूत तत्वाशी या कविता जोडल्या गेल्या आहेत. सामाजिक', राजकीय आणि धार्मिक गोष्टीवर चालत आलेल्या अवडंबरी थोतांडावर त्यांनी प्रकर्षाने प्रहार केलेला आहे. अभिसंधान प्रकाशनाकडून प्रकाशित कवी अशोक मसलेकर यांच्या साराvि या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभात भाष्य करतांना बलभीम महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रो.डॉ. मनोहर सिरसाट बोलत होते. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे हे होते. यावेळी पुढे बोलतांना प्रो. सिरसाट म्हणाले की' या काव्यसंग्रहातील कविता विचार देणाऱ्या असून कमी शब्दात खूप काही अर्थबोध देऊन जातात. सामाजिक' राजकीय' धार्मिक या विकृतीवर प्रहार करतात व बाबासाहेबांचा शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्रही अनेक कवितांमधून प्रतिबिंबित होतो. कवी अशोक मसलेकर यांनी आपल्या कवितांमधून सर्वसामान्य लोकांना समजतील अशी रचना केलेली आहे.

देश स्वतंत्र होऊन 75 उलटली तरी आपल्या देशाला सज्जन राष्ट्रहित जपणारा 'आय ॲम इंडियन फर्स्ट अँड इंडियन लास्ट' म्हणू शकणारा बाबासाहेबांसारखा बुद्धिमान चारित्र्यसंपन्न, समदृष्टीवान, संयमी, विवेकी, कारुण्याने अंतकरण भरलेला मनुष्य निर्माण करण्यात आपणास अपयश आल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. शिक्षित, तंत्रविकसित मनुष्य चिडून बंदूक पिस्तूल क्षेपणास्त्रांचा वापर करू लागतो. परंतु विवेकी मनुष्य या निगरगठ्ठ व्यवस्थेला शब्दांचेच सुरुंग लावतो. जसे आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने शब्दांचीच शस्त्रे यत्न करू' असा तुकोबांचा वारसा चालवणारे सज्जन शब्दांनाच धार लावून आक्रमण करतात, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करतांना प्रा.प्रदीप रोडे म्हणाले की, कवी मसलेकर यांची कविता प्रबोधनाची आहे. या प्रकाशन समारंभाप्रसंगी उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम पवार, नगरसेवक विनोद मुळूक, सरस्वती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष उत्तमराव पवार, कवी प्रा.डॉ. संजय कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नितीशकुमारांची समाधान यात्रा

आधुनिक केसरी

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे त्यांच्या समाधान यात्रेदरम्यान सोमवारी सारण जिल्ह्यातील दरियापूर विभागातील भैरौपूर गावात पोहचले होते. विषारी दारूमुळे प्रभावित असलेल्या भागातील या गावाती एक मोठ्या मार्गावर बॅरिकेड्स लावण्यासोबतच मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोसबस्त तैनात करण्यात आलेला होता. नितीश कुमार हे या ठिकाणी एका फुटवेअर युनिटची पाहणी करण्यासाठी आले होते. त्यांच्या मागील दौऱ्यांप्रमाणे यावेळी कोणतीही सार्वजनिक रॅली किंवा जनतेशी संवाद नियोजित नव्हता. यावेळी कार्यक्रमस्थळी उपस्थित काही लोक पोलिसांशी धक्काबुक्की करतनाही दिसले. पोलिसांना या सर्वांना रोखले होते, त्यामुळे ते नाराज होते. मुख्यमंत्री नितीश कुमार हे ५ जानेवारीपासून आपल्या समाधान यात्रेवर निघाले आहेत. नितीश कुमार हे चंपारण, सीतामढी, शिवहर, वैशाली आणि सीवान असा प्रवास करत सारण येथे पोहचले होते. त्यांच्या यात्रेचा चालू टप्पा १८ जिल्ह्यांमधून जाऊन २९ जानेवारी रोजी संपणार आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांची सारण यात्रा यासाठी महत्त्वपूर्ण होती, कारण जिल्ह्यात अशातच बिहारमधील आतापर्यंतची सर्वात वाईट विषारी दारूकांडाची घटना घडली होती. दरियापूर येथून फारतर २५ ते ३० किलोमीटर अंतरावरील मशरख, अमनौर आणि इस्सुआपुर या गावांमधील अनेक जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. आसापास उभा राहिलेल्या अनेकांमध्ये दबक्या आवाजात चर्चा सुरू असल्याचे दिसले. कारण, पोलीस बंदोबस्त कडेकोट होता. दरम्यान एका वयस्कर व्यक्तीने म्हटलेच की, असे वाटतंय प्रत्येक व्यक्तीवर एक पोलीस नेमण्यात आला आहे. नितीश कुमार यांच्यासह उपमुख्यमंत्री तेजस्वी प्रसाद यादव, अर्थमंत्री विजय कुमार चौधरी आणि अनेक मोठे अधिकारी व पोलीस जेव्हा बूट बनवण्याच्या कारखान्यावर पोहचले तेव्हा तिथे भारताचा पंतप्रधान कसा असावा, नितीश कुमार यांच्यासारखा असावा. अशी घोषणाबाजी सुरू झाली. खरंतर नितीश कुमारांना भेटून त्यांच्यासमोर समस्या मांडण्याची अनेकांची इच्छा होती. मात्र, कार्यक्रस्थळी केवळ अगोदर ज्यांनी पास घेतलेला होता, त्यांनाच प्रवेश देण्यात आला होता. यानंतर केवेळ अर्धा तासांतच नितीश कुमार कार्यक्रमस्थळावरून निघूनही गेले. यामुळे नाराज झालेले लोक आपसात बोलत आल्या पावली परत फिरले.

# भारतीय विज्ञान काँग्रेस अधिवेशनाने काय साधले ?



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**एरवी मराठी साहित्य संमेलनाने काय साधले असा प्रश्न विचारला जातो. आता दरवर्षी होणाऱ्या भारतीय विज्ञान काँग्रेसचे फलित काय हे तपासण्याची वेळ आली आहे. वृत्तपत्रातील या संबंधीच्या बातम्याच बोलक्या आहेत. जसे साहित्य संमेलनात व्यासपीठावर साहित्यिक कमी अन् राजकारणी जास्त असतात, तेच या विज्ञान काँग्रेस बद्दल झाले आहे. सरकार मधील मंत्री कितीही ज्येष्ठ, श्रेष्ठ असले तरी विज्ञानाच्या बाबतीत ते काय बोलणार, मार्गदर्शन करणार? पहिल्या दिवसाची भाषणे बघता,हे मंत्री असे म्हणाले, ते मंत्री तसे बोलले, अशाच प्रकारची होती.**

वैज्ञानिकांना जणू काही भावच नव्हता.त्यांच्या बोलण्याला जणू महत्व नव्हते! कोणत्याही प्रश्नावर घाईने मत व्यक्त न करता आम्ही तपासू, विचार करू,अभ्यास करू मगच काही निष्कर्ष काढू,असा वैज्ञानिकांचा अप्रोच असतो.आजकाल मंत्री देखील कोणताही प्रश्न विचारला की अशीच भाषा बोलतात! अभ्यास चालू आहे,तपास चालू आहे..वगैरे.. म्हणून तर त्यांनाही वैज्ञानिक मानून हा बदल संयोजकांनी केला नाही ना?असो.

महिला वैज्ञानिकांच्या सेशन मध्ये तर हळदी कुंकू,अन् संक्रांती आधीच वाण दिल्याचे छापून आले. हा तर कहरच झाला! प्रसंग काय,चर्चा कसची, अन् आपली कृती काय? कशाचा कशाला मेळ नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन सर्वकष पद्धतीने वाढविणे, नव्या शोधावर चर्चा करणे,पुढील संशोधनाची दिशा ठरविणे,वैज्ञानिकांच्या समस्या,त्यांना मिळणारे अपुरे अनुदान,आधुनिक तंत्रज्ञान,उपकरणे यांचा अभाव,शाळेतील अभ्यासक्रमात आधुनिक विज्ञानाचा अंतर्भाव,अवती भवती च्या समस्यांवर उपाय शोधण्याची गरज..हे सारे मुद्दे खरे तर चर्चेस यायला हवे.जेवणाची गैरसोय, निवास व्यवस्था नीट नसणे हे मुद्दे मग दुय्यम ठरतात.पण तेही नाही हेही नाही असे नकारात्मक वातावरण असल्याने चर्चा तरी कशाची होणार ही प्रश्न आहे. आजचे विज्ञान एकांगी राहिलेले नाही. त्यात प्रगती साठी विविध विषयांचा एकत्र अभ्यास गरजेचा असतो.म्हणूनच मूळ फिजिक्स चीत पदवी घेतलेल्या ला केमेस्ट्री त नोबेल पुरस्कार मिळतो.ते प्राध्यापक बायोकेमेस्त्री शिकवतात. अन् बायो टेक्नॉलॉजी त मार्गदर्शन करतात! असा आंतर शाखीय दृष्टिकोन ही काळाची गरज आहे.शेतकऱ्याचे,शेती संबंधी चे प्रधनी सोडवायचे तर रासायनिक खते,जमिनीचा ,भुगर्भाचा अभ्यास, पर्यावरणाचा अभ्यास,शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास,शिवाय त्या भागातील सामाजिक,आर्थिक परिस्थिती चा अभ्यास..हे सारे एकत्रित विचार करण्याचे विषय आहेत. पण आपली एकूणच अभ्यासाची,संशोधनाची कार्य पद्धती ही भिंती उभ्या करणारी आहे. जेव्हा की पूल बांधण्यावर भर देण्याची गरज आहे. आपण भारत हा शेती प्रधान देश आहे असे मुलांना शिकवतो.पण गेल्या काही दशकांत गावा कडून शहरांकडे वाढलेले लोंढे बघितले की वेगळेच चित्र दिसते.पूर्वी शेती आवडीने केली जायची. त्यात जीव ओतला जायचा.आता तोच जीव फाशीला टांगला जातोय. शेतकऱ्याचा मुलगा म्हणून लग्न होत नाही ही सामाजिक समस्या वेगळीच! कुणाला हे विषयांतर वाटेल. पण ते तसे नाही.शेती क्षेत्राला विज्ञान तंत्रज्ञानाची जोड मिळाली तर हे चित्र बदलू शकते. शेवटी कुणालाही काय हवे असते, तर कामातला आनंद,अन् अर्थातच भरघोस उत्पन्न.आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान वापरून ,शेती अन् त्याला सुसंगत उद्योग गावातच वाढीला लागले तर मुलं गावातून शहराकडे जाणार नाहीत.उलट ग्रामोद्योग वाढले तर गावखेडी देखील समृध्छत,श्रीमंत होतील. यावर चर्चा व्हायला नको का? तशी चर्चा झाली असेल तर त्याचे फलित काय? कारण अशा काँग्रेस मध्ये फक्त चर्चा करून सोडायचे नसते. तर काही वैज्ञानिकांनी, संघटनांनी मिळून त्याचा पाठपुरावा(फॉलो अप) करायचा असतो.ते काम शेवटास न्यायचे असते.




आपल्या वेद पुराणात काय लिहून ठेवले आहे, आपण आधी पासून सर्वच क्षेत्रात किती प्रगत होतो, सगळे महत्वाचे शोध आपणच कसे लावले यार बढाया मारणे सतत बंद केले पाहिजे.जर आपल्याकडे सर्व शोध लागले आहेत तर मग सर्वच क्षेत्रात आपल्याला इतर देशांवर का अवलंबून राहावे लागते? आपण परम संगणक तयार केलाय तर सारे संगणक आपण आयात का करतो? कोणती आय आय टी,कोणती सी एस आय आर ल्याब किंवा डिफेन्स ल्यान भारतीय बनावटीचे संगणक, इन्स्ट्रुमेंट, इकविपमेंट वापरते? ही आयात थांबविण्यासाठी कोणती पावले उचलायला हवी? ही चर्चा विज्ञान काँग्रेस मध्ये झाली का? झाली असेल तर त्याचे फलित काय? सरकार दरबारी योग्य ती पावले उचलायला कुणी समिती पाठपुरावा करते का? सरकार वैज्ञानिकां साठी पुरेसा निधी उपलब्ध करत नसेल तर हे संमेलन,ही काँग्रेस त्यांना जाब विचारते का? कारण व्यासपीठावर सरकारी निर्णय घेणाऱ्या मंत्र्याचीच गर्दी असते म्हणून हा प्रश्न.

अशा संमेलनासाठी,विज्ञान काँग्रेस साठी ,तीन दिवसाच्या सोहळ्यासाठी लाखो रुपये खर्च होतात.प्रवास,निवास,भत्ते, यात खर्ची होणारा पैसा आपण भरत असलेल्या करातून दिला जातो.तो म्हणायला सरकारचा पण खऱ्या अर्थानं जनतेचा पैसा असतो. त्यामुळे तो असा वाया जायला नको.यातून कुणाचे तरी भले व्हायला हवे. काही सृजनात्मक,नावीन्यपूर्ण प्रयोग,कल्पना निर्माण व्हायला हव्यात.देशाच्या विकासाच्या दृष्टीने या विज्ञान काँग्रेस ने मोलाचे भरीव योगदान द्यायला हवे.पुढच्या वर्षी तरी हे बदल घडतील अशी आशा करणे, एव्हढेच आपल्या हातात आहे.

# कोटा विद्यार्थ्यांसाठी 'डेथ फॅक्टरी' का बनत आहे ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**राजस्थानच्या कोटामध्ये, सुमारे १८०० कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या ' कोचिंग फॅक्टरी'मध्ये दरवर्षी सुमारे दोन लाख मुले दाखल होतात. त्यांच्या डोळ्यात एक ध्येय आहे, डॉक्टर किंवा इंजिनिअर बाण्याची. या ध्येयाला त्यांच्या स्वप्नांच्या यादीत सर्वात वरचे स्थान आहे. यासाठी कोचिंग क्लासेस वासल्यांकदून पालकांना आश्वासने दिली जातात. काही विद्यार्थी यात यशस्वी होतात तर काहींना अपयश येत असते., त्यां आणि इच्छा पूर्ण करण्याची स्वप्रेही किशोरवयीन मनात वाहून जातात.अशे विदयार्थी मृत्यूला जवळ करतात. राजस्थानमधील कोटा है विद्यार्थ्यांच्या मृत्यूचे आगार बनत आहे.**

इथ कित्येक विद्यार्थ्यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपविले आहे. मध्यमवर्गीय भारतीय कुटुंबांच्या स्वप्नांना चालना देणारे अधःपतन केंद्र असण्याव्यतिरिक्त, कोटा ही भारताची आत्महत्या राजधानी बनली आहे. कोटा हे भारतीय शिक्षण व्यवस्थेवरील दुःखद विधान आहे. अशी एक कुजलेली जखम आहे, ज्याची दुर्गंधी आज ना उद्या शाळांमध्ये शिकणाऱ्या जवळपास सर्व मुलांपर्यंत पोहोचते आहे.दरवर्षी सुमारे ९००० मुले आयआयटीमध्ये प्रवेश घेतात. १३ ते १५ वर्षे वयोगटातील या मुलांना मुले यशस्वी होईपर्यंत आईवडील कोटाला ठेवतात घर आणि कुटुंबापासून दूर ठेवतात, कारण मुलांना त्यांना बाकीच्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा 'चांगले' करायचे असते. मीडिया रिपोर्ट्सनुसार,१२ डिसेंबर रोजी कोटा येथे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या बिहारमधील तीन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. कोटामध्ये दरवर्षी किमान १५ विद्यार्थी आत्महत्या करतात. या महिन्यात ४ आणि यावर्षी १९ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार, भारतात वर्षभरात १५,५२६ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या.हे २०१९ च्या तुलनेत २१.१९ टक्के अधिक आहे.१९९५ पासून गोळा केलेल्या आकडेवारीनुसार, भारतात आतापर्यंत १.८ लाख विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. गंमत म्हणजे इकडे देशात दहावी, बारावी किंवा कोणत्याही मोठ्या स्पर्धा परीक्षेचा निकाल येतो आणि दुसरीकडे देशात आत्महत्यांच्या बातम्या येतात. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) नुसार, २०१२ ते २०१४ या कालावधीत २२,३१९ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. दरवर्षी सरासरी ७,४६० विद्यार्थ्यांचा विष प्राशन करून, गळफास घेऊन, छतावरून उडी मारून किंवा रेल्वेतून कापून मृत्यू झाला आहे. दररोज सरासरी वीसहून अधिक मुले आत्महत्या करतात.

ज्या समाजात यशाची पूजा केली जाते, जाणूनबुजून किंवा नकळत, मुलांकडून यशाची मागणी करणारे शिक्षक, पालक हे सर्व मुखवटा घातलेले मारेकरी बनतात. त्यांच्या दबावामुळे या आत्महत्याही होतात.

इतर काही मोठी कारणे : अशा वेदनादायक घटनांमागे इतरही कारणे असतात. वयाच्या १३ किंवा १५ व्या वर्षी त्यांच्या कुटुंबापासून दूर जाणे आणि दुसऱ्या शहरात स्थायिक होणे हे मुलांसाठी धक्कादायक आहे. नव्या शहरात अभ्यासाचा ओढा आहे आणि त्याला सामोरे जाणे जमले नाही तर आणखी काही धोके डावलून उभे राहिलेले दिसतात.




अंमली पदार्थांचे सेवन, लैंगिक कुतूहल, एकटेपणा, चिंता, आर्थिक दडपण हीही प्रमुख कारणे आहेत, ज्यामुळे मुले आत्महत्येला बळी पडत आहेत. कोटामध्ये अनेक विद्यार्थी शारीरिक संबंधांना बळी पडतात. या प्रसंगी ना कोणाला सांगता येते ना कोणाची मदत घेता येते. त्रासलेली मुले वैयक्तिक नातेसंबंधात सुरक्षितता शोधतात आणि तिथेही अडचणीत येतात. आत्महत्येमागे हेही कारण असू शकते. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या अहवालात या गोष्टी समोर आल्या आहेत.

प्रवेश परीक्षा नाहीः कोटा कोचिंग सेंटर्समध्ये पैसे कमावण्यासाठी सामान्यतः प्रवेश परीक्षा होत नाहीत, एखाद्या विद्यार्थ्याला डॉक्टर किंवा इंजिनियर बनायचे आहे की नाही, ज्यांचे पालक तेथे पोहोचतात, पैसे खर्च करण्यास तयार असतात, फक्त प्रवेश दिला जातो. वसतिगृह सुरू झाल्यावरच मुलांना त्यातील समस्या कळतात. जे तिथे जुळवून घेऊ शकत नाहीत आणि त्यातून मार्ग काढू शकत नाहीत, आपल्या गोष्टी पालकांसोबत शेअर करू शकत नाहीत, ते शेवटी मृत्यूकडे ढकलले जातात.

विशेष म्हणजे १५-१९ वयोगटातील आत्महत्यांमुळे जगात सर्वाधिक मृत्यू भारतात होतात. कोचिंग आणि ट्यूशनची स्थिती अशी आहे की असोचेमने दहा प्रमुख शहरांमध्ये केलेल्या अभ्यासानुसार, दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बेंगळुरू, जयपूर, हैदराबाद, अहमदाबाद, लखनौ आणि चंदीगडमध्ये प्राथमिक वर्गात८७ टक्के आणि ९५ टक्के विद्यार्थी आहेत. माध्यमिक स्तरावरील मुले शिकवणीचा अभ्यास करतात. म्हणजे शाळेत जाणाऱ्या प्रत्येक मुलाने ट्यूशन शिकणे आवश्यक झाले आहे, त्यासाठी पालकांना कर्ज काढावे लागले तरी चालेल. कर्ज घेतलेले मूल नापास झाले तर आई-वडील आणि मुलेही बुडतात. किती क्रूर आणि असंवेदनशील समाजात आपण राहतो! आणि हे सर्व आपणच केले आहे. घरची शिकवणी संपली की मग कोचिंग सुरू होते, कधी कधी दोघंही एकत्र जातात. जीवन यशापलीकडे आहे स्पर्धा परीक्षांमध्ये पराभूत झालेली मुलं आत्महत्येने मरतात.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



अंजली औतकार
संपर्क क्र. 8208149689

# स्वराज्य सांभाळणाऱ्या सम्राज्ञी

आधुनिक केसरी

**खरंतर स्वराज्य म्हटल्यापेक्षा अवघा समाज सांभाळणाऱ्या सम्राज्ञी म्हटलं तरी जिजाऊ साहेबांना शोभूनच दिसेल. पूर्ण समाज घडवण्यासाठी खरंतर पूर्ण समाजात माणुसकी समानता आणि बांधिलकी कायम ठेवण्याचे काम जर कोणी करत असेल ,तर ती एक स्त्री असते ! आणि या स्त्रियांच्या सर्वोच्च शिखरावर शोभून दिसेल असं नाव म्हणजे राजमाता जिजाऊ साहेब. जिजाऊ रुपी तरुण मुलगी जेव्हा हे सगळं पाहते तेव्हा त्यांच्याकडे पर्याय आहे की एका जहागीरदाराची पत्नी म्हणून शांत बसून हे सगळं पाहत राहणं, पण या " मातीत नेहमीच महान माता " जन्म घेत राहिल्या आणि त्यामुळेच ही माती समृद्ध राहिली !**

माझी जिजाऊ.... आई कशी असावी, एक उत्तम शिक्षिका गुरु कशी असावी, छोट्याशा बाळाची पहिली स्त्री सखी कशी असावी, खरंतर बाळाच्या म्यानातली पहिली तलवार असणारी स्त्री कशी असावी, अमृत रुपी दूध पाजताना त्या दुधातून दिनांचे अश्रू दर्शवणारी स्त्री कशी असावी, नुसत्या बालकथांमधून इतिहास बदलणारा बालक निर्माण करणारी कथाकार कशी असावी आणि यांच्या पलीकडे जाऊन एका पुरुषाला बोट धरून चालवणं शिकवताना स्त्रीचा सन्मान कसा करावा इतरांसाठी जगावं कसं आणि आपल्या माणसांसाठी प्रसंगी मरावं कसं, चालणाऱ्या प्रवासात संघटनाने इतरांना सोबती कसं करावं हे शिकवणारी , आणि त्याही पलीकडे स्वतःचे लेकरू घडवताना पुढच्या हजारो पिढ्यांतील स्त्रियांना स्त्री कशी असावी हे सहजपणे समजून सांगणारी एक कादंबरी म्हणजे माझी जिजाऊ.

माझ्या भाषेत शिवचरित्र वर्णन करताना, "जिजाऊ सारख्या आईची बळकट कुस असावी लागते शिवबा सारखे युगपुरुष घडायला " हे म्हणणं मला जराही अतिशयोक्तीपर वाटत नाही.

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यासारखे शूर पराक्रमी राजे घडवणाऱ्या रणरागिनी म्हणजे आमच्या आऊसाहेब माँसाहेब जिजाऊ ! त्यांना जगातली सर्वोत्तम शिक्षिका म्हणावेसे वाटते. स्वतःमधला स्वाभिमान, जगण्याची आशा, जगण्याच्या पद्धतीच सुख, हाता पायातला गेलेला त्राण सगळं सगळं विसरलेल्या याच मातीच्या लेकरांना पुन्हा उभारी देण्याचं काम केलं ते माझ्या राजांनी... आणि हे स्वाभिमानाचं जंगल असं पेटून उठलं की स्वराज्य प्रत्येक मनावर कोरलं गेलं. आयुष्य किती असतं ते महत्त्वाचं नसतं ते कसं घडतं ते लोकांना काय देऊन जात ते महत्त्वाचं असतं, एकोणावीस फेब्रुवारी सोळाशे 30 ला जन्म झालेल्या माझ्या राजांना पहिल्यांदा तळहातावर घेतानाच जिजाऊंना स्मरणात होतं रयतेच दुभंगीत झालेलं आयुष्य,, मग हा पुत्र फक्त माझाच का असावा रयतेचा का नाही ? या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात जिजाऊ घडवू लागल्या शिवबाला अगदी एखाद्या कुंभाराच्या मडक्यासारख्या . मनासारखा गोलाकार देण्यासाठी फिरवत राहिल्या शिवबाच्या बालपणाचे चाक ,शक्य तितक्या मेहनतीने शक्य तितक्या चतुराईने, एखाद्या पंडिताला आयुष्यभराच्या अभ्यासानंतर कळाव्या अशा पौराणिक कथा-कहाण्या जिजाऊने शिवरायांच्या बालमनावर कोरून ठेवल्या. वाढत्या वयासोबत जिजाऊ कडून मिळणारे संस्कार आणि त्यांच्या निदर्शनात मिळणारे प्रशिक्षण महाराष्ट्रासाठी नव्हे नव्हे तर या संपूर्ण देशासाठी , मुघलांच्या अधिपत्याखाली येऊन जी माती त्रस्त झाली होती तिच्यामुक्ततेसाठी ,एक महान राजे घडू लागले होते.

"वेगवेगळ्या जातींच्या वेगवेगळ्या धर्माच्या लोकांना एका दोरीत ओवून कसं ठेवावं, देशहितासाठी त्यांचा वापर कसा करून घ्यावा ही राजांच्या कर्तुत्वाची सर्वात श्रीमंतीची बाजू." आणि ही बाजू दाखवून शिवरायांच्या मनात स्वराज्याची लखलखती ज्योत प्रज्वलित करणाऱ्या त्याही जिजाऊच होत्या.

"आई होणं सोपं नसत." आजकालच्या बदलत्या काळात हे वाक्य बोलून जाणं आमच्यासारख्या तरुणाईला किती सोपं वाटतं ना ? पण जेव्हा छत्रपती शिवरायांचा जन्म झाला तेव्हाव त्याआगोदरची परिस्थिती फारच वेगळी होती चारही बाजूंनी विदेशी सत्तांनी स्वतःचा आकांत माजवला होता . पण एक भोसले कुळाची सुनबाई असणारी जिजाऊ , दररोज स्वतःच्या पतीला युद्धासाठी जाताना पाहते आपल्याच माणसांशी झुंज देताना पाहते. काय तर म्हणे एका जहागीरदारांच्या पत्नी पण दररोज जुलमी सत्तांच्या पायाच्या अंगठ्याखाली नवरा दाबून राहतो हे त्यांना दिसत होतं. त्याहीपेक्षा विदारक चित्र होते ते रयतेचं ज्या मातीत जिजाऊंनी जन्म घेतला, जाधवांच्या वाड्यात बालपण बहरलं, ज्या मातीत त्या खेळल्या बागडल्या मोठ्या झाल्या आणि आता संसार करत आहेत ,तिथली लोकं मराठी मनाची मराठी माणसं हळहळत आहेत दिवस-रात्र कष्ट करून भाकरीची सोय होत नाही आणि त्या झालेल्या सोयीतही त्या निर्भीड वानरांचा हिस्सा पडावा . इतक्यावर थांबत नव्हतं आया बहिणींच्या अब्रू भर रस्त्यात लुटल्या जात होत्या घर म्हणून नुसत्या चार भिंती राहिल्या होत्या त्यात सुरक्षितता नावाची काही चीजच नव्हती.



जिजाऊ रुपी तरुण मुलगी जेव्हा हे सगळं पाहते तेव्हा त्यांच्याकडे पर्याय आहे की एका जहागीरदाराची पत्नी म्हणून शांत बसून हे सगळं पाहत राहणं, पण या " मातीत नेहमीच महान माता " जन्म घेत राहिल्या आणि त्यामुळेच ही माती समृद्ध राहिली !

जिजाऊंनाही हे पहावल नाही. म्हणून म्हणतात की जिजाऊंनी ह्या सगळ्या जुलमी सत्तांशी झुंज देऊन त्याकाळच्या रयतेला सुखात समाधानाने जगता यावं म्हणून आई भवानी कडे एक बाळ मागितलं होतं. खूप वेळा आपण इतिहास वाचतो ,चित्रपट पाहतो ,कादंबऱ्या वाचतो पण मला वाटतं हे सगळं वाचून कदाचित समजणार नाही एक वेळ जिजाऊंच्या जागी स्वतःला ठेवून बघा. त्यांच्यासाठी पती सोबत नसताना एकट्या आईने एका मुलाचा सांभाळ करणं खरंच सोपं नव्हतं.

तरीसुद्धा त्या खंबीर उभ्या राहिल्या आणि अशा राहिल्या की आज त्यांचं नाव घेताना अगोदर आऊसाहेब लावला जातं, मुलगा म्हणजे आईच्या काळजाचा तुकडा आणि त्या काळजाच्या तुकड्याला सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये हिंडण्यासाठी वन वन भटकण्यासाठी ,उपदेश करणं खरंच सोपं होतं का ? मावळ लोकात हिंडून संघटना निर्माण करणे , रात्रीच्या झोपा गमावून दिवस निघताच लढायांवर निघणं , विशालकाय दिसणाऱ्या विदेशी सत्तांपुढे छाती ठोकून उभे राहणं ,दररोज जीव तळहातावर घेऊन किल्ल्याबाहेर पडणं आणि अशात आपलं लेकरू घरी परत तर येईल ना यासाठी जिजाऊंच वाटेकडे नजर लावून हळहळन खरंच सोपं होतं का ? तर नाही मुळीच नाही आणि हे असाधारण कार्य जिजाऊंनी पूर्ण केलं. "मला नेहमी वाटायचं जिजाऊंची ओळख एवढीच का की त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई होत्या ?" आज समज आल्यानंतर कळतंय जिजाऊ त्यांच्या आई होत्या म्हणून शिवरायांची एवढी ओळख !

"बिना वातीचा दिवा जळताना, आणि बिना मातीचा अंकुर खुलताना पाहिलाय कधी कुठे .....??"

आणि फक्त शिवरायांचच का , महाराणी सईबाई साहेब गेल्यानंतर छत्रपती संभाजी राजांनाही जिजाऊंनी तेच संस्कार तेच उपदेश आणि तेच संगोपन दिल म्हणून तर या महाराष्ट्राच्या मातीला छावा बघायला मिळाला. गेली कित्येक वर्ष स्वराज्यासाठी धडपडणाऱ्या त्या महान शासकाला आपण पूर्वग्रहांच्या पुस्तकात बंद करून ठेवलं होतं. पण आज जेव्हा त्यांच्या नावावर लागणारे सगळे कलंक बाजूला होताना दिसतात, तेव्हा स्वराज्य रक्षणात केवढं मोलाचं कार्य छत्रपती संभाजीराजांनी पार पडलं, हे दिसून येतं त्यांच्या आयुष्याचं प्रत्येक पान पलटताना जिजाऊंच्या दूरदेशी धोरणाची आठवण होते. खरंच म्हणून ही सुद्धा अतिशयोक्ती नाही की जर जिजाऊ नसत्या तर छत्रपती संभाजी राजे ही काही वेगळेच असते. पण इतक्यावरही संपत नाही ,, छत्रपती संभाजीराजांच्या मृत्यूनंतर साधारण रयत लढत होती. महाकाय औरंगजेबाशी ज्याच्या भीतीने कधी एकेकाळी नजर वर करून पाहण्याची मावळ खोऱ्यातील लोकांची हिंमत व्हायची नाही आज तिथलाच प्रत्येक मावळा तिथलीच प्रत्येक बाई झुंज देत आहे त्या जुलूमी सत्तेला. हा सुद्धा पराक्रम सुद्धा जिजाऊंनी सांभाळलेल्या स्वराज्याचाच महामेरू!! खरंतर हे लिहीत असताना वारंवार माझ्या मनात येत होतं की मी फक्त जिजाऊ न लिहिता "छत्रपती जिजाऊ साहेब " असं लिहावं. पण मग मनात विचार आला जे आजपर्यंत झालं नाही ते कदाचित बरोबर झालेलं नसेल कारण आईला आभूषणाची आणि तिच्या त्यागाला अलंकाराची गरज असतेच कुठे. जिजाऊ तर त्या महानसम्राज्ञी होत्या ज्यांच्या पदराखाली स्वराज्य लहान च मोठे झालं. पण हो माझ्या लेखणीला विरामाकडे नेताना एक आवर्जून सांगेल पुस्तक वाचा इतिहास उघडून पहा फक्त आपल्या आई होण्याला एक स्त्री इतकं खास बनवते की अवघ्या रयतेचं आयुष्य सुखा समाधानाने आणि समृद्धीने फुलवून टाकते.

काहीतरी नाही बरच काही खास असावा लागतं.... आणि ते होतं जिजाऊंकडे. त्यांच्याबद्दल असणारा आदर अजून लाखो गिनतींमध्ये वाढेल आणि त्यांच्या चरणी माथा आपोआप नतमस्तक होईल. सोबतच अजून परिपक्व नसणाऱ्या ,पण माझ्या विचारांमधून वाहणाऱ्या या लेखनाच्या गंगोत्रीला साक्ष ठेवून एक उपदेश देऊ इच्छिते, आजही समाज सांभाळणाऱ्या खूप साऱ्या सम्राज्ञी तुमच्या आजूबाजूला आहेत फक्त डोळे उघडून पाहण्याची गरज आहे.

छत्रपती शहाजी राजांसारखा पती होण्याची गरज आहे ,जो आपल्या स्त्रीवर संपूर्ण विश्वास ठेवेल. छत्रपती शिवाजी राजांसारखा पुत्र पुण्याची गरज आहे ,जो आपल्या आईचा प्रत्येक आदेश शिरसावंद्य मानेल. छत्रपती संभाजी राजांसारखा नातू होण्याची गरज आहे, जो आपल्या थोरल्या आऊसाहेबांच्या प्रत्येक विचाराला अनुसरून पाऊल टाकेल. खरंतर त्या काळाची रयत होण्याची गरज आहे जी मासाहेबांची शिकवण लक्षात घेऊन शत्रूशी एकटी झुंज देत राहील. फक्त या सगळ्यांच्या नजरांनी बघितलं की तुम्हालाही आजूबाजूला अनेक सम्राज्ञी दिसतील ज्या तयार आहेत आजचा समाज सांभाळायला नव्हे नव्हे तर नवा समाज रचायला.

माझी लेखणी नेहमी स्त्रीवादी लिखाणाकडे वळते तेव्हा आवर्जून एका गोष्टीची आठवण करून देईल की स्वराज्यात स्त्रियांचे स्थान अगदी कल्पनेच्या पलीकडचं होतं, जिथे आज आपल्या संविधानाला स्त्रियांची समाजातील अवस्था टिकवून ठेवण्यासाठी 50 टक्के आरक्षण द्यावे लागले तिथे इतक्या वर्षा अगोदर सुद्धा जिजाऊंच्या शिकवणींनी स्वराज्य असं फुलत होतं की प्रत्येक स्त्री मानाने जगू शकत होती.

जिजाऊंचं स्वराज्यातील स्थान तर वेगळं सांगण्याची गरज नाही, पण छत्रपती शिवरायांच्या जीवनातील इतर स्त्रियांचे स्थान ही त्यांनी कसं जपलं ही खरच अभ्यास करण्यासाठी गोष्ट आहे. त्यांच्या दरबारी कुठलीही स्त्री नाचली नाही, त्यांच्या कुठलाच राणीला कधी स्वतःच मत मांडताना संकोच झाला नाही. इतकंच काय तर विरोधात उभ्या असणाऱ्या स्त्रीचाही शिवरायांनी आदर केला नंतरच्या काळात स्वतःच्या सुनबाई येसूबाई साहेबांना स्वराज्याची शिक्के कट्यार दिली..हे आणि असे कित्येक किस्से पुन्हा पुन्हा सांगावे आणि हा सगळा महापराक्रम घडून आला तो यामुळेच की छत्रपतींच्या विचारांची गंगोत्री जिथून सुरू वहायची तिथे स्वतःच्या हातात घागर घेऊन पाणी टाकणाऱ्या जिजाऊ उभ्या होतात. तर आपणही पात्रतेला योग्य असणाऱ्या आजच्या स्त्रियांना एक संधी तर द्यायला हवी ना पुन्हा स्वराज्यासारखा समाधानी समाज घडवण्यासाठी.




मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९

# आदर्शमाता, राष्ट्रमाता, राजमाता जिजामाता

आधुनिक केसरी

**आज राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ यांचा जन्म दिवस १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा या स्थानी झाला. त्यांच्या मातोश्री म्हाळसाबाई वडील लखोजीराव जाधवांच्या घरात जन्मलेला हिरा पुढे भोसलेंच्या घरात सुन म्हणून काम करत असतांना त्यांनी शहाजीराजांना कठीण समयी मानसिक आधार आणि मार्गदर्शन करता करतानाच स्वराजांचे खंदे निर्माणकर्ते छत्रपती शिवाजी राजेंना स्वतःच्या तालमीत घडविले. मराठी अस्मितेचे प्रतिक म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज होय. त्यांच्या स्मरणानेच मराठी माणसाची छाती केवळ स्मरणाने मुठभर फुगते. त्यांचे चारित्र्यचिंतनाने मराठी माणसाला स्फूर्ती, प्रेरणा मिळते.**

नुसते मराठी माणसच नव्हे तर प्रत्येक भारतीयांच्या हिंदूह्दय सिंहासनावर त्यांचे अढळ स्थान प्राप्त झालेले आहे. हे कुणालाही विसरुन चालणार नाही का तर तत्कालीन परिस्थितीत महाराजांच्या अवती-भवती परकीय आक्रमणाच्या अन्यायी, जुलमी, अत्याचाराच्या राजवटी चालु होत्या. अनेक शूरवीर लढाऊ तथाकथित राजे, महाराजे, पाटील, देशमुख घराणे लाचारी पत्करुन कसे बसे तग धरुन होते. अशा वेळी शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हे राज्य केवळ हिंदूचे नव्हे तर सर्व जाती धर्माच्या रयतेचे राज्य होते. अशा या हिंदवी स्वराज्य संस्थापक राजेंना घडविणाऱ्या कोण होत्या तर आदर्शमाता जिजाऊ माता होय, हे स्वार्थ स्वाभिमानाने व राष्ट्रभिमानाने म्हणावे लागेल. माणसा-माणसाला कसे जोडावे, त्यांच्यात जवळीक कशी करावी ही विलक्षण हातोटी जिजाऊंच्या अंगी होती. कर्मापेक्षा जन्मावर नी कर्तृत्वावरच व्यक्तीचे श्रेष्ठत्व असते. ते त्यांचे अगाध विचार व पार्श्वभूमी होती. मग ते सराईत गुन्हेगार असेल, चोर असेल, रामोशी बेरड असेल, आडेकरी महार, मांग असेल इत्यादी विविध जाती जमातील व धर्मातील लोकांना स्वराज्याचे महत्व पटवून समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेतले. सर्वगुणी लोकांचे संघटन जाळे निर्माण केले. यातूनच शिवाजी काशीद (न्हावी) बहिरजी नाईक (रामोशी), मदारी मेहतर (मुसलमान), जीवाजी महाले (न्हावी) हे स्वराज्याचे वीर जन्मास आले. यांनी स्वराज्याला व शिवाजी राजेंना प्राणपलिकडेही जपले. अशा प्रकारे म्हणतात ना आईच्या कर्तृत्वातच मुलाचे भाग्य लपलेले असते असे नेपोलियन म्हणतो नी खरोखरच हा विचार रयतेचे राजे, स्वराज्य रक्षक तंतोतंत शिवराजांना लागू पडतो. शिवरायांनी स्वराज्य जरी निर्माण केले असले तरी या रथाच्या सारथी मात्र त्यांच्या आदर्शमाता, राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊच होत्या. या महान मातेने वेळोवेळी शिवरायांना ऊचित मार्गदर्शन केले. त्यामुळे खऱ्या अर्थाने हिंदवी स्वराज्याची स्थापना शिवाजी राजांनी केली. स्वातंत्र्य हे असते तरी काय ? प्रांताप्रांतात सांस्कृतिक व सामाजिक बदलाची गरज कशासाठी ? याची जाणवी जिजाऊंनी शिवरायांना करुन दिली. आदर्श राज्य निर्माण केल पाहिजे, स्वराज्य नि सुराज्य निर्माण करणं हेच आपले प्रमुख ध्येय कर्तव्य असावे हा विचार शिवरायांच्या मनी बिंबवला. एक कर्तृत्ववान, निष्ठावाना राजा कसा असावा, राजानं कोणत्या गोष्टी कराव्या, कोणत्या करु नयेत या सर्व गोष्टी जिजाऊंनी शिवरायांना गुरु म्हणून शिकविल्या. तेंव्हा जिजाऊंची महती थोर कवी गाती.



**हिच जिजाऊ जिच्या प्रेरनेने ऊजळे स्वराज्य ज्योती ।**
**हिच जिजाऊ जिने घडविले राजे शिव छत्रपती ।।**

जिजाऊ जशा करारी होत्या तसेच ओतपोत प्ेरमळ ही होत्या, कठोर लढवय्या होत्या. तशाच बुध्दिमानही होत्या. परंपरेच्या स्वाभिमानी, अभिमानी होत्या. तशच विज्ञाननिष्ठही होत्या. त्यांनी कधीच कुणाचाही भेदभाव केला नाही. सर्व जाती धर्मातील मावळयांना आपल्या शिवबा प्रमाणेच माया दिली. यामुळेच अनेक मावळे स्वराज्यासाठी पुढे आले. महिलांना प्रथम स्वायत्ता व सुरक्षितता दिली. महिलांना स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे ही त्यांची भुमिका होती. यामुळेच शिवरायांनी महिलांचा आदर, सन्मान राखला नि हक्क दिले. पती निधनानंतर सती न जाता आपले संपूर्ण जीवन स्वराज्य निर्मितीसाठी समर्पित केले. शहाजी राजेंच्या पदरी असणारा जयराम पिंडे, 'राधामाधव विलास चंप' या ग्रंथात जिजाऊंचे वर्णन करतांना म्हणतो,

**जशी चंपकेशी खुले फुल जाई । भली शोभती ज्यास जाया जिजाई ।।**
**जिचे किर्तीचा चंबुद्विपाला । करी साऊली माऊली मुलाला ।।**

आजच्या लोकशाहीचे बीज खऱ्या अर्थाने याच स्वराज्यातून म्हणजेच रयतेच्या राज्यातून निर्माण झाले. स्वराज्याची घोड दौड चालु असतांना माँ साहेबांनी राजगड ही राजधानी रायगड येथे हालविण्याचा निर्णय घेतला. स्वधर्माबद्दल तर सार्थ अभिमान बाळगत पण इतर धर्मालाही साहिष्णुपणाची वागणूक कशी असावी याचे यथोचित्र दर्शन आजच्या राजकीय नेते यांनी जिजाऊ व शिवरायांच्या कार्य कर्तृत्वातून खऱ्या अर्थाने घेण्याची गरज आहे, असे म्हणावे लागेल. स्वराज्य हे राजे शहाजी, राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणेने छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजीराजे व अनेक मावळयांच्या कर्तृत्वाने, पराक्रमाने निर्माण झाले असे असतांनाही अनेक धर्मपंडीतांनी राज्याभिषेक सोहळयास परखड विरोध केला. आजवर जगाच्या इतिहासात वारसा हक्काने अनेक राजे झाले. परंतु शुन्यातून राज्याची निर्मिती करुन राजे झालेले जागतिक इतिहासातील एक आदर्शवंत प्रमुख उदाहरण म्हणजे स्वराज्याचे राजे शिवराय हे होते. १७ जुन १६७४ रोजी जिजाऊंचा रायगड किल्याच्या पायथ्याशी पाचाड येथील वाड्यात मृत्यू झाला. दोन राजे घडविणाऱ्या या महानविभूतीस विनम्र अभिवादन करतांना खालील ओळी ओठावर येतात....

**जिजाऊ तुम्ही नसता तर दिसली नसती अंगणी तुळस ।**
**जिजाऊ तुम्ही नसता तर दिसले नसते मंदिराचे कळस ।।**
**जिजाऊ तुम्ही नसता तर सुवासिनीच्या नसते कुंक भाळी**

अशा महान आदर्श माता जिजाऊंचे स्मरण जगातील प्रत्येकाने व समाजातील प्रत्येक कुटूंबाने केलेच पाहिजे. त्यांच्या जीवन चरित्र्यातून आपण बोध घेतलाच पाहिजे. हाच उचित संदेश होय. करिता राष्ट्रमाता, राजमाता थोर आदर्शमाता जिजामाता म्हणावे लागेल.

# कणखरतेचे रुप- राजमाता जिजाऊ

आधुनिक केसरी

**ज्या मातेने शिवबा सारखा धाडसी ,पराक्रमी ,शूरवीर पुत्र या महाराष्ट्राला दिला त्या राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची आज जयंती.१२ जानेवारी १५९८ रोजी लखोजी जाधव यांच्या घराण्यात त्यांचा जन्म झाला. लहानपणापासून जिजाऊ चतुर, बुद्धिमान आणि कणखर होत्या.शहाजीराजे यांच्याशी विवाह होऊन त्या भोसले घराण्याची सून झाल्या. जिजाऊ साहेब यांनी अत्यंत कठीण काळात शिवबांना जन्म देऊन त्यांच्यावर उत्तम संस्कार केले म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांसारखा प्रजाहितदक्ष व लोककल्याणकारी राजा रयतेला मिळाला. मातेने दिलेले संस्कार आणि रयतेवर होणारा अन्याय उघड्या डोळ्यांनी पाहिल्यानंतर शिवरायांनी मावळ्यांच्या मनात स्वाभिमानाची ज्योत पेटवली आणि त्यातूनच स्वराज्याचा जन्म झाला.**

एका मातेने मनावर घेतले आणि आपल्या पुत्रावर चांगले संस्कार केले तर काय घडते याचे आदर्श उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय.

शिवरायांना वाढविण्यात घडविण्यात त्यांनी दिलेले योगदान हे न विसरता येण्यासारखे आहे.एक आदर्श माता कशी असावी हे आपल्याला राजमाता जिजाऊ यांच्या रुपात पहायला मिळते.

जिजाऊ सारख्या मातांची आज समाजाला गरज आहे. महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार पाहिल्यानंतर आपल्या पुत्रावर चांगले संस्कार करणाऱ्या जिजाऊसारख्या आईचे महत्त्व समजते. ज्या मातेने स्त्रियांचा सन्मान करणारा राजा घडविला.ज्याने स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि रक्षणासाठी स्वराज्यात कडक असे कायदे केले. जिजाऊ कणखर आणि लढाऊ बाण्याच्या होत्या.संकटकालीन प्रसंगी हातात समशेर घेऊन शत्रुशी दोन हात करायला मागेपुढे पाहत नव्हत्या. स्वराज्यावर ज्या -ज्या वेळी संकटे आली तेव्हा जिजाऊंनी शिवाजी महाराजांना योग्य सल्ला आणि मार्गदर्शन केले.

स्वराज्यातील जनतेच्या हितासाठी निर्णय घेण्यास राजांना पाठबळ दिले. शिवरायांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून हे स्वराज्य वाढविण्यात मोलाची कामगिरी बजावली. बेचिराख झालेले पुणे नव्याने उभारण्यात राजमाता जिजाऊंचा सिंहाचा वाटा आहे.पडकी मंदिरे दुरुस्त केली. शेतीसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले.लोकांना धीर दिला. स्वराज्य स्थापनेच्या पूर्वीची महाराष्ट्रातील परिस्थिती अत्यंत बिकट असताना या मातेने शिवरायांच्या मनावर केलेले संस्कार किती महान होते हे आपल्या लक्षात येते. आपले जीवन हे रयतेसाठी आहे.शिवबा तुला रयतेला सुखी ,समाधानी करायचे आहे.त्यासाठी तुला उभे रहावे लागेल.लढावे लागेल.असा आत्मविश्वास जिजाऊंनी राजांना दिला.

आईच्या प्रोत्साहनामुळे शिवबांनी हे स्वराज्य निर्माण केले. जिजाऊ सारख्या आईची आज घराघरात गरज आहे.ज्यामुळे कुटुंबात चांगले संस्कार होतील.संस्कारीत चांगली पिढी घडेल.पर्यायाने महिलांवरील अन्याय अत्याचार थांबतील.त्यांनाही समाजात निर्भयपणे वावरता येतील.यासाठी आजच्या महिलांना जिजाऊ बनून त्यांच्या विचारांना पुढे घेऊन जावे लागेल.





# राजमाता जिजाऊ साहेब

आधुनिक केसरी

महाराष्ट्राची माती धन्य झाली
शिंदखेड राजायेथे स्वराज्य
जननी राजमाता जिजाऊसाहेब
जन्माला आली !
सरदार लखोजीराव जाधव यांची कन्या भोसले
घराण्याची कुलवधू झाली !!
तिच्या उदरातूनच स्वराज्याची क्रांतीची पहाट
जन्माला आली !
महाराष्ट्र भूमीत यवनांनी घातलेला नंगानाच
प्रजेवर चाललेला अन्याय अत्याचार थांबविण्या
हाती समशेर मासाहेब जिजाऊंनी घेतली !!
प्रजेचं राज्य स्वतःसाठी असावे म्हणून
स्वराज्याची उभारणी राजमाता जिजाऊंनी केली
!
सरदार शहाजीराजांचा पाठिंबा, राजमाता
जिजाऊंचे कौशल्य, मावळातील सरदारांची,
मावळ्यांची साथ !
शिवरायांच्या साथीला स्वराज्यासाठी धावले
हजारो हात !!
जिजाऊंच्या आशीर्वादाने शंभू महादेवासमोर
रोहीरेश्वरी घेतली शपथ स्वराज्याची !
हिंदवी स्वराज्य स्थापन माझ्या शिवबाने करावे
इच्छा माँसाहेबांची !!
राजमाता जिजाऊंनी पाहिलेले स्वप्न
छ.शिवरायांनी साकार केले !
रयतेचे हिंदवी स्वराज्य स्थापन झाले !!
छत्रपती शिवरायांना
घडवणारी माता जिजाऊ
सिंदखेडराजाच्या मातीत
जन्माला आली !!



कवी - रवी दगू सगर
मो. ९०४९२८०७९१

# राजमाता जिजाई



वृषाली वानखडे
अमरावती

आधुनिक केसरी

**राजमाता.......आपल्या श्रद्धास्थान आणि प्रेरणास्थान शूरवीर राजे लखूजींची कौशल्यगुणांनी परिपूर्ण असलेली कन्या.....स्वराज्य जननी जिजाऊ यांचा विवाह सर्व कलांत तरबेज असलेले शौर्यवान राजे शहाजी हे राजेमालोजींचे आणि माता उमाबाईंचे सुपुत्र यांच्याशी झाला आणि खऱ्या अर्थाने इतिहास सुवर्णाक्षरांनी कोरल्या गेलाय.....**

.दूरदृष्टीच्या अभ्यासात्मक वृत्तीने माता जिजाऊंनी जनतेला योग्य दिशा दाखवून अत्यंत कर्तबगारीने धर्मसंस्कारातून संस्कृती , राजनीती, देशप्रेम,धर्मप्रेम,शौर्यता,युद्ध कौशल्य,घोडेस्वारी,तलवारबाजी हे बाळकडू शिवबाला पाजलेत. रामायण--महाभारत या ग्रंथातील विचारांचा प्रभाव जिजाऊंच्या मनावर होता.देवतुल्य व्यक्तिमत्व असणाऱ्या महापुरुषांच्या विजयाचा ठसा त्यांचा कणखरतेतून आपल्याला नक्कीच प्रभावित करतो. धर्मरक्षण आणि धर्माप्रमाणे आचरण म्हणजेच धर्म आणि नीती यांची जोपासना होय. धर्म आणि अधर्म यांच्यात नेहमी धर्माचाच विजय होतो, धर्म आणि सत्य यावर निष्ठा ठेऊन राहणे व त्याला नैतिक मूल्यांचे अधिष्ठान ठेऊन राहणे म्हणजेच सत्याच्या बाजूने राहून विजयी होणे. असेच शिवबांच्या संस्कारक्षम मनावर योग्य तो परिणाम होत गेला त्यांनी नितीमूल्यांचा वसा घेऊन जे जिजाऊंचे स्वराज्याचे स्वप्न होते ते साकार केलेत...... कारण शहाजी राजांनी स्वतः स्वराज्याचे स्वप्न पाहिलेले होते परंतु त्यांच्या प्रयत्नांना मूर्त स्वरूप प्राप्त होऊ शकले नाही, मात्र स्वराज्य संस्थापनेचे स्वप्न जिजाऊंच्या नेतृत्वात आणि योग्य मार्गदर्शनाखाली शिवरायांनी वास्तवात आणले......

......राजमाता जिजाऊ भोसले घराण्याच्या भाग्यलक्ष्मी होत्या, स्वराज्याची महत्त्वाकांक्षा प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी कौटुंबिक सुखांचा त्याग करून एखाद्या योगिणीप्रमाणे स्वतः चे आयुष्य स्वराज्याच्या निर्मितीमध्ये घालविले,स्वराज्य निर्मितीचा मार्ग अतिशय अडचणींचा होता पण शहाजीराज्यांचे स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांनी कष्टमय जीवन स्वीकारले.

त्या परिस्थितीत ज्या राजवटी होत्या त्या परकीयांच्या होत्या, ते मोगल असोत की निजामशहा---कुतुबशहा---आदिलशहा असोत मात्र साऱ्या परधर्मीयांच्या होत्या. त्यामुळे भोसले आणि जाधव घराण्यातील अनेक काळजातली कर्तबगार या शहांच्या राजकारणाच्या युद्धात शहीद झालेले होते,याचा परिणाम जिजाऊंच्या मनावर खोलवर झालेला होता,या घटनांपासून कुठल्याही हिंदू माणसास आपल्या जीविताची शाश्वती राहिलेली नव्हती. यातूनच सर्व सामान्य जनतेवर कित्तीतरी अन्याय होत असतांना जिजाऊंनी आणि शहाजी राज्यांनी स्वराज्य संस्थापणेचा निर्णय घेतला..... .जिजाऊंची आपल्या पतीवरील निष्ठा कायम होती, पतीप्रेम, पुत्रप्रेम, हे स्वराज्याच्या आड त्या कधीही येऊ देत नव्हत्या. प्रत्येक क्षणी त्या शिवबांना मार्गदर्शन करीत राहिल्यात. शहाजी राजांनी कर्तव्यदक्ष जिजाऊवर टाकलेली स्वराज्य स्थापनेची जबाबदारी छत्रपती वीर शिवबांच्या माध्यमातून पूर्णपणे यशस्वी पार पडली यातूनच जिजाऊंची कर्तृत्ववाची अनुभूती येते......

राजमाता जिजाऊंचे काळीज थरारले........

अचानक शहाजीराज्यांचा मृत्यू अत्यंत वेदनादायी प्रसंग होता, त्या दुःखातून त्या दीर्घकाळ सावरल्या नाहीत, त्या काळामध्ये अंध धार्मिक रूढी व परिस्थिती बघता परंपरेनुसार सती जाण्याची प्रथा होती, परंतु छत्रपती शिवबांनी आपल्या आईसाहेबांना हात जोडून विनवणी केली की, "आईसाहेब तुम्हीच माझे मार्गदर्शक आहात, तुम्हीच तर माझे बळ आहात" तर तुम्ही सती जाण्याचा कुठलाही निर्णय घेऊ नयेत....

छत्रपती शिवबांना घडविणारी माता ही एक प्रचंड शक्ती होती, त्यांच्या सुसंस्कारामुळेच छत्रपती शिवबा तयार झाले......

जिजाऊ म्हणजे या विश्वातील मानवजातीतील एक आदर्श चरित्र आहे. त्यांच्या कर्तृत्वातून सतत आपल्याला सदैव प्रेरणा व सामर्थ्य मिळत राहते... आपल्या स्वराज्याच्या धेयप्राप्तीसाठी सुखाचे आयुष्य सोडून खाचखडग्यांचा मार्ग त्यांनी पत्करलाय यातच त्यांच्यात कार्याची व कर्तबगारीची कसोटी दिसून येते.....

आई जिजाऊ आदर्श ध्येयवाद बाळगणाऱ्या, स्वराज्यबद्दलच्या निष्ठा ठेऊन कठोर अंतकरणाने राजकारण करणाऱ्या होत्या......

सर्व जनतेला प्रेमाने सांभाळून रयतेच्या अडचणीत धावून जाणाऱ्या अत्यंत बुद्धिमान,धोरणी,मुत्सद्दी, संयमी, कुशल,प्रशासक, न्यायनिष्ठुर, अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्या, उत्साही, धाडसी, या सर्व गुणांचा त्यांच्यात समुच्चय होता....... म्हणूनच त्यांना राजमाता---राष्ट्रमाता या व्यापक विशेषणाने संबोधले जाते.......

रयतेला कोणत्याही प्रकारची मदत त्या स्वतःहुन देत होत्या, म्हणूनच त्या लोकमाता झाल्यात......

म्हणूनच या आईसाहेबांची कुणाशीही तुलना केली जात नाही....... नतमस्तक आई जिजाऊ.

# आदर्श मातृत्व : राजमाता जिजाऊ



कल्पना घुगे
जालना

आधुनिक केसरी

**भारतीय इतिहासाच्या कालखंडाचे आपण सिंहावलोकन केले तर आपल्याला असे दिसून येते कि एक काळ असा होता, ज्या काळात आपण निजामशाही, कुतुबशाही,मोगलशाही,आदिलशाही या परकीय सत्तांच्या अधिपत्याखाली वावरत होतो. या परकिय सत्तांनी आप- आपले सत्ता वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी राज्य,प्रांता-प्रांतांत धुमाकूळ घालून, प्रजेला लुटण्याचे थैमान घातले होते.**

या गुलामगिरीच्या ओझ्याखाली सामान्य जनता ही अगदी भरडून निघाली होती.या हजारो वर्षांच्या गुलामगिरीला गाडण्यासाठी, अठरा पगड जाती-जमातींच्या लोकांना 'मावळे' या एका धागा गुफुंन,जातीयवाद्यांना शह देण्यासाठी अवघ्या विश्वाला अभिमान वाटावा असे दोन छावे 'छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज' घडवणारे मराठी अस्मितेचे आदर्श मातृत्व म्हणजे 'राजमाता जिजाऊ' होय!

राजमाता जिजाऊ यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात सिंदखेड राजा येथे झाला.वडीलांचे नाव लखूजीराजे व आईचे नाव म्हाळसाबाई होते. दत्ताजी,अचलोजी,बहादुरजी व राघोजी या चार मुलांच्या पाठीवर जिजाऊ हे कन्यारत्न लखुजीराजे जाधव व म्हाळसाबाई यांना प्राप्त झाले. पुढे वेरूळच्या भोसले घराण्यातील शहाजी भोसले यांच्याशी जिजाऊ यांचा विवाह झाला.त्या काळात निजामशाही,मोगलशाही,कुतुबशाही,आदिल शाही या सत्तांचा साम्राज्य वर्चस्वासाठी सत्ता-संघर्ष सुरू होता.स्वतःच स्वतंत्र असे साम्राज्य नसल्याने या शाह्यांच्या दरबारी अनेक मराठे सरदार,जहागिरदार सेवेत होते.त्यात १९२० मध्ये खंडागळे हत्ती प्रकरणात समज-गैरसमजातून संघर्षाच्या अटी-तटीतून जिजाऊंचे बंधू दत्ताजीराजे व चुलत दीर संभाजीराजे मारले गेले.पुढे निजामशाहीच्या रक्षणाकरिता मोगलांशी लढताना ३१ ऑक्टोबर १६२४ रोजी शहाजींचे धाकटे बंधू शरीफजी यांचा भातवडीच्या लढाईत लढताना मृत्यू झाला.२५ जुलै १६२९ रोजी निजामशाहाने देवगिरीच्या किल्ल्यात जिजाऊंचे वडील लखूजीराजे यांची कपटकारस्थानाने हत्या घडवून आणली. परकीयांच्या सत्तासंघर्षासाठी रक्त मात्र स्वकियांच सांडत आहे.हे सर्व वास्तव चित्र जिजाऊंनी पाहिले व ख-या अर्थाने इथेच जिजाऊंच्या मनात स्वतंत्र स्वराज्य निर्मितीची पहिली ठिणगी पेटली. किती दिवस या परकियांच्या दरबारी चाकरी करायची? त्यापेक्षा आपण स्वतः च असं स्वराज्य का निर्माण करू नये? परकियांची गुलामी उलथून टाकायची असेल,या मातीतील जनतेला सुखी-समाधानी ठेवायचे असेल तर याच मातीत स्वतंत्र सिंहासन स्थापन झाले पाहिजे, हे स्वप्न जिजाऊंनी पाहिले व ते साकार करण्यासाठी जिजाऊ व शहाजीराजे यांची प्रयत्नांची घोडदौड सुरू झाली.

१९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरीवर शिवरायांचा जन्म झाला.पुण्याची जहागिरी मिळाल्यानंतर बालशिवबा व आपल्या निवडक मावळ्यांना घेऊन जिजाऊंनी आदिलशाहाचा सरदार मुरार जयदेव याने शापित केलेल्या भूमीवरील फाटकी चप्पल,झाडू व पहार उखडून टाकून त्या भूमीवर सोन्याचा नांगर फिरवून ती जमीन शेतीयोग्य बनवली."स्वराज्य स्थापनेसाठी आमचा निर्वंश झाला तरी चालेल पण जनतेची उपासमार होऊ देणार नाही."असं ठणकावून सांगत अंधश्रध्दा जुगारून धर्मांधांना जागे करण्याचे काम राजमाता जिजाऊ आईसाहेबांनी केले.एवढेच नव्हे तर सर्वच समाजातील बालकांना आपल्या विचारांनी 'मावळे' या एका धाग्यात गुफुंन वर्णव्यवस्था नष्ट करून समतावादाची पेरणी केली.आपला ज्येष्ठपुत्र संभाजीला युध्दात वीरमरण आले.२३ जानेवारी १६६४ ला शहाजी राजे यांचा होदेगिरी येथे अपघाती मृत्यू झाला.

या सर्व प्रसंगांना सामोरे जाताना वेळ प्रसंगी हाती तलवार घेऊन स्वराज्यनिर्मितीसाठी जिजाऊंनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले.अफजलखानाच्या भेटीपूर्व प्रसंगी " शिवबा, अफजलखानाच्या भेटप्रसंगी तुम्ही यशस्वी होणाराच आहात.पण जर तुम्ही कामी आलात तरी भिती बाळगू नका. तुमच्या पाठीमागे मी बाळ शंभूला छत्रपती बनवून स्वराज्याची वाटचाल सुरू ठेवील..! " ही होती माँसाहेब जिजाऊंची शिकवण ! जिजाऊंनी शिवरायांवर व मावळ्यांवर घडवलेले संस्कार फार महत्त्वाचे होते.मुळात स्वराज्य हे जनतेचे राज्य होते. शिवरायांच्या मनात स्वराज्य निर्मितीचे बीज रूजवून त्या संकल्पनेला साकार करण्याचे काम माँसाहेब जिजाऊंनी केले.जिजाऊंच्या संस्कारांतून व जिजाऊ विचारांच्या प्रेरणेतूनच ख-या अर्थाने जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल असा देदीप्यमान इतिहास निर्माण झाला.एका स्त्रीच्या मनात निर्माण झालेली जबरदस्त इच्छाशक्ती ही महाकाय अस्मानी संकटाना ही नेस्तनाबूत करू शकते,याची प्रचिती आपल्याला जिजाऊ विचारातून, संस्कारातून, कार्यकर्तृत्वातून दिसून येते. सध्याच्या काळात गरज आहे फक्त या सुवर्ण इतिसाहाची पाने उलटून पाहण्याची व यातील जिजाऊ विचारांची प्रेरणा फक्त विचारात न घेता आचारणात आणून अखंड समाजाच्या परिवर्तनवादी उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करण्याची..!!

# आमुचे आदर्श: राष्ट्रमाता जिजाऊ-स्वामी विवेकानंद



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मातेच्या दैदिप्यमान कर्तृत्वाने आणि सुसंस्कारित पालन पोषणाच्या बळावर अनेकविध सुपुत्रांनी आकाशाला गवसणी घालण्याचे भव्य-दिव्य कार्य केल्याचा इतिहास सर्वसाक्षी आहे! पुरुष कितीही बलशाली आणि स्वतःला श्रेष्ठ समजत असला तरी त्याला मातृऋण कधीच फेडता येत नाही, म्हणूनच सुशीलो मातृ पुण्येन पितृ पुण्येन चातुरः | औदार्यं वंश पुण्येन आत्मा पुण्येन भाग्यवान् || छत्रपती शिवबांसारखे पुत्ररत्न घडवून आपल्या सर्वांगीण संस्काराने ज्या मातेने स्वबळावर रयतेचे साम्राज्य उभे केले अशा राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब यांचा इतिहास सुद्धा तेवढाच भव्य आणि दिव्य आहे! बालवयात वेरुळच्या भोसले घराण्यातील शहाजीराजे भोसले यांच्याशी त्यांचा विवाह झाला. संघर्ष जिजाऊंच्या पाचवीलाच पुजला होता. जाधव-भोसले यांच्यात बेबनाव झाला. दुर्दैवाने दोन्ही घरात प्रचंड वितुष्ट आले, परिणामी जिजाऊंचे माहेर कायमचे तुटले, परंतु न डगमगता त्यांनी शहाजीराजे भोसले यांचा संसार उजळवून टाकला. आई या नात्याने जिजाऊंसमोर अनंत अडचणींचे पहाड उभे होते. हे संस्कृत सुभाषितातसुद्धा आईचे ऋण सर्वप्रथम व्यक्त करते. आईच्या संस्काराने पुत्र-कन्या सुशील, वडिलांमुळे चतुर, कुटुंबामुळे उदार आणि स्वकर्तृत्वामुळे भाग्यवान बनतात! एवढे लिहिण्याचे कारण म्हणजे आज राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब आणि प्रज्ञावंत सुपुत्र स्वामी विवेकानंद यांची जयंती!**

त्यातच शहाजी राजांना पुणे परगणा सोडून बंगळूरूला जावे लागले. जेष्ठ पुत्र संभाजींनी आपल्या वडिलांना भक्कम साथ दिली तर इकडे जिजाऊंनी शिवबांना मजबूत-तल्लख बनवले. मुघलशाही-कुतुबशाही-आदिलशाही-निजामशाही या बलाढ्य शाह्यांशी चार हात करण्याचे शारीरिक आणि मानसिक सामर्थ्य शिवबामध्ये ठासून भरले. काळ मोठा खडतर होता. गाढवांचा नांगर फिरलेल्या पुण्याच्या भूमीत अठरापगड जातीतील मावळ्यांच्या साथीने सोन्याचा नांगर फिरविण्याचे महत्कार्य जिजाऊंनी केले! अशा शूर-धाडसी-पराक्रमी मातेचे बाळकडू लाभलेल्या शिवबांनी वयाच्या सोळाव्या वर्षी तोरणा किल्ला काबीज करून स्वराज्याचे तोरण बांधले आणि नंतर मागे वळून पहिलेच नाही! एकावर एक आक्रमणे आणि शह-काटशह यांनी दररोजचे जीवन व्यस्त-त्रस्त होत असतांना शिवबांच्या पाठीशी त्या खंबीरपणे उभे राहिल्या! युद्ध किंवा व्यवहारकुशलते प्रसंगी सूक्ष्म निरीक्षण-परीक्षण-मार्गदर्शन करण्याचे महत्वपूर्ण कार्य मांसाहेब जिजाऊंनी केले. विजापुर-मुघलसाम्राज्याशी संघर्ष, अफजलखान प्रकरण, पन्हाळगडचा वेढा, पावनखिंड लढाई, शाहिस्तेखान प्रकरण, सुरतची लुट, पुरंदरचा तह, आग्रा प्रकरण, मुघलांसोबत तह, उमराणी-नेसरीची लढाई आणि छत्रपती शिवबांचा राज्याभिषेक या सर्वच घटना सर्वसामान्यांचे डोळे दिपवून टाकणाऱ्या आहेत आणि या पाठीमागे खंबीर मार्गदर्शन कुणाचे असेल? तर ते ते मातोश्री जिजाऊंचे! जिजाऊंनी केवळ स्वराज्यच उभे केले नाही तर आपल्या मुलांमध्ये प्रचंड आत्मविश्वास आणि संघर्ष करण्याची जिद्द निर्माण केली! छत्रपती शिवबांनी केलेले कार्य हे केवळ शक्तीचे कार्य





नसून त्यामागे प्रचंड बुद्धिचातुर्य होते हे लक्षात घ्यावे लागेल. जात-धर्म-पंथ याचा संकुचित विचार कधी कुणाला शिवला नाही. सामान्यातील सामान्य आणि शिवबा समान मानून स्वराज्याची बांधणी माता जिजाऊंनी मोठ्या धीरोदत्तपणे केली आणि घराघरांत जाज्वल्य आत्मविश्वास पेरण्याचे महत्कार्य या मातेने केले! याचाच परिणाम म्हणजे लोक स्वराज्यासाठी स्वतःचा जीव द्यायला तयार झाले! शिवा काशिदांसारख्या अनेकांनी हसत हसत स्वराज्यासाठी बलिदान दिले आणि त्यावर 'बहुजन हिताय' शिवबांनी आपल्या राजमुद्रेसह रयतेचे मराठी स्वराज्य संस्थापित केले!

तसेच आज एक दैदिप्यमान व्यक्तिमत्व, तेजोमय ब्रह्मचर्य, अमोघ वाणी आणि ज्ञान-ध्यान-साधनेने ओतप्रोत लेखणीच्या सामर्थ्यावर जगाला आपली ओळख निर्माण करणारे नरेंद्र नाथ दत्त म्हणजेच स्वामी विवेकानंद जयंती म्हणजेच राष्ट्रीय युवक दिन! त्यांनी शिकागो जागतिक धर्मपरिषदेत "बंधू-भगिनींनो" शब्दांनी संपूर्ण जगाला भारताच्या "वसुधैव कुटुंबकम" तत्वाची ओळख करून दिली. जेमतेम ३९ वर्ष आयुष्य लाभलेले स्वामीजी म्हणजे "ते चालते ज्ञानाचे बिंब | तयाचे अवयव ते सुखाचे कोंब ||" असे म्हणणे वावगे ठरू नये! रामकृष्ण परमहंस यांच्या गुरुतत्व स्पर्शाने स्वामी म्हणजे अध्यात्मिक-वेदांत दर्शनाने ओतप्रोत व्यक्तिमत्व बनले! नैष्ठिक ब्रह्मचर्य, बलोपासना, ज्ञानसाधना, ध्यान धारणा, आत्मसन्मान, आत्मभान, आत्मविश्वास या सद्गुणांच्या बळावर मनुष्य आकाशाला गवसणी घालू शकतो हे सिद्ध केले. धार्मिक अवडंबर, ब्राह्मण्यवाद, पुरोहीतवाद, धर्माचे बीभत्स प्रदर्शन याला परखड विरोध करतांना "ईश्वर मंदिरात नसून तो माणसामाणसात आहे ही वृत्ती म्हणजेच खरा हिंदू धर्म होय!" असे स्वामीजी प्रतिपादन करत. स्वामीजींनी अजीवन युवकांना प्रेरित केले! "उठा, जागे व्हा. स्वतः उठा आणि इतरांना उठवा. मनुष्यजन्म सुफळ करा आणि आपले ध्येय्य साध्य होईपर्यंत थांबू नका!" हे स्वामीजींचे शब्द म्हणजे तरुणांपासून ते शंभर वर्षाच्या माणसाने जीवनात अंगिकारण्यासारखे आहेत! युवकांमध्ये नित्य स्फुल्लिंग चेतविण्याचे महत्कार्य स्वामीजींनी केले. बलदंड देहयष्टी, दैदिप्यमान-विद्वत्प्रचुर व्यक्तिमत्व, अंगावर भगवे वस्त्र आणि भगवा फेटा परिधान केलेले स्वामीजी म्हणजे दिव्यत्वाची प्रतीती! अल्पायुष्यात जगभर व्याख्याने, प्रचंड लेखन यातून "अध्यात्म-विद्या और भारतीय दर्शन के बिना विश्व अनाथ हो जायेगा" असे प्रतिपादन करून स्वामीजींनी भारताच्या ज्ञान समृद्धीला झळाळी दिली. स्वामी विवेकानंद केवळ संत नव्हते तर ते एक महान देशभक्त, विचारवंत, वक्ता, लेखक आणि मानवप्रेमी व्यक्तिमत्व होते! "शिक्षण म्हणजे ज्यातून विद्यार्थी शारीरिक, मानसिक आणि आत्मिक विकसित झाला पाहिजे. शिक्षणातून चरित्र-चारित्र्य घडले पाहिजे. मन-बुद्धी विकसित होऊन विद्यार्थी आत्मनिर्भर बनला पाहिजे. आचरण-संस्कारसंपन्न शिक्षण गरजेचे आहे. शिक्षक-विद्यार्थी संबंध दृढ असावे. शिक्षक अत्यंत महत्वपूर्ण घटक असून तो आनंदी-सहिष्णू-प्रज्ञावंत-निर्व्यसनी असावा, त्याचा चुंबकीय प्रभाव आपल्या विद्यार्थ्यांवर नित्य राहील. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी तंत्रशिक्षण आवश्यक आहे. शिक्षणातून जीवनात संघर्ष करण्याची वृत्ती जोपासली जावी." शिक्षणाविषयी असे मौलिक विचार स्वामीजींनी प्रतिपादन केले. संपूर्ण जीवन केवळ आणि केवळ देशोत्थानासाठी अर्पण केले. स्वामीजींचे जीवन सर्वांसाठी आदर्श, नित्य मार्गदर्शक आहे!

आज एका मातेची आणि सुपुत्राची जयंती साजरी करतांना केवळ पुष्पहार घालून, वंदन करून चालणार नाही. आजही काळ तेव्हढाच खडतर आहे! नवनवी आव्हाने आपल्यासमोर आ वासून उभी आहेत! पैशापायी माणूस आपले सर्वस्व हरवून बसला आहे. मोबाईल नावाच्या राक्षसाने घरदार गिळंकृत केले आहे! माणसांत माणूस राहिला नाही! माणूस बोलायला तयार नाही! गर्दीत सुद्धा माणूस वेड्यासारखा त्या डबड्यासोबत खेळतोय! एकटाच हसतोय! सगळीकडे वेडेच वेडे! जेवतांना अन कुठेपण मोबाईल!

हे चित्र महाभयंकर आहे! आपले आदर्श आईसाहेब जिजाऊ किंवा स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी आपल्याला काही संकल्प करावे लागतील. लहान मुलांना मोबाईलपासून दूर ठेवावे लागेल! घराघरांत ग्रंथ वाचन अत्यावशक आहे. आई-वडिलांनी घरात सकाळ-सायंकाळ मोबाईल बंद ठेवून प्रार्थना म्हणावी लागेल! निरोगी-आनंदी जीवनासाठी सर्वांनाच व्यायाम-योगा-प्राणायाम-ध्यान करावेच लागेल! मोबाईल ऐवजी मैदानावर खेळ खेळावे लागतील. घरातील आई-वडिलांनी पुस्तक घेऊन बसावे लागेल, जेणेकरून घरातील इतर त्याचे अनुकरण करतील! असे झाल्यास घराघरांत जिजाऊ आणि त्यानंतर शिवराय आणि स्वामी विवेकानंद जन्माला येतील, अन्यथा आणखी एक जयंतीचा इव्हेंट पूर्ण होऊन तो कॅमेऱ्यात बंदिस्त होईल, बस्स!

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, कीर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)**

# राजमाता जिजाऊ



मीना शिंदे पाटील
कोपरगाव, अहमदनगर

आधुनिक केसरी

**अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा दैदिप्यमान इतिहास संपुर्ण जगाला ठाऊक आहे. गेल्या ३५० वर्षांपासून जगात प्रमुख योद्धा म्हणून आदर्श असणारे छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातील एकमेव राजे होय. अर्थकारण, धर्मकारण, राजकारण, सांस्कृतिकीकरण, शिक्षण, भाषा असं एकही क्षेत्र नाही जिथे महाराजांच्या कार्याचा ठसा नाही.**

मध्ययुगीन कालखंडात ऐतिहासिक काळात आपले अढळ स्थान प्राप्त करणारे एक सुवर्णगुणसंपन्न व्यक्तीमत्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय, आणि राजेंना हे अढळ स्थान प्राप्त करुन देणाऱ्या त्यांच्या आई म्हणजे मानवतावादी राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब, पण त्यांच्याबद्दल मात्र आम्हाला फारशी माहिती नाही. शिवबास जन्म देण्यापासून ते छत्रपती पदापर्यंत पोहचविणाऱ्या राजमाता जिजाऊ होत्या. राजमाता जिजाऊ माँ साहेबांच्या आयुष्यातील एक निर्धारित सत्य चरित्र म्हणजे शिवचरित्र. "शिवबा अफजलखानाच्या भेटीमध्ये तुम्हाला तुमचा प्राण गमवावा लागला तरी बेहत्तर, पण मागे हटु नका. तुमच्या पश्चात आम्ही शंभुबाळांना राजगादीवर बसवून स्वराज्याचा राज्यकारभार पुन्हा नव्याने सुरळीत करु. असा निर्धार आपल्या मनामध्ये सतत तेवत ठेवणाऱ्या अन् शिवरायांवर ५० वर्षांपैकी ४५ वर्ष मायेचे छत्र धरणाऱ्या जिजाऊ माँ साहेब होय...

काळ उजाडला महाराष्ट्राचा अन् याच महाराष्ट्राच्या मातीत एक जिजाऊ नावाची ठिणगी पडली ती मोघलाईला नेस्तनाबूत करण्यासाठीच... जिजाऊंचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड या गावी दिनांक १२ जानेवारी १५९८ रोजी एका सुवर्ण सकाळी झाला. अरे काय थोर भाग्य त्या सिंदखेडराजाचे की त्याच्या कुशीत या महाराष्ट्राच्या माऊलीने जन्म घेतला. त्यांच्या आईचे नाव म्हाळसाराणी तर वडील लखुजी राजे जाधव होय. जिजाऊंना ४ मोठे भाऊ होते. दत्तोजी, अकलोजी, राघोजी अन् बहादुरजी. जिजाऊंचे तसे सर्वच प्राथमिक शिक्षण, युद्ध शिक्षण, राजनिती भाषा तसेच अनेक खेळ जिजाऊला माहीत होते, त्यांना मराठी, फारसी, कन्नड व ऊर्दू अशा अनेक भाषांचे ज्ञान अवगत होते. अन् हे सर्व शिक्षण त्यांना त्यांच्या आईने दिलेले होते. जिजाऊंचा विवाह सन १६१० मध्ये वेरूळचे शहाजीराजे भोसले यांच्यासोबत मोठ्या थाटात संपन्न झाला. शहाजीराजे हे मालोजी राजे भोसले व उमाबाई मालोजीराजे भोसले यांचे सुपुत्र, शहाजीराजेंचा जन्म दिनांक १८ मार्च १५९४ मध्ये नार या गावी झाला.

भोसले निंबाळकर, महाडीक, शिर्के, सुर्वे हे पिढीजात नातेवाईक होते. सगळेच शुर लढवय्ये होते. पण देवगिरीचे आणि विजयनगरचे मराठ्यांचे राज्य बुडाले आणि सर्वच मराठी योद्धे सोईनुसार आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही यांच्याकडे सरदार, जहागिरी म्हणून सेवेत हजर झाले. परकियांचे वरवंटे यांच्याच छाताडावर का फिरले? यांच्यात धैर्य नव्हते, साहस नव्हते? मग का हे मराठे राज्य लुप्त झाली... परकिय सत्तेसाठी जिजाऊंच्या सासर आणि माहेरच्या लोकांचे रक्त सांडत होते, आणि जिजाऊंना हेच तर नको होतं, स्वराज्याची प्रेरणा मनामध्ये जागृत करुन, त्या मराठी तख्तासाठी जास्त कृतीशील होत गेल्या, जाधवांचे अन् भोसल्यांचे रक्त स्वराज्यासाठी कामी यावे, इतिहास हा एकमेकांच्या रक्ताने न लिहीला जाता, दोघांच्या रक्ताने हा इतिहासात निर्माण व्हावा म्हणून जिजाऊंचे अंतःकरण पिळवटून निघत होते. हे सगळं थांबण्यासाठी एक असा वीर जन्माला यायला हवा... या पातशाहीला पाताळात गाडण्यासाठी... स्वराज्याची स्वप्न उराशी बाळगुन जिजाईने आई शिवाईकडे धाव घेतली... शिवाईचा धावा केला.

***दृष्टजनांचा नाश करण्या,***
***शिवाई तुची एक आधार.***
***शुर पुत्र मज पदरी द्यावा,***
***मिळावा एक ऐसा उपहार.!!!***
***हाकेला ती धावत आली,***
***केले जिजाईंवरी उपकार.***
***धन्य जाहला शिवनेरी मग,***
***घेतला शिवबाने अवतार...***
***कणभर मावळे संगती होते,***
***रायरेश्वराचे पावन केले द्वार.***
***मुघलशाहीची कत्तल करण्या,***
***दिधली भवानीने तलवार...***
***स्वराज्यासाठी झेलत गेले,***
***छातीवरती वार...***
***पराक्रमाने चमकत गेली ,***
***तलवारीची धार...!***
***राजांचे थोर असे उपकार***
***राजांचे थोर असे उपकार***

शिवरायांसारखा बाळ जन्माला घालुन जिजाऊंनी या महाराष्ट्राच्या मातीवर अनंत उपकार केलेत, जिजाऊंचा आशिर्वाद सतत शिवरायांच्या पाठीवर ढालीप्रमाणे सदैव सोबत होता.. येवढेच काय तर, शिवरायांच्या सहचारिणी सईबाई राणी,



दीड वर्षांच्या शंभुबाळांना जिजाऊंच्या पदरात टाकुन अनंतात विलीन झाल्या... बालपणीच मायेला पारखं झालेल्या पोराला वाढविण्याची जबाबदारी आऊसाहेबांवरती आली होती... पाठीवर मरण बांधून सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात वादळासारखा घोंगावणारा शिवरायांसारखा पिता नजरेस सुद्धा पडत नव्हता शंभुबाळाच्या... संकटांवर संकट झेलणारी ही महाराष्ट्राची माऊली जणू सर्वांना तारण्याकरताच जन्माला आली होती... स्वराज्याचे दुसरे छत्रपती घडवण्याची जबाबदारी जिजाऊंच्यावर नकळतपणे येऊन पडली होती. जिजाऊंसारख्या चालत्या बोलत्या विद्यापीठात संभाजी राजे एक कुशल, साहसी योद्धे तयार झाले, स्वराज्याचे दुसरे छत्रपती सुद्धा तयार झाले. जिजाऊंच जीवनचरित्र येवढं छोटही नाही की, जे माझ्या चार ओळींमध्ये पुर्ण होईल. माँ साहेब अखेरच्या श्वासापर्यंत या पितापुत्राची सोबत करत राहील्या. पातशाहीला पाताळात गाडायला भाग पाडणारी ही महाराष्ट्राची माऊली १७ जून १६७४ मध्ये शिवशंभुंना पोरकं करुन अनंतात विलीन झाली.

# रंगीरंगलाश्रीरंग

आधुनिक केसरी

तर सुधा ठाण्याजवळच्या आदीवासी पाड्यातील आदीवासी लोकांसाठी जीवापाड मेहनत घेत होती. आदिवासी विकास हेच आपल्या आयुष्यभराच कामाचं स्वरूप असाव मानणारी सुधा...... "रंगी रंगला श्रीरंग " सुधाच्या मनात सतत आदिवासींच्या कल्याणासाठी अनेक योजना कश्या राबविण्यात आपण किती यशस्वी होऊ ? काय काय करावे लागेल ? सरकारी मदत कशी मिळेल ? काय योजना कराव्यात म्हणजे त्यांचा विकास कसा होईल ? हेच विचार ......साध्या साध्या रोजच्या गरजेच्या वस्तू, मुलांसाठी शिक्षण , दवाखाना काही काही मिळत नाहीत ह्या गोष्टींची तिला सतत खंत वाटायची .... खरंतर सुखवस्तू कुटुंबातून आलेल्या सुधाला असं आदिवासी पाड्यावर जाऊन राहणं कुटुंबातल्या बऱ्याच जणांना खटाकायचे पण सुमतीबाईं आणि अप्पासाहेबांचा पुर्ण पाठिंबा असल्याने कोणी काहीच बोलत नसे.....



सौ. आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

पण नियतीच्या मनात काही तरी वेगळंच होतं..... जगात,गावात कोरोनाचं थैमान सुरू झालं त्यात सुमतीबाई पाठोपाठ अप्पासाहेब पण कालवश झाले. सुधाला कोरोनांच्या नियमांमुळे शेवटच्या क्षणी पण येता आले नाही....... आयुष्यात आपण एकाकी पडलो, आता पाठीवरचा आधाराचा असणारा हातचं नियतीने काढून घेतला ..... ह्या सगळ्या विचारांनी रडू थांबेच ना..... आपण हतबल आहोत आपण जन्मदात्या आईबापांच्या शेवटच्या क्षणी जाऊ शकत नाही, काहीच करु शकत नाही, ह्या विचारातच सुधाला कधी झोप लागली ते कळलेच नाही... पहाटे पहाटे कसल्याशा आवाजाने तीला जाग आली. कोणीतरी सुधामां, सुधामां या नावाने हाक मारत होते.... पहाटेचे चार वाजत आले होते.... आपलं दुःख लपवत ती तशीच उठली . दारात दोन आदिवासी मुली घाबऱ्याघुबऱ्या अवस्थेत हाका मारत होत्या..... दार उघडून मुलींना आत घेत त्यांची विचारपूस करायला सुरुवात केली.....खुर्चीवर बसवुन पाणी आणायला आत गेली. पाणी पिऊन झाल्यावर दोघींनी आपबिती सांगायला सुरुवात केली. **क्रमशः**

# काळाची गरज- माँ जिजाऊ



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**जिजाऊ माँ साहेब म्हणजे आदर्श समाज व्यवस्था निर्माण करणाऱ्या राजमाता. जिजाऊ मॉ साहेब ह्या आजच्या व्यवस्थेला अत्यावश्यक आहेत. कारण फक्त स्वराज्यच नाही तर स्वराज्यातुन संस्कारी समाज घडवणाऱ्या राजमाता म्हणजे मॉ जिजाऊ होत. मॉ जिजाऊंचे कार्य व विचार हे जनकल्याणाचे व मानवतावादी होते. म्हणुनच येथे स्वराज्य उभे राहु शकले. आणि असे स्वराज्य ज्याला चारशे वर्षेहोऊनही आजही त्या स्वराज्याची आठवण आहे. काय होते स्वराज्यामध्ये याचा विचार जरी केला तरी मन प्रसन्न होते आणि आणि मन स्वाभिमान, गर्वाने भरून येते. कारण स्वराज्यामध्ये होता स्त्रिसन्मान, स्त्रियांचा आदर.**

राजमाता जिजाऊ यांनी जे संस्कार छत्रपती शिवाजी महाराज व मावळे यांच्या वर घातले होते ते संस्कार समस्त स्त्रि जातीचा सन्मान करणारे होते. शत्रुच्या स्त्रियांचा सन्मान छत्रपती शिवाजी महाराज करायचे. शत्रुच्या स्त्रियांना साडी चोळी देऊन मानसन्मान करून सुखरूप घरी पोहण्याचा इतिहास आहे. परंतु आजची परिस्थिती बघितली तर कामाच्या ठिकाणी, घरामध्ये, शाळेमध्ये, महिला आपल्याच ओळखीच्या लोकांसोबत सुरक्षित नाही. राजकीय पक्षातील नेते त्यांच्या च पक्षातील स्त्रियांचे शारीरिक, माणसिक शोषण करून शेवटी बदनामी करण्याची धमकी ही देतात. स्त्रियांचे शोषण करण्यात नव्हे स्त्रियांचे रक्षण करण्यात खरा मर्दपणा आहे हि शिकवण आम्हाला मॉ जिजाऊंचा इतिहास देतो.

आज महिला शिक्षीत होऊनही अंधविश्वासामध्ये एवढ्या गुंतुन गेल्या की अंधविश्वास य विषयावर बोलले तरी त्या पाप माणतात. उपासनेच्या नावाखाली अंधश्रद्धा जोपासली जाते. सत्य असत्यामधला फरक न करता असत्याचा स्विकार करून त्याभोवती च फिरले जाते वेगळे विधी होम हवम करून सुख व समाधान मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु मॉ जिजाऊ यांनी नेहमी प्रयत्न आणि कर्म यांना महत्त्व देऊन प्रयत्नवादी संस्कार दिले परंतु आजही महिला दैववादी आहेत याची खंत आहे. कोणतेही काम करताना शुभ अशुभ पंचाग बघून करतात परंतु स्वराज्याची एकही लढाई पंचाग वा होम हवन करून झाली नाही हा विज्ञानवाद समाजामध्ये रुजवणे आवश्यक आहे. व्रतवैकल्ये करून आजही काही महिला काल्पनिक शक्तिवर विश्वास ठेवतात. परंतु आपल्याला काही मिळवायचे असेल तर प्रयत्न करावेच लागतील. स्वराज्य निर्माण व्हायचे असेल तर होईल अशी दैववादी आशा न बाळगता स्वराज्य निर्माण करायचे आणि त्या साठी शिवबांच्या हाती तलवार देऊन पहिला यशस्वी प्रयत्न केला. महिलांनी जिजाऊंचा आदर्श घेऊन विज्ञानवादी व प्रयत्न वादी बनावे. आपल्या जे पाहिजे ते प्रयत्न केल्यानेच मिळते नाही की व्रतवैकल्ये. ज्या वेळी स्त्रियांना घराच्या बाहेर पाऊल टाकण्याचा अधिकार नव्हता त्या काळात मॉ जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना तलवार चालवणे, घोड्यावर बसणे शिकवले. कोणत्याही प्रकारचे सामाजिक माध्यमे नसताना संघटन बांधणी शिकवली. पण आज खंत आहे महिलांना बाहेर फिरण्याचे स्वातंत्र्य आहे तरीही अपवाद वगळता महिला स्वातंत्र्य असुन सामाजिक विषयावर बोलत नाहीत, राष्ट्रहित, जनहिताच्या गोष्टी हल्ली घरातून लुप्त होऊन अनेक सिरियल द्वारे संकुचित व मर्यादित विचाराची पेरणी महिला व त्यांच्या मार्फत लहान मुलांच्या मनात होत आहे. असे असताना जनहीत राष्ट्रहिताची भावना कुठे निर्माण होणार हा चिंतनाचा विषय आहे. कारण आज संपर्काचे अनेक माध्यम आहेत, अनेक सामाजिक समस्या आहेत, महिलांना स्वातंत्र्यासोबत संरक्षण आहे तरीही महिला संघटीत होऊन देशहीत, जनहिताच्या विषयावर चर्चा, संघटन करत नाहीत. म्हणून कधी कधी प्रश्न पडतो. जिजाऊंच्या स्वराज्यात राहणाऱ्या महिलांना जर जिजाऊंचे विचार कार्य याबद्दल जाणिवच नसेल आणि जाणीव असुनही जर महिला त्यावर बोलायला लिहायला तयार नसतील तर सामाजिक संस्कार व सामाजिक



प्रेरणेची अपेक्षा कोणाकडून करायची. आपल्या शेजारी कोण राहतो याची ही माहिती न ठेवणारे आपण जिजाऊंनी त्यावेळी मावळ्यांची सामाजिक बांधनी कशी केली असेल याचा विचार करतो का? लाखो फॉलोअर्स असुन गल्लीमध्ये आपल्याला कोणी ओळखत नाही किंवा आपले कोणी ऐकत नाही याचे कारण आपण शोधून काढली पाहिजे. कारण चारशे वर्ष झाली तरी आम्हाला स्वराज्य हवे हवेसे वाटतं याचे उत्तर जिजाऊंना वाचले, जानुन घेतले तर नक्कीच कळेल.

युद्धकला, गनिमी कावा शिकवून कमी हानी मध्ये जास्तीत जास्त स्वराज्याचा फायदा कसा करायचा याचे प्रशिक्षण मॉ जिजाऊ द्यायच्या. स्वराज्याच्या मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मॉ जिजाऊ राहिल्या. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वराज्य उभे करताना विषमता गाडून टाकली. धर्मनिरपेक्ष स्वराज्य उभे केले. अठरा पगडजातींची स्वराज्याची फौज उभी करताना मावळे या छताखाली सर्वांना एकत्र करून एकच ओळख निर्माण करून दिली. जाती धर्माला स्वराज्या मध्ये कुठेही स्थान नव्हते. आज आपण देशामध्ये बघतोय धार्मिक आणि जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करून राजकीय पोळी भाजून घेतली जाते. परंतु स्वराज्यामध्ये सामाजिक तेढ निर्माण करणारे वा जातीधर्मावर पोळी भाजणारे कोणीच नव्हते. अठरा पगडजातीचे लोक सैन्यामध्ये होते. मुस्लिम लोक छत्रपती शिवाजी महाराज यांचे अंगरक्षक होते तर आरमार प्रमुख सुद्धां मुस्लिम होते. आज जो छत्रपतींचा चुकिचा इतिहास समोर करून समाजात दुरावा निर्माण करून राजकीय पोळी भाजुन घेतली जात आहे परंतू यामुळे इतिहासाची मोडतोड होऊन चुकिचा इतिहास समोर येत आहे याचे गांभीर्य आज राहिले नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला हा इतिहास आहे ना कोणी नाकारू शकत नाही परंतु अफजल खान मुस्लिम होता म्हणून काढला हे सांगणे चुकिचे आहे. अफजल खान हा स्वराज्याचा शत्रु होता, तो कुटील आणि निच असुन दगाबाज होता म्हणून भेटीच्या निमित्त करून तो छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शी दगाफटका केला परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रसंगावधान राखुन त्याचा कोथळा बाहेर काढला.

तो शत्रु होता म्हणून मुसलमान होता म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांनी कधी कोणाचा द्वेष केला नाही तर मुसलमानांचा सन्मान करणारे छत्रपती शिवाजी महाराज होते आणि हि शिकवण मॉ जिजाऊ यांची होती. आजच्या शोषणकर्त्ये राजकारणी इतिहसाचा अवमान करत आहेत. स्वराज्य जर मुसलमान यांच्या विरोधात होते तर छत्रपती शिवाजी महाराज यांना अफजलखान हा कुटील आहे असे सांगणारा कोण? छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साठी वाघनखे बनवणारा कोण? याचे उत्तर जरी शोधले तरी स्वराज्यातील धर्मनिरपेक्षतेची महती आपल्याला कळते. आणि हे सर्व शक्य झाले फक्त आणि फक्त मॉ साहेब यांच्या प्रेरणा, प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळेच. म्हणून मॉ जिजाऊ आजही आम्हाला फक्त वंदनीय नाहीत तर प्रेरणा, उर्जा आणि मार्गदर्शक सुद्धां आहेत. आजच्या व्यवस्थेमध्ये जिजाऊंच्या विचाराची व कार्याची पेरणी करून आज जो धर्म जात या नावाखाली गोंधळ सुरू आहे तो थांबण्यासाठी आजही उपयुक्त येतील ते मॉ जिजाऊ चे विचार. म्हणून मॉ जिजाऊ यांना जयंती दिनी मानवंदना देऊन त्यांचे विचार घराघरात पोहचण्यासाठी व भरकटलेल्या राजकारण्यांना वठणीवर आणण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले तर मॉ जिजाऊ यांना वंदन केल्याचे मनोमन समाधान मिळेल.

# धर्मनिरपेक्षतेची शिकवण देणाऱ्या राजमाता जिजाऊ

आधुनिक केसरी



रोशणी डाबजे

**राजमाता जिजाऊ हे फक्त नाव नाही तर स्वराज्याची संकल्पना डोक्यात आणून प्रत्यक्ष डोळ्यांनी स्वराज्य बघणाऱ्या जिजाऊ या धर्मनिरपेक्ष समाजाची निर्मिती करणाऱ्या बहुजन समाजाच्या आई आहेत. बहुजन समाजाला मातेचे प्रेम आणि गुरुची प्रेरणा देऊन स्वराज्य निर्मिती साठी पाया भरणी केली आणि या स्वराज्याच्या पायाभरणी ची सुरवात स्वतःच्या मुलापासून म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांपासून केली.**


आज महिला आपल्या मुलाच्या हातात मोबाईल व टिव्ही चे रिमोट देऊन मुलाला दरवाजाची चौकट ओलांडू देत नाहीत जिजाऊ माँ साहेब होत्या कवळ्या हातात तलवार देऊन गडकिल्यावर चढणे उतरणे आणि घोड्यावर बसून तलवार चालवणे असे साहसी प्रशिक्षण देत होत्या. राजमाता जिजाऊ म्हणजे एक आई, शिक्षक, मार्गदर्शक आणि प्रेरणा स्थान अशा प्रकारे वेगवेगळ्या मुभिका पार पाडणाऱ्या खऱ्या अर्थाने त्या स्वराज निर्मिती च्या मुख्य आधार होत्या. १२ जानेवारी ला माँ जिजाऊचा जन्म झाला आणि सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कारण सिंदखेडराजा येथील जाधव कुटुंब ज्या घरात जिजाऊंचा जन्म झाला ते घराणे सुद्धां पुरोगामी विचाराचे होते म्हणून ज्या काळी मुलगी जन्माला येणे पाप मानले जायचे त्या वेळी जाधव कुटुंबीयांनी हत्तीवरून सारख वाटली आणि जिजाऊंच्या जन्माचे स्वागत केले आणि याच जिजाऊ समोर स्वराज्य संकल्पक व स्वराज्याचे आधारस्तंभ झाल्या.

स्वराज्य निर्माण करायचे, जनतेचे हीत साधायचे म्हणजे आपल्याला सर्वात महत्वाचे म्हणजे लढाई करता आली पाहिजे आणि आपल्या कडे सैन्य पाहिजे. म्हणून सर्वात अगोदर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हातात तलवार देऊन स्वराज्याची पहीली विट रचली. आजच्या समाजाला मॉ जिजाऊ यांच्या कडून अनेक गोष्टी शिकण्यालायक आहेत. म्हणून मॉ जिजाऊ यांची जयंती साजरी करताना फक्त फोटो ला हार घालून चालणार नाही तर त्यांचे विचार स्वतः स्विकारून समाजात त्याची पेरणी करणे म्हणजे मॉ साहेब यांची जयंती साजरी करणे होय. परकीयांचे वर्चस्व, अन्याय झुगारून देऊन स्वतः चे स्वराज्य निर्माण कसे करायचे यासाठी छत्रपती शिवबाच्या माध्यमातून जात न बघता गुणांच्या आधारावर अठरा पगड जातीचे मूल एकत्र जमवुन त्यांना मावळे ही ओळख दिली आणि जातीव्यवस्थेची उतरंड तोडून सर्वांना समतेचा संदेश दिला. आजच्या दिनी एवढा संदेश जरी लोकांना कळाला आणि लोकांनी जिजाऊंना वंदन करताना ठरवले मी जाती धर्माला महत्त्व न देता कर्माला महत्त्व देईल तर जिजाऊ जयंती साजरी केल्याचे सार्थक होईल. आजच्या राज्यकर्त्यांसाठी राजमाता जिजाऊ हे आदर्श उदाहरण आहेत. हल्लीच्या राजकारणात जाती धर्माला महत्त्व देऊन जन कल्याणाच्या कामावर दुर्लक्ष केले जाते. आणि जिजाऊंच्या शिकवणी नुसार जाती धर्माच्या लोकांना एकत्र करून एकच ओळख देऊन त्याच्या क्षमतेनुसार त्याला कामे देऊन राजेशाहीतही जनहित साधले जायचे हि शिकवण मॉ जिजाऊंची. स्वराज्याच्या व जनकल्याणाच्या विरोधात जो जाईल तो शत्रु म्हणून शत्रुला मग त्याची जात धर्म कोणताही असो. आणि वेगवेगळ्या जातीमधील लोक मावळे या शब्दांनी एक होऊन स्वराज्यासाठी कितीमोठे योगदान दिले याला इतिहास साक्ष आहे. राजेशाही असूनही जिजाऊंच्या संस्कारामधुन निर्माण झालेले मावळे शत्रुच्या स्त्रियांचा देखिल सन्मान करायचे, शेतकऱ्यांच्या पिकाची कोणतीच हाणी होऊ देत नव्हते.

आजची परिस्थिती बघितली तर महिला बलात्कार, शेतकरी आत्महत्या वाढल्या तरी सरकार ला काही फरक पडत नाही. कोणतीही शाळा नसताना मावळ्यांवर सामाजिक संस्कार घालुन मानुसकी शिकवणाऱ्या मॉ जिजाऊ आजही देशाला आदर्श आहेत. पुन्हा शिवशाही निर्माण होण्यासाठी आम्हाला आजही एक जिजाऊ पाहिजे. आणि हि जिजाऊ घराघरात निर्माण होण्यासाठी द्वेष, जातीधर्माची विषमता या गोष्टी सोडून पुन्हा स्वराज्यात मावळ्यांची फौज तयार करून विषमतेवर द्वेषाच्या राजकारणावर प्रहार करण्यासाठी अगोदर महिलांच्या डोक्यात समतावादी समाजरचना रुजने आवश्यक आहे. आज जिजाऊ जंयती दिनी जिजाऊंचे धर्मनिरपेक्ष विचार जरी समजले आणि ते विचार स्वतःच्या घरात जरी रुजवले तर जिजिऊंचे विचार सर्वदुर पोहचून जिवंत राहतील आणि खऱ्या अर्थाने हीच जिजाऊंना जन्मदिनाची मानवंदना असेल. मॉ साहेब जिजाऊ यांच्या जयंती निमित्ताने बहुजन समाजाला हार्दिक हार्दिक सदिच्छा...

# तीळगूळ घ्या गोड बोला...

आधुनिक केसरी



सुजाता नवनाथ पुरी
अहमदनगर
संपर्क 8421426337

**या वर्षीचा पहिला सण आता खूप जवळ आलाय,म्हणजे याच आठवड्यात त्याची सुरूवात होतेय भोगीपासून..म्हणूनच सर्वांना या सणाच्या निमित्ताने खूप खूप शुभेच्छा... असे म्हणतात की त्याचं त्याच नेहमीच्या वातावरणात उल्हास निर्माण करतात ते सण असतात...आपणही गेल्या वर्षभरापासून एका अनामिक भीती आणि अनिश्चिततेच्या सावटाखाली आहोत. नवीन वर्ष जरी सुरू असले तरी त्याचे थोडेफार सावट अजूनही आहेच कारण चीन मधे परत कोरोनाच्या नव्या व्हेरियंत ने आगमन केलय पण आपल्या कडे लसीकरण खूप चांगले झाले आहे.**

मानवी प्रवृत्ती ही मुळातच उत्साही आणि आनंदी असल्याने येणारा हा सण आपल्यासाठी निश्चितच आनंदाचा ठरणार आहे.. या सणाचे महत्त्व म्हणजे या सणाला तिळगुळ वाटतात आणि गोड बोला असं एकमेकांना म्हणतात.. निदान या निमित्ताने का होईना माणसं एकमेकाशी दोन शब्द का होईना पण गोड बोलतात हेही नसे थोडके... गोड बोलण्याचे खूप प्रकार आहेत,म्हणजे त्यावर एक संशोधन निबंध तयार होईल असे म्हणा..फक्त ते आपल्याला कळायला हवं इतकंच...

कामापुरती गोड बोलणारी माणसं असतात तशी गोड बोलून काम करवून घेणारी ही माणस असतात... जिभेवर साखर ठेवून संकटात टाकणारी माणस ही असतात बर का....चुकीला चूक न म्हणता गोल गोल फिरणारी माणस ही गोड च बोलत असतात...अबब किती हे गोड बोलण्याचे प्रकार...मग तिळगुळ देताना नेमके कोणत्या पद्धतीचं गोड बोलायचं असतं असा प्रश्न पडतो... संत तुकाराम महाराजांनी असे म्हटले आहे की, आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ,शब्दांचीच शस्त्रे...

कुणाचे कौतुक असो,शाबासकी असो किंवा आनंदाचा आणि दुःखाचा कोणताही प्रसंग असो यामध्ये साथ निभावना रे फक्त आपले शब्दच असतात... माणसं पारखंन ही जशी एक कला आहे तशीच गोड बोलणारी माणसं कोणत्या भावनेने गोड बोलतात हे कळने सुद्धा एक कलाआहे. शब्द घाव भरतात आणि शब्द घाव सुध्धा घालतात ..म्हणजे शब्द हे शस्त्र आपण कसे वापरतो यावर अवलंबून आहे.... गोड बोलणारी माणस सगळ्यांनाच आवडतात....कडू गोळी कधीच कुणाला आवडत नाही पण गुण येण्या साठी तीच तर महत्वाची असते....पण हे लवकर कळत नाही.... अशा गोड बोलण्याचा काय फायदा ज्या मुळे हृदयातल्या जखमा पुन्हा रक्ताळल्या जातात.. **बोलतोस तु मधाळ केवढा परंतु काळजात तुझ्या गाळ केव्हढा** मनात एक भावना ठेवून वर वर गोड बोलणारी माणस ही आपल्या जखमेवर मीठ चोळण्याचा च प्रकार करत असतात... त्या पेक्षा स्पष्ट शब्दात बोलणारी, कटू शब्द वापरणारी व्यक्ती नक्कीच चांगली असते.. ओठात एक आणि पोटात एक अशा दुहेरी व्यक्तिमत्त्व असलेल्या माणसांचा फायदा होण्याऐवजी आपल्याला तोटाच होत असतो.. म्हणूनच गोड बोलणारी माणसे कोणत्या हेतूने बोलत आहेत हे लक्षात येणे अत्यंत महत्त्वाचे आहे... त्यांचा कार्यभाग साधून घेण्याकरता त्यांनी घेतलेला हा बुरखा असतो असेच म्हणावे लागेल.

स्वच्छ मनाने आणि प्रामाणिक भावनेने बोलले गेलेले गोड शब्द दुःखात असणाऱ्या माणसाला जगण्याची प्रेरणा देतात ऊर्जा देतात आणि जगण्याची नवसंजीवनी देतात..

जीवनाचा प्रवास खूप छोटा आहे त्यातही कोणाचा प्रवास कधी संपेल याची पुसटशीही कल्पना कोणी कोणाला देऊ शकत नाही..म्हणूनच जीवनाच्या प्रवासात साथ देत असतात ते शब्दच असतात ..स्वच्छ पाण्याचा तळ दिसला की सगळं स्पष्ट होतं, तसच बोलणाऱ्याच्या भावना शुद्ध असतील तर गोड शब्द अमृतात रूपांतरित होतात.. परंतु फक्त धोका देण्यासाठी बोलले गेलेले गोड शब्द हे एक प्रकारचे पापच ठरते... असे म्हणतात की *नियती नावाचे एक न्यायालय आहे, जिथे छक्केपंजे चालत नाहीत की तारखा मागे-पुढे करता येत नाहीत, जबाब फिरवता येत नाहीत. ज्या हातांनी केल्या जातं फेडावही त्याच हातांना लागतं. म्हणूनच गोड बोलून दुसऱ्याला फसवणा ऱ्यांनी नियती चा न्याय उशिरा का होईना पण होत असतो याचे भान जरुर ठेवावे.. **विस्तवासही नसेल कल्पना, शब्द लावतात जाळ केवढा...** समोरच्या माणसाने आपला अपमान होईल असे शब्द वापरले की विस्तव लावत नाही तेवढी आग हृदयात लागते.म्हणूनच समोरच्या माणसाला सुध्दा मन आणि भावना आहेत याचे भान बोलणार याने जरूर ठेवावे.. **अपने जखम किसीको दिखाया ना करो, लोग मुठी मे नमक लिये घुमते है...** आपली दुखे आपल्या वेदना आपण सांगत असताना गोड बोलून ऐकणारी माणसे मात्र आपल्या खोट्या वागण्याने त्यावर मीठच चोळत असतात तर काही विखारी शब्दांनी वार करत असतात.. गोड बोलन्या हून निघालेला आपला विषय तिखट बोलण्यावर कधी आला हेही समजले नाही... अति सर्वत्र वर्जते... या म्हणी प्रमाणे आपणही चांगल्या आणि प्रामाणिक भावनेने आणि स्वच्छ हेतूने नेहमी समतोल शब्द वापरले तर प्रश्नच उद्भवणार नाही...शेकोटी जवळ बसणारा माणूस हा त्या शेकोटिकडून उब मिळेल या आशेवर बसलेला असतो... उबे ऐवजी चटके बसायला लागले की तो आपोआपच शेकोटी पासून दूर होतो तसचं दुखः ने तुमच्या जवळ आलेला माणूस तुमच्याकडून मायेची उब मिळेल या आशे वर असतो....आता त्याला उब द्यायची की चटके हे आपले शब्द ठरवीत असतात.. म्हणूनच या संक्रांतीला विचारांचे संक्रमण करूयात.. मनापासून स्वच्छ भावनेने, निर्मळ मनाने एकमेकांशी सर्व हेवेदावे विसरून गोड बोलूयात... सर्वांना मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा...

# विवेकानंदांचे प्रेरणादायी विचार आणि आजची तरुण पिढी



डॉ. ज्योती रा. रामोड
संपर्क क्र. 9673774269

आधुनिक केसरी

**प्राचीन काळापासून ते आजपर्यंत इतिहासात अशी साक्ष मिळते की व्यक्ती ज्या वातावरणात वाढतो तसाच तो त्याच्या भविष्यात घडत जातो. आपल्या जीवनाचे खरे शिल्पकार हे आपल्यातील सकारात्मक विचार होय. मन, मस्तिष्क आणि मनगट यांचा संगम योग्य वेळी आणि योग्य प्रकारे जर झाला तर समाजात व्यक्तीची प्रगती होण्यापासून कोणीही त्याला थांबवू शकत नाही. शिक्षणाचे स्वरूप काळानुसार बदलत जाते. प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ आणि आधुनिक काळ याच्यात घडून आलेले नवपरिवर्तने आपण आजही अभ्यासत असतो. या सृजनशील झालेल्या परिवर्तनातून राजकीय, सामाजिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक, धार्मिक, नैतिक, मौलिक, शैक्षणिक, सांस्कृतिक बदल घडून आलेले दिसून येतात. शिक्षण या शब्दाचा अर्थ खूप गहन आहे. 'शि' म्हणजे शिस्तप्रिय, 'क्ष' म्हणजे क्षमताधिष्टीत, 'ण' म्हणजे न्यायपूर्ण या त्रिवेणी एकात्मतेतून व्यक्तीची वैचारिक क्षमता विकसित होते. फक्त शिक्षणातून व्यक्ती पुढे जाऊ शकतो पण संस्कारक्षम शिक्षणातून व्यक्ती समाजाला पुढे घेऊन जाऊ शकतो. पूर्वीपासून बदलत गेलेला काळ, आव्हाने, प्रश्न, समस्या या वेगवेगळ्या स्वरूपाच्या आहेत. बदललेल्या विचार पातळीचे प्रतिबिंब समाजात प्रतिबिंबित होते. स्वामी विवेकानंदांचे विचार हे प्रेरणादायी आणि समाजाला वेगळी दिशा देणारे आहेत.**

जीवनात ध्येयाकडे जाणारी वाट कितीही खडतर असली तरी ध्येय गाठेपर्यंत शांत बसू नये. हा मूलभूत विचार आपल्या अनुभवातून विवेकानंदानी समाजाला दिलेला आहे. आजच्या तरुण पिढीचा विचार करता कमीत कमी कष्टामध्ये लवकरात लवकर यशस्वी होण्याचा मानस दिसून येतो. ज्या वेळेला या तरुण पिढीला यश प्राप्त होतं नाही त्यावेळेला ही तरुण पिढी नैराश्यकडे वळलेली दिसून येते. त्यामुळे आजच्या तरूण पिढीला योग्य मार्गदर्शन, दिशा, प्रेरणा मिळण्यासाठी स्वामी विवेकानंदांचे प्रेरणादायी विचार त्यांच्या जीवनात आणि आचरणात रुजवणे खूप महत्त्वाचे आहे. कुशाग्र बुद्धिमत्ता आणि अपार कष्ट याच्या बळावर व्यक्ती समाजात किती पुढे जाऊ शकतो याचे आदर्श उदाहरण म्हणजे स्वामी विवेकानंद होय.

स्वामी विवेकानंदांची विचारसरणी अतिशय प्रगल्भ होती. स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा प्रभाव केवळ भारतावर नाही तर जगावर आहे. स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरणादायी विचारातून समाज विकासाला वेगळी दिशा मिळालेली आहे. हिंदू धर्माचा प्रसार आणि संस्कृतीचा वारसा जगाला आपल्या कार्यातून दिला आहे. स्वामी विवेकानंदांची विचारसरणी आजच्या तरुण पिढीमध्ये रुजविणे. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांच्या प्रभावाची जाणीव तरुणांना करून देणे. स्वामी विवेकानंदाच्या प्रेरणादायी विचारातून समाजाला विकासात्मक दिशा देणे. हिंदू धर्माचा सांस्कृतिक वारसा जतन करणे आणि पुढच्या पिढीला देणे.

जीवन परिचय

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कलकत्ता येथे झाला. त्यांचे घरचे नाव नरेंद्र दत्त होते. त्यांच्या आईचे नाव भुवनेश्वरीदेवी दत्त तर त्यांचे वडील विश्वनाथ दत्त यांचा पाश्चात्य संस्कृतीवर विश्वास होता. आपला मुलगा नरेंद्र याला इंग्रजी शिकवून त्याने पाश्चात्य सभ्यतेच्या पद्धतीवर चालावे अशी त्यांची इच्छा होती. नरेंद्रची बुद्धी लहानपणापासूनच तीक्ष्ण होती आणि ईश्वर प्राप्तीची तळमळही प्रबळ होती. पाश्चात्य जगाला वेदांत आणि योगाच्या भारतीय दर्शनांचा परिचय करून देण्यात प्रमुख भूमिका निभावली. येणाऱ्या प्रत्येक पिढीला जगण्याची प्रेरणा त्यांच्या विचारातून मिळते. म्हणूनच स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस हा युवक दिन म्हणून साजरा केला जातो.

कार्यप्रणाली



एक तरुण तपस्वी म्हणून परदेशात भारतीय संस्कृतीचा सुगंध पसरविणारे स्वामी विवेकानंद हे साहित्य, तत्वज्ञान आणि इतिहासाचे प्रकाण्ड विद्वान होते. स्वामी विवेकानंदानी 'योग', 'राजयोग' आणि 'ज्ञान योग' असे ग्रंथ तयार करून तरुण जगाला एक नवीन मार्ग दिला आहे, ज्याचा प्रभाव युगानुयुगे सर्वसामान्यांवर असेल. कन्याकुमारी येथे बांधलेले त्यांचे स्मारक अजूनही स्वामी विवेकानंदांच्या महान कार्याची कथा सांगते. स्वामी विवेकानंद अशा विचारसरणीचे व्यक्तिमत्त्व होते. ज्यांनी अध्यात्मिक, धार्मिक ज्ञानाच्या बळावर आपल्या दृष्टीद्वारे सर्व मानवी जगताला जीवन जगणे शिकवले. तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचे असलेले स्वामी विवेकानंदांचे विचार खूप प्रभावी होते, जर एखाद्याने त्यांच्या जीवनात त्यांचे विचार लागू केले तर यश निश्चितच प्राप्त होते.

स्वामी विवेकानंदाचे गुरू रामकृष्णांनी एका कागदाच्या कपट्यावर लिहिले, `नरेंद्र लोक शिक्षणाचे कार्य करील.' काहीसे आढेवेढे घेत नरेंद्रनाथ त्यांना म्हणाले, "हे सारे माझ्याने होणार नाही." रामकृष्ण त्यांना लगेच दृढपणे म्हणाले, होणार नाही? अरे तुझी हाडं हे काम करतील." पुढे रामकृष्णांनी नरेंद्रनाथांना संन्यासदीक्षा देऊन त्यांचे नामकरण `स्वामी विवेकानंद' असे केले. त्यावेळेपासून त्यांच्या जीवनाचे लक्ष्य फक्त धर्माचा प्रसार करणे आणि लोकशिक्षण देणे हे झाले. याच उद्देशाने रामकृष्ण मठाची स्थापना श्री. रामकृष्णांच्या महासमाधीनंतर स्वामी विवेकानंदांनी आपले एक गुरुबंधू तारकनाथ यांच्या मदतीने कोलकात्याजवळील वराहनगर या भागात केली. ब्रह्मांडातील सर्व शक्ती आपल्यातच आहे ते आपणच आहोत जे डोळ्यावर हात ठेवुन म्हणत आहोत की समोर काळोख आहे. स्वामी विवेकानंदांच्या या विचारातुन व्यक्तीला स्वतःच्या आंतरिक शक्तीची जाणीव होते. स्वतःचा विकास तुम्हाला स्वतःलाच घडवावा लागेल ना कोणी तो शिकवतो ना कोणतेही अध्यात्म ते घडवून आणते. व्यक्तीचे विचार हे त्याच्या जीवनात खूप महत्वाचे ठरतात तो जसा विचार करतो तसाच घडत जातो किंबहुना तसे घडण्यासाठी तो धडपड करतो. आजच्या तरुण पिढीत कमी झालेली जिद्द, प्रसार माध्यमांचा वाढता वापर, कष्टाची कमतरता , चिंतन - मनन यांच्यापासून दूर चाललेली पिढी प्रगती पासूनही दुरावत आहे. समाजात जीवन जगत असताना प्रत्येक मानवाला चिंतन करण्याची गरज आहे चिंता करण्याची नाही कारण या चिंतनातून नव्या विचारांना जन्म मिळतो. आजच्या तरुण पिढीला त्यांच्या कार्यक्षमतेची जाणीव करून देण्यासाठी यशाचा मार्ग दाखवण्यासाठी या विचारांना आत्मसात करणे अत्यंत गरजेचे आहे. समाजाच्या धार्मिक जीवनाला कलाटणी देणारा विचार म्हणजे प्रत्येक वेळी देवाचं नामस्मरण करणारा व्यक्ती धार्मिक नसतो तर सत्य मार्गाने चालणारा व्यक्ती धार्मिक असतो. आजच्या समाजामध्ये सत्यधर्माची ही विचारशैली आणि त्या पाठीमागचा उद्देश समजून सांगणे खूप गरजेचे आहे.

11 सप्टेंबर 1893 रोजी अमेरिका शहरातील शिकागो - आर्ट इन्स्टिट्यूट येथे सर्वधर्मीय परिषद भरली होती त्या सभेला विवेकानंद गेले. तेथे त्यांनी "अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिनींनो" अशी भाषणास सुरुवात केली आणि सभेसाठी जमलेल्या सुमारे सात हजार लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला, जो दोन मिनिटे अखंड चालू होता. "जिने जगाला सहिष्णुता आणि वैश्विकतेचा स्वीकार करण्याची शिकवण दिली आहे, अशा सर्वात प्राचीन असणाऱ्या संन्याशांच्या वैदिक परंपरेच्या वतीने, मी जगातील नवनिर्मित राष्ट्रांचे स्वागत करतो" या शब्दात त्यांनी आपले व्याख्यान पुढे चालू केले. ह्या परिषदेत विवेकानंदांनी सनातन धर्माचे प्रतिनिधित्व करताना, वेदान्तावर व भारतीय संस्कृतीवर व्याख्यान दिले. त्यांच्या या अलौकिक व्याख्यानाने अमेरिकेतील वृत्तपत्रांचे लक्ष वेधून घेतले. या वृत्तपत्रांनी स्वामींचे वर्णन 'भारतातून आलेला एक वादळी व्यक्तिमत्त्वाचा संन्यासी' असे केले.

सामाजिक विज्ञान, इतिहास, धर्म, कला, साहित्य याचे सखोल ज्ञान स्वामी विवेकानंद यांना होते. ध्यान, योग, मनन, चिंतन याद्वारे समाजाला प्रगतीचा मार्ग दाखविला. करुणा, निर्भयता, कुशाग्र बुद्धिमत्ता, ज्ञान, सेवा, कर्मठता या सर्व गुणांच्या संगमातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडलेले आहे. समाजात उत्तम जीवन जगण्यासाठी व्यक्तीला स्वतःच्या जीवनाचे नियोजन करावे लागते यासाठी मार्गदर्शक असे स्वामी विवेकानंदांचे विचार आहेत. आपले जीवन हे फक्त आपल्यासाठीच नाही तर ते समाजासाठी आहे. विश्वबंधुत्व, विश्वकल्याण, विश्वसमर्पकता या गुणांचा विकास व्यक्तीचा ठाई त्यांच्या जीवन प्रवासातून समर्पकपणे होतो.

आजच्या सध्यस्थितीत शाळेपासून ते महाविद्यालयीन जीवन जगणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंद यांचे विचार नवसंजीवनी देणारे आहेत. येणारी प्रत्येक पिढी सृजनशील आणि कार्यक्षम बनविण्यासाठी आणि मानवतेच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी स्वामी विवेकानंद यांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. प्रत्येक माणसाने नवीन विचार शैली स्वीकारली पाहिजे पण संस्कार मात्र जुनेच असले पाहिजे. म्हणजे प्राचीनतेला आधुनिकतेचे धागे जोडणारी विचारशैली समाजाला स्वामी विवेकानंद यांनी दिलेली आहे. नाव आणि ओळख छोटी असली तरी चालेल पण ती स्वतःची असावी ही जाणीव प्रत्येक तरुणांमध्ये त्यांच्या विचारातून निर्माण होते. जीवनात जितका जास्त संघर्ष असतो विजय तितकाच शानदार असतो. त्यामुळे आजच्या तरूण पिढीने संघर्ष करून यशाची शिखरे गाठली पाहिजेत असा मार्मिक संदेश स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरणादायी विचारातून मिळतो.

स्वामी विवेकानंदांनी वेदान्ताकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. निस्वार्थी मानवसेवा हाच खरा धर्म होय, असे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. भारतातील राष्ट्रीय चळवळी, आध्यात्मिक चळवळी व इतर सामाजिक सेवाकार्ये या सगळ्यांच्या मागे प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरीत्या स्वामीजींची प्रेरणा होती व आजही आहे. पाश्चिमात्य जगात त्यांनी भारताचे आध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील दूत म्हणून भूमिका बजावली. मानव हा त्याच्या विचारांनी श्रेष्ठ आणि कनिष्ठ ठरत असतो हा मौलिक विचार त्यांनी आपल्या शिकवणुकीतून दिला आहे. ज्ञान हे धनापेक्षा श्रेष्ठ आहे कारण धनाची रक्षा तुम्हाला करावी लागते ज्ञान मात्र तुमची रक्षा करते. ईश्वर सेवेचे वर्णन अत्यंत समर्पक आणि मार्मिक शब्दात स्वामी विवेकानंद यांनी केले आहे ते म्हणजे देशातील दारिद्र्य आणि अज्ञान नष्ट करणे म्हणजेच ईश्वरी सेवा होई. स्वामी विवेकानंदांच्या कार्याचा प्रभाव तत्कालीन समाजावर, भारतावर आणि जगावर आजही दिसून येतो.



# आई कोठे गेली तू....

आधुनिक केसरी

***(मागील अंकावरून)*** जिवंत पणी ही मानसिक सुख कधी मिळाले नाही?अन् आता तर कहरच.....जगणे हा गुन्हा वाटू लागला? लग्न न करता जगले असते तर निश्चित माझे जीवन सुखाचे राहिले असते?आई बापाचे प्रेमच हे सर्वश्रेष्ठ प्रेम असते...लग्नानंतर त्या ही प्रेमाला मला मुकावे लागले..अन् अरुण नंतर तर यातनांचा कहरच अन् आता ही तसेच... मानव जन्म खरचं शाप आहे?या विकृत समाजात? मी तुझीच मुलगी ना...बाकीच्या सारखी तरी माझ्या बाबतीत भेद करतो हा समाज..... मी शिकले हा माझा गुन्हा का? मी विचार करते हा गुन्हा का? समानता हवी मला हा माझा गुन्हा की? मी लग्न केला हा गुन्हा ? ..अन् जो माझा हक्काचा आधार होता तो ही तुझ्या रूपाने काळाच्या पडद्याआड गेला.आठवणी च फक्त सोबतीला? पण त्यांनी जीवन नाही ना जगता येत...बोलणे सोपे असते ग? एक तरी वेळा थोडी हिंमत ठेवून जीवनाचे अजून १०-१२वर्षांचे श्वास तू घ्यायलाच हवे होते ना? रोज विचार करून करून डोके फाटायला आले ग? बळजबरी तोंडावर हसू आणायचे अन् शाळेतील मुलांचा सामना करायचा? घरात ही तसेच? मनातून आता पूर्ण तुटले? मला या साऱ्या गोष्टी सहन करायला ठेवले का भू तलावर? मानव जन्म खूप वेदनादायक असतो ग....तू नित्य आमच्या सोबत हवीच होतीस? किती वेळा बोलले तुला तू माझ्याकडे ये पुण्याला....नाहीतर ठाण्याला थांब?किंवा नाशिक ला थांब तुला जेथे बरे वाटेल? करमेल तेथे थांब.१३ तारखेला बोलली ही आण्णा तयार झाले यायला मी येते... एवढी थंडी संपू दे?? काका व तेजस,किंवा मी व काका तुला घ्यायला येत होतो ना? मग आम्हाला का असे फसवले? कोठेच न थांबता नको त्या ठिकाणी आम्हा सर्वांच्या पासून खूप - खूप दूरवर गेलीस ग?आण्णा व तुला किती वेळा घ्यायला आले?का ग आता येते म्हणून प्रॉमिस ही केले.अन् ते पूर्ण न करता निघून गेलीस....का केले विधात्याने असे.. **क्रमशः**

सौ. प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे, ४४

# स्वामी विवेकानंद महान युगपुरुष



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**स्वामी विवेकानंद यांचा जन्म 12 जानेवारी 1863 रोजी कोलकाता येथे झाला.स्वामी विवेकानंद यांची आवड आणि अभ्यास प्रगल्भ होता. त्यांना संगीत, साहित्य आणि तत्वज्ञान यात विशेष रस होता.याव्यतीरीक्त पोहणे, घोडेस्वारी व कुस्ती हे त्यांचे आवडते छंद होते. वयाच्या 25 व्या वर्षी स्वामीजींनी वेद,पुराण, बायबल, कुराण,धम्मपद,तनाख, गुरू ग्रंथ साहिब,दास कॅपिटल, भांडवलशाही, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सर्वच विचारधारा एकत्र केलेल्या होत्या. म्हणजे त्यांना इतर सर्व ज्ञान तर होतेच परंतु जगातील संपूर्ण धर्माचा अभ्यास त्यांनी अवगत केलेला होता. यावरून असे वाटते की स्वामी विवेकानंदांना संपूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असल्याचे दिसून येते.**

याला दैवी शक्तीच म्हणावे लागेल.कालांतराने रामकृष्ण परमहंस यांच्या आश्रयाला गेले व रामकृष्ण परमहंस यांच्या रहस्यमय व्यक्तीतत्वाने ते अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यांचे संपूर्ण जीवन बदलले.स्वामींनी 1881 मध्ये रामकृष्ण परमहंस यांना आपले गुरू केले.1886 मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंदांच्या कार्याला एक नवीन वळण आले. वयाच्या 25 व्या वर्षी त्यांनी भगवे वस्त्र धारण केले व संपूर्ण भारतभर पायी प्रवास सुरू केला.देशातील गरीबी आणि सामाजिक दुष्टांची अवस्था पाहून त्यांची मनस्थिती दुःखावली गेली.काही दिवसांतच शिकागो येथे जगातील धर्म परिषद होणार असल्याची माहिती मिळाली.11सप्टेंबर 1893 ला शिकागो येथे जगातील धर्म परिषद भरली.भारताचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद तेथे पोहोचले.तिथे अनेकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंद यांना बोलायला वेळ मिळुन नये.परंतु एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना बोलायला थोडा वेळ मिळाला.त्यानी जागतिक धर्म परिषदेतील धर्म संसदेतील भाषणाची सुरुवात "बंधु व भगिनी"असे करून केली. यानंतर त्यांच्या भाषणाचे विचार ऐकून संपूर्ण धर्म परिषद स्तब्ध झाली व टाळ्यांचा कडकडाट झाला जनुकाय आकाशवाणी झाली की काय आणि स्वामी विवेकानंद जगप्रसिद्ध झाले व त्यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत झाले. युगानुयुगे आपल्या तेजस्वी विचारांची ज्योत संपूर्ण जगात सकारात्मक व शांती प्रदान करणारी रहावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांनी आपले कार्य पुढे सुरूच ठेवले. एकतेचा संदेश जगाला देऊन सर्व मानवजातीला बंधुतेचा, मानवतेचा संदेश देणारे व सुखशांती निर्माण करणारे कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले.त्यांनी जगाचा इतिहास आणि पाश्चात तत्वज्ञानांचा अभ्यास महाविद्यालयीन जीवनातच केला. अनेक धर्माच्या तात्विक अभ्यासामुळे त्यांनी अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. 11 सप्टेंबर 1893 या दिवशीच्या त्यांच्या भाषणाने संपूर्ण सभा प्रभावित झाली व 17 दिवसाच्या या परिषदेत हिंदुस्थानातील प्रभाव दिसून आला.मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, मुले आत्मनिर्भर व्हावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता आजच्या युवा पिढींनी अवगत करायला हवी.मूलांचा शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास होऊन मन,बुद्धी विकसित करणारे, स्वावलंबी, चारित्र्यसंपन ओळख निर्माण करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाड अभिमान असला, तरी त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातीभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणांतून कडाडून हल्ला चढवला. निराकार समाधीत मन रहाण्याची स्वतःची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखाचा योग्य पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले व सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यास' हे वचन सार्थ केले. स्वामी विवेकानंद हे सर्व तरुणांचे आजही प्रेरणास्थान आहेत. अशा या महान तत्त्वज्ञानी महापुरुषाला माझा सलाम.आज देशात आपल्याला जी काही एकता आणि बंधुता दिसून येत आहे त्याचे संपूर्ण श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते.1899 साली स्वामीजींनी पुन्हा पश्चिमेकडे प्रवेश केला आणि भारतीय संस्कृतीचा, अध्यात्माचा संदेश प्रसारित केला.अशाप्रकारे परदेशातही त्यांनी भारताची भूमिका मांडण्याचे काम त्यांनी केले.असा तेजस्वी महापुरुष भारत भुमिला लाभला हे भारतीयांचे अहोभाग्यच आहे.आजही आपला देश स्वामी विवेकानंदांच्या विचारधारेवर चालतो ही भारतीयांसाठी स्वाभिमानाची बाब आहे.अशा महापुरुषांनी पुन्हा-पुन्हा जन्म घ्यावा असे वाटते.परंतु आजही स्वामीजींची आस्था सर्वांच्या ह्रदयात घर करून आहे.मी संपूर्ण भारतवासीयांना विनंती करतो की स्वामी विवेकानंदांचे विचार अवश्य अवगत करावे.आपणा सर्वांचाच मार्ग सुखरूप व मोकळा होईल.जोपर्यंत सुर्य, चंद्र,तारे आहेत तोपर्यंत स्वामीजींचे विचार सर्वांच्याच ह्रदयात राहिल.स्वामीच्या जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

# वेदांत 'केसरी' विवेकानंद



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**आपआपल्या जातीच्या संकुचित बावड्यांमध्येच डुंबत तमासगीर होऊन हिंदू धर्माचा विध्वंस मोकाट बघत राहणाऱ्या हिंदू धर्मियांमध्ये जागरूकता, आक्रमता आणत हिंदू धर्मातील सहिष्णू व विश्वबंधुत्वाची भावना भारतातच नव्हे तर जगभरात पोहचवण्याचे महत्वपूर्ण काम स्वामी विवेकानंदांनी केले. पाश्चात्य जीवनातील अतिरिक्त भोगविलास पाहून त्यांनी तिथल्या लोकांना त्यांनी तिथल्या लोकांना त्यागी जीवनाचा संदेश दिला, तर भारतात अर्धपोटी राहूनही अध्यात्माची जोपासना करणाऱ्या व आळशी, अगतिक, निराश झालेल्या सर्वसामान्य जनतेला त्यांनी 'प्रयत्नशील व्हा! पराक्रमी व्हा! पुरुषार्थी व्हा!' असा उपदेश केला.**

स्वामी विवेकानंदांच्या व्यक्तित्वाचे वर्णन करताना त्यांना वेदांतकेसरी या नावाने संबोधण्यात येते. अनुभवसिद्ध वाणीत दिव्य स्फूर्ती व अमोघ चैतन्य साठवलेले दिसून येते. त्यांनी सिंहगर्जनेत वेदांताचा जगभर प्रचार केला. वेदांत हा आपल्याला जीवनाकडे बघण्याची नवी दृष्टी देतो व आदर्श जीवन कसे जगावे याची शिकवण देतो. वेदांत म्हणजे एखादी गुढ विद्या किंवा एखादे विचित्र, चमत्कारिक व अनाकलनीय असे तत्त्वज्ञान नसून ते जीवन घडविणारे, जीवनाला नवीन आकार देणारे, आदर्श मानव तयार करणारे शास्त्र आहे, हे विवेकानंदांनी स्वतःच्या जीवनाने सिद्ध करून दाखविले आहे. या विश्वात ब्रह्म हीच एकमेव सत्यवस्तू असून तिची प्रत्यक्ष सहान अनुभूती करून घेणे हेच मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. या ब्रह्मसत्तेचा, या चैतन्याचा साक्षात्कार करून घेणे हेच आपले मुख्य ध्येय आहे. 'अयमात्मा ब्रह्म', 'सर्वं खलु इदं ब्रह्म', 'नेह नानाऽस्थि किंचन' अर्थात 'हा आत्मा ब्रह्म आहे', 'हे सर्व ब्रह्मच आहे', 'ब्रह्मात नानात्व नाही' ही वेदांताची मुख्य शिकवण आहे असे स्वामी विवेकानंद सांगतात.

एक महान वेदांतमार्गी राष्ट्रसंत व थोर विचारवंत स्वामी विवेकानंद या नावाने जगविख्यात असलेल्या नरेंद्रनाथांचा जन्म बंगालमधील दत्त आडनावाच्या एका श्रीमंत व प्रतिष्ठित घराण्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विश्वनाथ दत्त व आईचे भुवनेश्वरी देवी असे होते. लहानपणापासूनच विवेकानंदांच्या ठाई योग्याची लक्षणे दिसू लागली होती. दारी येणाऱ्या भिक्षेकऱ्याला पुढयातले अन्नाचे ताट किंवा कमरेचे वस्त्रही सोडून देण्यापर्यंत त्यांची अनेक वेळा मजल जाई. रात्री झोपताना डोळे मिटल्याबरोबर त्यांना एक तेजस्वी प्रकाश गोल दिसू असे व तो जवळजवळ येत त्यांच्या भुवयांमधून शरीरात प्रवेश करी व सर्व शरीर प्रकाशमान झाल्याचे त्यांना वाटत असे आणि नंतर त्यांना गाढ झोप लागत असे.

शाळेत असतानाच अभ्यासाबरोबरच बलोपासना केली. इंग्रजीत कौतुकास्पद प्रगती केली. पाश्चात्य विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांच्या अनुशीलतेने नरेंद्रनाथाच्या हृदयात एक प्रचंड वादळ उडवून उठवून दिले. सतत ज्ञानोपासनेच्या प्रेरणेने नरेंद्रनाथ जसजसे अधिकाधिक पुढे जाऊ लागले तसे त्यांना उमजून येऊ लागले की अंतिम सत्याच्या प्रत्यक्ष लाभाची आकांक्षा असेल, तर केवळ तर्काने काम भागणार नाही त्यासाठी निराळे काहीतरी हवे. ते एकसारखे त्या अंतिम सत्याचा शोध घेऊ लागले. देवेंद्रनाथांच्या उपदेशपर उत्साहवाणीने त्यांचा ज्ञानअनुराग द्विगुणीत झाला व त्यांनी ब्रह्मचर्य स्वीकारले. परिमित आहार, भूमीवर शयन, बिनकाठी वस्त्रांचा वापर, सर्व विलासांचा त्याग अशा कठोर नियमांचे पालन ते काटेकोरपणे करु लागले. मानसिक शांततेसाठी ईशचिंतन व्यावहारिक व यशसिद्धीसाठी पुस्तकांचे वाचन-मनन आणि उरलेल्या वेळात गायन, वादन, लेखन व संभाषण अशा प्रकारे त्यांनी आपले जीवन व्यतीत करण्यास सुरुवात केली पण त्यांना समाधान मिळत नव्हते. अशातच एके दिवशी त्यांची श्री रामकृष्ण परमहंसांशी भेट झाली व त्यामुळे त्यांच्या आयुष्याचा ओघच बदलून गेला. अनन्य भावाने शरण गेल्यावर रामकृष्णांकडून त्यांना मार्गदर्शन लाभले. ज्या अंतिम सत्याचा शोध ते घेण्याचा प्रयत्न करत होते ते त्यांना गवसल्याचे वाटले. कालीमातेच्या साकार रूपाचे दर्शन त्यांना झाले. प्रत्यक्ष भगवंताच्या दर्शनापुढे सर्व गोष्टी तुच्छ आहेत. आपण शुद्ध वेडेपणा करून देवांकडून ऐहिक सुखाची व समृद्धीची अपेक्षा करीत होतो. आता या शाश्वत सत्याचा मार्ग सोडून दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची अपेक्षा करणे चूक आहे हे त्यांना समजले.

रामकृष्णांच्या मार्गदर्शनात त्यांना निर्विकल्प समाधी प्राप्त झाली. समाधीअवस्थेत त्यांचे मन पूर्ण कामनाशून्य असले तरी एक अलौकिक शक्ती त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने इंद्री पंचेंद्रियग्राह्य अशा बाह्य जगतात उतरवित होती. त्यांच्या प्रत्ययासआले की, 'बहुजन हिताय बहुजन सुखाय कर्म करीन, अपरोक्षानुभूतीद्वारा लाभलेल्या सत्याचा प्रचार करीन' या महान कामनेचे सूत्र धरून त्यांचे मन निर्विकल्प अवस्थेतून परतले व त्यांना समजले की ज्या ज्ञानामृताने आपण तृप्त झालोत, तेच अनुभवजन्य ज्ञान पुढे जगातील असंख्य दुःखदैन्यपीडित आणि मोहभ्रांत जीवांना द्यावे लागणार आहे.

निर्विकल्प समाधी पासून झालेला हा बोध आणि आनंद यांच्यामुळे नरेंद्रनाथांचे हृदय अत्यंत तृप्त झाले होते ज्या सद्गुरूंच्या कृपेमुळे त्यांना हे प्राप्त झाले त्या रामकृष्णांच्या चरणांवर नतमस्तक होऊन त्यांचे हृदय कृतज्ञतेने भरून आले. रामकृष्णांच्या निर्यानानंतर नरेंद्रनाथांनी आपल्या गुरू बंधूंना मार्गदर्शन केले व आसेतुहिमाचल भारत वर्षाची पदयात्रा करण्याचे ठरविले.

या परिभ्रमणात त्यांना देश बांधवांचे दैन्य, दास्य, दारिद्र्य प्रकर्षाने जाणवू लागले. आपापसातील भेदाभेद, अज्ञान, सामर्थ्यहिनता अशा नानाविध सामाजिक दुर्गुण त्यांना बोचू लागले. हा दुर्दैवी समाज पुनश्च आपल्या समर्थ व स्वतंत्र वैभवाने कधी तडपू लागेल, याचाच एकसारखा विचार करीत असत. त्यांनी पंजाब, राजस्थान, गुजरात इत्यादी प्रदेशातही संचार केला व लोक शेतीचे अवलोकन केले या प्रवासात आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने, आत्मविश्वास संपन्न वक्तृत्वाने शेकडो हजारो लोकांना मंत्रमुग्ध करून सोडले. अनेक राजे महाराजे त्यांच्या अनुयायात समाविष्ट झाले त्यानंतर पुणे, महाबळेश्वरला जाऊन आल्यावर ते बेळगावकडे आले. बेळगावहून, बंगलोर मार्गे मैसूर व नंतर कर्नाटक प्रदेश सोडल्यावर स्वामीजी मद्रास राज्यात गेले. तेथे शेवटी कन्याकुमारीच्या समुद्र किनाऱ्यावर जाऊन पोहोचले. कन्याकुमारीला त्यांनी देवीचे ध्यान सुरू केले त्या ध्यानाअवस्थेतच त्यांना साक्षात्कार झाला व राष्ट्रोत्थानाविषयी प्रेरणाही मिळाली.

या याच सुमारास अमेरिकेतील शिकागो नामक शहरात सर्वधर्म परिषद भरणार असल्याची वार्ता स्वामीजींच्या मद्रासी शिष्यांना समजली या धर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी भारताचे प्रतिनिधित्व करावे असा आग्रह सुरू झाला. शिकागो पर्यंत पोहचण्याच्या त्यांच्या मार्गात आलेल्या अनंत अडचणींवर मात करत स्वामीजी तिथे पोहचले. भारताचे प्रतिनिधित्व करायला निघालेल्या विवेकानंदांजवळ काय नव्हतं. वेद- उपनिषदांचा सखोल अभ्यास, बौद्ध-जैन, शैव-वैष्णव, ख्रिस्ती - इस्लामादी धर्म - संप्रदायाची परिपूर्ण जाण त्यांना होती, गुरुनानक, मीराबाई व तानसेनही त्यांच्या ओठांवर होते. महाराष्ट्राचे संत कवी व दक्षिणात्य अलवार व नयनारही त्यांच्या स्मृतीत विराजमान होते! विवेकानंद शिकागो व्यासपीठावर आल्यावर ते सुदृढ शरीर, मनोहर रूप, तेजस्वी नजर, भगव्या कफनीतल्या त्या पुरूषी सौंदर्याकडे श्रोते बघतच राहिले. स्वामीजींनी संबोधनाचे फक्त पहिले पाच शब्द उच्चारले ते संबोधन होतं,'सिस्टर अँड ब्रदर्स ऑफ अमेरिका....' 'लेडीज अँड जेंटलमन' ऐकणाऱ्या अमेरिकन लोकांना हे संबोधन अगदी नवं होतं. फक्त नवं नव्हतं, त्यात खरेपणा होता. फड जिंकण्याची ती क्लुप्ती नव्हती तर समस्त मानव जातींवर निःस्वार्थी प्रेम करणाऱ्या एका निष्ठावान ब्रह्मचाऱ्याचे ते सहजोद्गार होते. स्वामीजींच्या भाषणातील ते पहिले पाच शब्द ऐकताच श्रोते उभे राहिले आणि त्यानंतर अमेरिकी शिष्टाचाराच्या पलीकडे जाऊन सतत दोन मिनिटांच्या वर सभागृह टाळ्यांच्या कडकडाटत अक्षरशः गुंजत राहिलं. फक्त संबोधनानं अपरिचित समाज जिंकणारे विवेकानंद पहिले आणि बहुदा शेवटचेही! स्वामीजींनी अत्यंत आत्मविश्वासपूर्ण आणि मधुरवाणीने हिंदू धर्माचे रहस्य समर्पक व थोडक्या शब्दात परिषदेच्या श्रोत्यांना समजून सांगितले. आपल्या भाषणाद्वारे भारतीय संस्कृती, सभ्यता आणि तत्त्वज्ञान जगभरातील लोकांसमोर मांडले. भारत आणि भारतीयत्व जगासमोर एका नव्या दृष्टीकोनातून मांडणारे हे अमर भाषण तसं छोटं असलं तरीही त्याचा आकाशाएवढा औदार्यभाव, मानवतेची मूल्यतत्त्व आणि वैश्विक ऐक्याचा सच्चा संदेश ओतप्रोत भरला होता. स्वामीजीचे हे आणि यानंतरचे प्रत्येक भाषण अमेरिकन श्रोत्यांच्या हृदयाला भिडणारे ठरले. हा संन्यासी काही वेगळाच आहे हे त्यांनी ओळखले. स्वामीजींनी भारतीय विश्वाबंधुत्वाच्या संस्कृतीचा जयघोष असाकाही जगभर पोहचवला होता की भारतीयांना काफिर समजून सुधारणेसाठी पाश्चिमात्य देशांतून मिशनरी पाठवणाऱ्या अमेरिकनांना स्वतः सुधारणेसाठी भारतातून तिकडे मिशनरी बोलवायची गरज आहे असे वाटू लागले



होते. यानंतर त्यांची शेकडो लहान-मोठी भाषणे झाली या सुप्रसिद्ध धर्म परिषदेनंतर स्वामीजींनी सबंध पाश्चात्य जगतात एक प्रदेश दौरा काढून हिंदू धर्माची आणि वेदांताची दिग्विजय ध्वजा सर्वत्र फडकावून दिली. अनेक पाश्चात्य स्त्री-पुरुषांनी स्वामीजींच्या वेदांत धर्माच्या प्रचारार्थ स्वतःला वाहून घेतले. अमेरिकेत व अन्य पाश्चात्य शहरांमधून वेदांतधर्म साधनेची केंद्रे उघडण्यात आली. स्वामीजींचे वक्तृत्व, व्यक्तिमत्व, विशुद्ध जीवन चरित्र हे सारे पाश्चात्य जगताला कौतुकाचे व आदराचे ठरले. तेथून परत आल्यावर चार वर्षे स्वामीजींनी आपल्या लोकसेवाव्रती अशा संन्यासी गुणांसह दुष्काळात ,भूकंपात जलप्रलयात, रोगांच्या साथीत आणि अन्य अनेक संकटात सापडलेल्या दुर्दैवी भारतीय बांधवांच्या सेवेसाठी वेचली. हे करीत असताना त्यांनी व्यवहार, प्रवृत्तीधर्म, अध्यात्म, व्यक्तिगत योगसाधना, मनुष्याच्या दैनंदिन गरजा यांचा नेमका विचार करून आपले तत्त्वज्ञान मांडले. गुलामीच्या गर्तेत पिचत पडणारे एक पुरातन पवित्र राष्ट्र वैभवाच्या शिखराप्रत पोहोचविणे हे त्यांचे जीवितकार्य होते आणि ते त्यांनी जिवात जीव असेपर्यंत केले. ४ जुलै १९०२ या दिवशी रात्री त्यांनी बेलूर मठात देहत्याग केला!

विवेकानंदांनी जो वेदांतधर्माचा प्रचार केला त्याला अनुलक्षुन लोकमान्य टिळकांनी त्यांना 'विसाव्या शतकातील शंकराचार्य' या शब्दांनी गौरविले होते. त्यांनी दुबळेपणा आणि आत्मविश्वासाचा अभाव झाडून टाकायला शिकवले. आपण पक्के ध्यानात बाळगले पाहिजे की जग जग आपले कोणत्याही प्रकारे ऋणी नाही. जगासाठी काही करण्याचा सुयोग आपल्याला लाभत आहे, हे आपले सौभाग्य म्हटले पाहिजे. जगाला सहाय्य करून वस्तूतः आपण स्वतःचेच कल्याण करीत असतो. स्वामी विवेकानंद नेहमी म्हणत की मनुष्याने स्वतःला आत्मसंभ्रमात टाकले आहे आणि शुद्ध ज्ञानभक्तीने हा आत्मसंभ्रम दूर करून स्वस्वरूपात प्रतिष्ठित होणे हाच खरा धर्म आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात की हे समस्त विश्व आत्मदृष्टीने अखंड एकसंघ एकरस आहे. तो एकच आत्मा अनेक रूपाने नटला आहे म्हणून दुसऱ्याचे हित केल्याने स्वतःचेच हित होते आणि दुसऱ्याचे अनिष्ट केल्याने स्वतःचे अनिष्ट होते. आत्मदृष्टीने सगळे विश्व सगळे जग एकच आहे म्हणून दुसऱ्याला दुःख देणे दुसऱ्याला इजा करणे योग्य नाही कारण त्यामुळे शेवटी आपल्याला दुःख भोगावे लागते. दैनंदिन कर्माच्या क्षेत्रात देखील वेदांत उपयोगात आणला पाहिजे अशी शिकवण स्वामी विवेकानंदांनी दिली.

या विश्व ब्रम्हांडाचा नियंता असा एक ईश्वर अस्तित्वात आहे. ईश्वर त्यात सर्वदा विद्यमान आहे. तो अविनाशी, सतत क्रियाशील व सदा जागृत असतो. जगात दिसून येणारी सारी परिवर्तने आणि विकास याचेच कार्य होय. कोणाचीही घृणा करणे उचित नाही. हे जग नेहमी शुभाशुभाचे मिश्रण असणार. आमचे कर्तव्य आहे दुबळ्यांना सहानुभूती दाखविणे आणि कुकर्म करणाऱ्यांवरही प्रेम करणे. आपण कोणत्याच प्रकारच्या मतांधतेस बळी पडून दुराग्रही होता कामा नये. कारण दुराग्रही धर्मांधता आणि निस्वार्थ प्रेम एकाच हृदयात कदापि नांदू शकत नाही. भगवंताला शरण जाऊन सारे काही त्याला समर्पण करा. जिथे कर्तव्यरुपी वन्ही सर्वांना होरपळून टाकत आहे, अशा संसाराच्या धकधकत्या भयंकर अग्निकुंडात राहताना, हे भगवत समर्पणाचे अमृत अकंठ पान करून सुखी व्हा. आपण सारेजण केवळ त्याच्याच इच्छेनुसार कार्य करीत आहे. पारितोषिक अथवा दंड कशाशिही आपला काडीचाही संबंध नाही. तुम्हाला जर पारितोषिकाच्या लाभाची आकांक्षा असेल तर मग त्याबरोबर दंडाचाही स्वीकार करावाच लागेल. दंड टाळण्याचा एकमेव उपाय म्हणजे पारितोषिकेची आशा सोडणे हाच होय. दुःख टाळण्याचा एकमेव उपाय म्हणजे सुखाच्या कल्पनेचा त्याग करणे कारण सुख आणि दुःख दोन्ही परस्पर संबंध होत. एकीकडे सुख आहे तर दुसरीकडे दुःख. एकीकडे जीवन आहे तर दुसरीकडे मरण. मृत्यूचे अतिक्रमण करून पलीकडे जाण्याचा एकमात्र उपाय म्हटला म्हणजे जीवनाची आशा सोडून देणे हाच होय ही स्वामी विवेकानंदांची शिकवण आहे. आजही अनेक देश जातीयवादाच्या आगीत जळत आहे, एकमेकांच्या जमीनी बळकावण्यात व्यस्त आहे. प्रत्येक पंथ एकमेकांपेक्षा वरचढ दाखवण्याची स्पर्धा करत आहे. या सर्वांमध्ये स्वामीजींचा विश्वबंधुत्वाचा संदेश समाजाला कटुतेतून दूर करत संपूर्ण जगाला एक कुटुंब म्हणून पाहण्याची दृष्टी देत अनोखा मार्ग दाखवत आहे.

# आजची युवा पिढी व सद्यस्थिती



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**जगातील सर्वात तरुण देश जर कोणता असेल तर तो आपला भारत देश आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १३६ कोटी इतकी आहे. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६५ टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. देशाचे भविष्य याच तरुणांवर अवलंबून आहे. याच तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता.**

तरुणच आपल्या देशाचे भाग्यविधाते आहेत असे ते म्हणत. या तरुणांकडे असलेल्या ऊर्जेचा उपयोग देशकार्यासाठी करुन घ्यावा असे त्यांचे मत होते. पण आज तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. सर्वात मोठे आव्हान आहे ते बेरोजगारीचे. आजचे तरुण उच्चविद्याविभूषित आहेत. हुशार आहेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात आजचे तरुण अग्रेसर आहेत.देशासाठी काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द त्यांच्याकडे आहे. शिक्षण आणि काम करण्याची उर्मी असूनही त्यांच्या हाताला रोजगार नाही. पदव्यांचे भेंडोळे घेऊन तरुण जागोजागी फिरत आहेत मात्र त्यांना नोकरी मिळत नाही. सरकारी नोकर भरती बंद आहे. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळत नाही. ज्यांना आहे त्यांना नोकरी टिकवणे मुश्किल झाले आहे. स्वतःचा व्यवसाय, उद्योग करायचा म्हटले तर भांडवल नाही. शेतीही बेभरवशाची झाली आहे त्यामुळे आजचे तरुण हताश झाले आहेत. या हताश तरुणांना धीर देऊन त्यांना रोजगार देण्याऐवजी राजकीय नेते त्यांना पकोडे विका असे म्हणून त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. रोजगार नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड निराशा पसरली आहे. नैराश्यातून काही तरुणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी गेले आहेत. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण रोजगार नसल्याने आपले जीवन अकाली संपवत आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी जात आहेत हे पाहून मन खिन्न होते. रोजगार मिळत नसल्याने तरुणांच्या मनात व्यवस्थेविरुद्ध सुप्त असंतोष आहे. या असंतोषाचा भडका होण्याआधीच सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस धोरण आखावे. जर या तरुणांच्या मनातील असंतोषाचा भडका झाला तर भल्याभल्यांना पळता भुई थोडी होईल. सध्याच्या बेरोजगारीचा दर हा मागील ४५ वर्षातील सर्वात जास्त आहे ही बाब आपल्या देशाला भूषणावह नाही. हा दर कमी करण्यासाठी आणि तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार काही ठोस प्रयत्नही करताना दिसत नाही. या तरुणाईचा वापर केवळ मते मिळवण्यासाठीच केला जात आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. तरुणांच्या हाताला काम मिळणे ही काळाची गरज आहे कारण तरुणांच्या हाताला काम मिळाले नाही तर तरुणाई भरकटण्याची शक्यता अधिक आहे. त्यांच्या शिक्षणाचा, त्यांच्यातील ऊर्जेचा समाजाला, देशाला उपयोग होण्याऐवजी ती ऊर्जा वाया जाण्याचीच शक्यता अधिक आहे. या तरुणांच्या शिक्षणाचा व ऊर्जेचा देशकार्यासाठी उपयोग व्हायला हवा. त्यांचा उपयोग जर देशकार्यासाठी झाला तर आपल्याला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. आजची तरुणाई हीच आपली शक्ती आहे. या शक्तीचा वापर व्हायला



हवा. जगात सर्वात जास्त तरुण भारतात आहे. जगात चिननंतर सर्वात जास्त लोकसंख्या भारतात आहे. खरंतर याला समस्या न मानता संधी मानली पाहिजे. या संधीचे सोने करुन तरुणांच्या हाताला रोजगार दिल्यास भारत महासत्ता बनेल यात शंका नाही. आजच्या तरुणांना जग सुंदर शांत असावे असे वाटते. गरिबी, भ्रष्टाचार त्यांना नको आहे. प्रजासत्ताक राष्ट्रावर त्यांची निष्ठा आहे. आपण समोरच्याला समजून न घेता त्याचा दुस्वास कसा करू शकतो? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यांना एक स्थिर व सुरक्षित अर्थव्यवस्था हवी आहे. आपल्या आजूबाजूच्या परिसराबाबत ते तितकेच जागृत असतात. संपत्ती कधीतरी संपून जाईल त्यामुळे तिचा जपून वापर करण्यास ते प्राधान्य देतात. थोडक्यात सांगायचे तर आजचा तरुण जबाबदार आहे. तो आपल्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत आहे. याचवेळी पैशापेक्षा आनंद महत्वाचा असल्यामुळे तो आपल्या आवडीनुसार करियर निवडण्यास प्राधान्य देतोय त्यामुळे आपण जे काही काम करीत आहे त्यासाठी लोकांनी आपल्याकडे मानाने पहावे अशी त्यांची इच्छा आहे. ६९ टक्के तरुणांना ठाम विश्वास आहे की पैसे त्यांच्यासाठी आनंद विकत आणू शकत नाही तर ८० टक्के तरुणांना पैशापेक्षा कला, ७९ टक्के तरुणांना पैशापेक्षा शिक्षण आणि ७६ टक्के तरुणांना पैशापेक्षा यश महत्वाचे वाटते.

# युवापिढी आणि स्वामी विवेकानंद



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**स्वामी विवेकानंदांना युवाशक्ती वर खूप मोठा विश्वास होता आणि तो त्यांनी आपल्या अनेक भाषणातून व्यक्तही केला होता. युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा जागृत करून तिचा उपयोग केला तर युवक निश्चितच त्यांच्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतात हा विश्वास स्वामी विवेकानंदांना होता. विवेकानंदांनी युवाकांन विषयी जो विश्वास व्यक्त केला होता तो सार्थ ठरावा त्यादृष्टीनेच त्यांच्या विचारांचा भारतीय तरुणांमध्ये प्रचार व प्रसार व्हावा आणि त्यांच्या सकारात्मक ऊर्जेला जागृत करून एक चांगला देश, सामर्थ्यशाली देश बनावा ही त्या मागची भावना. म्हणूनच स्वामी विवेकानंदांची जयंती १२ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा केला जातो.**

आजही आपला भारत देश युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतात युवकांची संख्या बघितली तर ती जवळपास 65 टक्के पर्यंत आहे. आणि म्हणूनच युवापिढीच्या क्षमता आणि ताकदीवर आपला देश जागतिक महासत्ता भरण्याचे स्वप्न पाहत आहे. देशाच्या विकासात युवकांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे. मग तो देश कार्यात असेल, सामाजिक सुधारणात असेल, शैक्षणिक विषयात असेल, औद्योगिक क्षेत्रात असेल पण तो आवश्यक आहे, आणि त्यादृष्टीने खूप मोठे प्रयत्न आवश्यक आहेत. नुसताच युवकांचा मोठा देश म्हणून बिरुदावली मिरवून चालणार नाही, तर त्या युवाशक्तीला सर्व क्षेत्रात एक चांगल असं वळण विधायक वळण देणे तितकेच आवश्यक आहे. आज देशाच्या सीमेवर लढणारा हा युवकच आहे.

आज आपल्या आजूबाजूची परिस्थिती म्हणजे आपल्या देशातीलच युवकांची परिस्थिती बघितली तर ती खूप अशी समाधान कारक नाही असे म्हणावे लागेल. कारण युवक हा अनेक बाबींशी संबंधित असतो, आहे .मग युवक विद्यार्थी संघटनेशी संबंधित आहे, राजकीय संघटनेशी संबंधित आहे, राजकारणाशी संबंधित आहे, सामाजिक कार्याशी संबंधित आहेत. परंतु ज्या प्रमाणात आणि ज्या एका योग्य दिशेने युवकांचे कार्य पुढे जायला हवे ते मात्र हवे तसे नाही, म्हणजेच थोडक्यात आज युवक हा एका भरकटलेल्या अवस्थेत सापडला आहे. असे म्हणायला हरकत नाही.

प्रत्येक क्षेत्रात युवकांच्या संघटना आहेत. शिक्षण क्षेत्रात आहेत सामाजिक क्षेत्रात आहेत राजकीय क्षेत्रात आहेत पण या सर्वांचे ध्येय काय आहेत ? याचाच विसर त्यांना पडलेला आहे. सर्व संघटनांची सरमिसळ झाली आहे. आणि युवक वर्गात खूप मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. कारण एकच आहे किया युवाशक्तीचा वापर केला जातो. परंतु त्यांच्या प्रश्नाकडे मात्र लक्ष दिले जात नाही, आणि त्यामुळे त्या भरकटले आहेत। त्या त्या वेळेपुरता त्यांच्यामध्ये उत्साह असतो. मात्र त्यानंतर एक वेगळा मार्ग त्यांच्याकडून स्वीकारला जातो. आज विद्यार्थी संघटना पहिल्या तर त्याला पक्षीय असे स्वरूप आले आहे. प्रत्येक पक्षाचे विचाराने काम करणारी संघटना निर्माण झाली आहे. सहाजिकच त्यांच्यावर त्यांच्या पक्षाच्या विचारांचा प्रभाव पडतो. आणि मग राजकीय हेवेदावे सुरू होतात. आणि मुळातच आपण विद्यार्थ्यांसाठी आहोत आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न, अडचणी आपल्या सोडवायचे आहेत याचा विसर पडतो. राजकीय क्षेत्रात म्हटलं तर तसेच, युवकांचा निवडणुकांच्या काळात वापर करून घेतला जातो. थोडक्यात त्यांच्याकडे वर वर ची कामे देऊन ती पैशाच्या आणि खाण्यापिण्याच्या प्रलोभनां मधून करून घेतली जातात, कारण त्या ठराविक काळानंतर तो युवक बऱ्याच अंशी व्यसनाधीन झालेला असतो. अशा युवकांचा बेरोजगारीचा प्रश्न मात्र सोडवला जात नाही. ना अशा युवकांना राजकीय क्षेत्रात स्थान मिळत नाही. त्यांच्या आयुष्याचा कुटुंबाचा विचार कोणीही करत नाही. राकारणात पदांची त फील्डिंग आधीच लागलेली असते. त्यात त्यांना स्थान नसते. अशाप्रकारे लाखो युवक यात गुरुफटलेले आहेत.



एकीकडे नवीन तंत्रज्ञान आले आहे जग जवळ आलंय, पण माणूस हरवलेला आहे. युवक इंटरनेट, मोबाईल, व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, सोशल मीडियाचे जाळ्यात अडकलेला आहे. हवा तेवढा उपयोग न करता, नको तेवढा दुरुपयोग केला जातो. म्हणूनच या युवाशक्तीला विधायक वळण लावणे किंवा देणे आवश्यक आहे. स्वामी विवेकानंद यांच्या विचारातून युवा पिढीला चांगला विचार मिळू शकतो. आणि त्यादृष्टीनेच युवापिढीनेही विवेकानंदांचे विचारांचा अंगीकार करायला हवा आहे.

कृषी क्षेत्रातही आपण बघतो अगदी तरुण तरुण मुले शेतीच्या व्यवसायात तोटा येतो म्हणून आत्महत्या करतात. अर्थातच त्यांची वैचारिक क्षमता संपल्यामुळेच हे सगळे होत आहेत. विचारांची क्षिणता घालवणे हा त्यावर मोठा उपाय आहे. आणि ती सकारात्मक विचारातूनच घालवता येईल...त्या द्रुष्टीने विवेकानंदांचे विचार प्रेरणादायी आहेत.... सर्वोच्च आदर्श निवडा आणि त्याप्रमाणे आयुष्य जगा. लाटा कडे नाही तर महासागरा कडे पहा. दिवसातून एकदा तरी स्वतःची बोला नाहीतर तुम्ही जगातील सर्वोत्तम व्यक्तीला भेटायला मुकाल. काम काम आणि काम हे तुमच्या जीवनाचे ध्येय असले पाहिजे. माझ्या भविष्यातील आशा तरुणांच्या चरित्र्यावर, बुद्धिमत्तेवर, त्यागावर, आणि इतरांची सेवा करण्यासाठी सर्वांच्या आज्ञाधारकतेवर अवलंबून आहेत, जे स्वतःचे आणि देशासाठी चांगले करतात. आपल्या देशाला नायकांची गरज आहे नायक बना. काम करणे तुमचे कर्तव्य आहे आणि मग सर्वजण तुमचे अनुकरण करतील. उठा जागे व्हा आणि थांबू नका जोपर्यंत तुमचे ध्येय साध्य होणार नाही. स्वतःला कमकुवत समजणे हे सर्वात मोठे पाप आहे.

अनुभव हा आपला सर्वोत्तम शिक्षक आहे जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत शिकत रहा. महान कार्यासाठी महान त्याग करावा लागतो

एकावेळी एक गोष्ट करा आणि असे करताना आपला संपूर्ण आत्मा त्यात घाला आणि बाकी सर्व विसरा. सत्य साठी काही सोडून द्याव, पण कोणासाठीही सत्य सोडू नये. शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द ज्याच्या अंगी असते तोच खरा कर्तृत्वन होय.


स्वतःचा हेतू प्रबळ ठेवा लोकांना जे बोलायचं असेल ते बोलू उद्या एक दिवस हीच लोक तुमचं गुणगान करतील. आत्मविश्वास वाढवायचा असेल तर स्वतःविषयीच्या सकारात्मक बाबींचे चिंतन सतत केले पाहिजे. घर्षण केल्याशिवाय रत्न उजळत नाही त्याचप्रमाणे सातत्याने प्रयत्न केल्याशिवाय व्यक्ती कुशल होत नाही. स्वतःला घडवण्यात आपला वेळ खर्च करा म्हणजे तुम्हाला इतरांना दोष द्यायला वेळच मिळणार नाही. विचार करा काळजी करू नका नवीन कल्पनांना जन्म द्या. कोणाचु निंदा करू नका जर तुम्ही कोणाच्या मदतीसाठी साठी हात पुढे करू शकत असाल तर नक्की करा, आणि जर शक्य नसेल तर हात जोडा आणि त्यांना आशीर्वाद द्या। त्यांना त्यांच्या मार्गाने जाऊ द्या. असं कधीच म्हणू नका की मी करू शकत नाही. कारण तुम्ही अनंत आहात तुम्ही कोणतीही गोष्ट करू शकता. जे लोक नशीबावर विश्वास ठेवतात ती भीत्री असतात. जे स्वतःचे भविष्य स्वतः घडवतात तेच खरे कणखर असतात.

मनुष्यसेवा ही देवाची सेवा आहे. शक्ती जीवन आहे तर निर्बलता मृत्यू आहे. विस्तार म्हणजे जीवन तर आकुंचन म्हणजे मृत्यु आहे. प्रेम जीवन आहे तर द्वेष मृत्यू आहे. वारंवार देवाचे नाव घेतल्याने धार्मिक होत नाही. जी व्यक्ती सत्य कर्म करते ती धार्मिक असते. स्वामी विवेकानंदांचे विचार, तत्त्वज्ञान आणि शिकवण हे भारतातील महान सांस्कृतिक आणि पारंपरिक संपत्ती आहे.

या विचारा सोबतच दरवर्षी एक थीम संकल्पना असते. जसे- युवाशक्ती ची जाणीव, युथ फॉर अ ड्रग फ्री वर्ल्ड, राष्ट्र उभारणीत युवा शक्तीचा वापर, युवक- नवीन भारताचा उत्साह. आणि त्यानुसार युवकांसाठी काही कार्य केले जाते. अर्थातच त्यात युवकांचा सहभाग अपेक्षित असतो. तरुणांना स्फूर्ती आणि प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक वर्षी राष्ट्रीय युवा दिन साजरा करणे सुरू केले आहे. कार्यक्रम शाळा आणि महाविद्यालयातून मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे. व हे विचार त्यांच्या पर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. जगण्याला आणि जीवनाला दिशा देणारे त्यांचे विचार स्फूर्तिदायक प्रेरणादायक आहेत. जीवनाच्या अनेकविध टप्प्यावर योग्य-अयोग्यतेची जाणीव करून देऊन प्रेरणा, चैतन्य, आणि उत्साह, व यशाकडे वाटचाल करण्यासाठी स्वामी विवेकानंदांचे विचार प्रत्येकाने जरूर वाचायला हवे. आणि त्यांचं जीवन कार्य समजून घ्यायला हवे. स्वामी विवेकानंद म्हणतात- "माझ्या तरुण मित्रांनो शक्तिशाली व्हा. ठाम निश्चयाचे आणि तेजस्वी असे 100 युवक जग हादरून टाकू शकतात, असा मला विश्वास आहे."

युवा शब्दातच वायु म्हणजे गती आहे त्यादृष्टीने संस्कारक्षम कणखर राष्ट्राप्रती, समाजाप्रती, प्रेम असणारा निर्व्यसनी युवक, युवकांची पिढी घडणे आणि घडवणे हेसुद्धा शिक्षण व्यवस्थेकडून अपेक्षित आहे.. अर्थातच सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक या तीन स्तरावर युवकांसाठी आणि त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे, नाहीतर भारत हा बेरोजगारांचा, व्यसनाधीनांचा, देश व्हायला वेळ लागणार नाही.

# माणूस घडविणारे शिक्षण हवे : स्वामी विवेकानंद



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**स्वामी विवेकानंदाना उणेपुरे ३९ वर्षांचे आयुष्य लाभले होते, पण एवढ्या अल्प आयुष्यात त्यांनी जे प्रचंड कार्य केले ते सामान्य व्यक्तीला दोन जन्म घेतले तरी करणे कठीण आहे. वेदांचा आणि भारतीय संस्कृतीचा परिचय त्यांनी जगाला तर करून दिलाच पण भारतीयांनाही तो सोप्या भाषेत नव्याने करून दिला. त्यांचे तेजस्वी विचार ऐकून शिकागो येथील धर्मपरिषदेत सर्वच पाश्चात्य धर्मप्रसारक अक्षरशः स्तिमित झाले. त्यांनी जेव्हा सांगितले की सर्व धर्मांचे सार एकच आहे. कोणताही धर्म श्रेष्ठ नाही. असे सहज, सोपे आणि सुंदर विचार धर्माबद्दल यापूर्वी कोणी व्यक्त केले नव्हते. जो तो आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आहे हेच सांगत होता. म्हणून स्वामीजींचे विचार सगळ्यांनाच आकर्षित करून घेणारे ठरले.**

न्युयॉर्क क्रिटीक या वर्तमानपत्राने म्हटले की, स्वामीजी दैवी वक्तृत्वाचे धनी तर आहेतच, परंतु त्यांचे धीरगंभीर उद्‌गार देखील त्यांच्या काषाय वस्त्रात शोभून दिसणाऱ्या तेजस्वी मुखमंडलाहून काही कमी आकर्षक नाहीत.' ज्या काळात आजच्या इतकी वाहतुकीची साधने नव्हती अशा काळात स्वामी विवेकानंदांनी संपूर्ण भारत भ्रमण केले. जग तर त्यांनी पहिलेच होते. पण भारतातील लोकांची स्थिती नजरेखालून घातली. त्यांनी त्या काळात शिक्षणाबद्दल जे विचार मांडले ते आजही तितकेच उपयुक्त आहेत. त्यांची उपयोगिता काळ बदलला तरी तसूभरही कमी झालेली नाही. परदेशात जाण्याआधी स्वामीजी भारत भ्रमण करीत असताना १८९२ च्या सुमारास बेळगावात श्री हरिपद मिश्र यांच्याकडे उतरले होते. त्यावेळचा एक प्रसंग श्री हरिपद मिश्र यांनी सांगितला आहे. तो त्यांच्याच शब्दात, "एक दिवस बोलण्याच्या भरात स्वामीजींनी ' पिकविक पेपर्स ' या कादंबरीतील दोनतीन पाने पाठ म्हणून दाखवली. मी ती कादंबरी अनेकदा वाचली असल्यामुळे स्वामीजींनी म्हटलेला भाग कुठला आहे हे तेव्हाच माझ्या लक्षात आले. स्वामीजींचे ते पाठांतर ऐकून मला खूपच आश्चर्य वाटले.

संन्यासी असूनही सामाजिक कादंबरीतला भाग यांना कसा पाठ झाला असावा ? त्यांनी ती कादंबरी पूर्वी बहुधा अनेकदा वाचली असावी असे मला वाटले. त्यांनी ते पुस्तक किती वेळा वाचले असे मी त्यांना विचारल्यावर ते म्हणाले, ' दोनदा. एकदा शाळेत असताना आणि पाचसहा महिन्यापूर्वी आणखी एकदा. ' त्यांचे उत्तर ऐकून तर माझ्या आश्चर्याला सीमाच राहिली नाही ! मी विचारले, ' मग ते तुमच्या लक्षात कसे राहिले ? आमच्या का नाही राहत ?' त्यावर स्वामीजींनी उत्तर दिले, ' कोणतीही गोष्ट एकाग्र मनाने वाचावयास हवी. कोणत्याही अभ्यासात एकाग्रता ही हवीच. अशा रीतीने एकाग्रतेचे महत्व स्वामी विवेकानंदांनी सांगितले आहे. एकाग्रता ही ज्ञानभांडार उघडू शकणारी एकमेव गुरुकिल्ली आहे असे त्यांचे म्हणणे होते. एकाग्रतेच्या जोरावर जगातील सगळे महत्वाचे शोध लागले आहेत. म्हणून मुलांना लहानपणापासून मन एकाग्र कसे करावे याचे शिक्षण देणे आवश्यक आहे. आपल्या शरीराच्या सध्याच्या अवस्थेत आपले मन इतस्ततः विखुरलेले असते आणि ते आपल्या शक्ती शेकडो व्यर्थ गोष्टीत खर्च करीत असते. आपले सारे विचार स्थिर करून ज्ञानप्राप्तीसाठी एखाद्या गोष्टीवर मन एकाग्र करण्याचा प्रयत्न जेव्हा आपण करतो, तेव्हा शेकडो विचार, भावना अगदी आपल्या मनाविरुद्ध आपल्याला विचलित करून टाकतात. या सर्व प्रकाराला आळा घालून मन कसे ताब्यात आणावे याचे विवेचन त्यांनी राजयोगात केले आहे. त्यासाठी ध्यानाची सवय लावून घेण्याची आवश्यकता आहे. ध्यानाच्या अभ्यासाने मनाची एकाग्रता साध्य होते. एकाग्रता आणि स्मरणशक्तीत वाढ होण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी विद्यार्थीदशेत ब्रह्मचर्य पालनाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. स्वामीजी म्हणतात, ' शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण. ज्ञान माणसात अंतर्निहित असते. कोणतेच ज्ञान बाहेरून येत नाही.' ज्ञानाचा प्रकाश पडला की बुद्धीवर असलेले अज्ञानाचे आवरण दूर होते. जेव्हा हे अज्ञानाचे पटल सावकाश दूर होते तेव्हा आपण म्हणतो की आपण शिकत आहोत.ज्या मनुष्याच्या बाबतीत हा पडदा थोडा जास्त दूर होतो तो अधिक ज्ञानी, ज्याच्यावर हे पटल दाट तो अज्ञानी आणि ज्याच्या बाबतीत हे पटल पूर्णपणे दूर झालेले असते तो पूर्ण ज्ञानी, सर्वज्ञ. मुलाला शिक्षण कसे द्यावे हे स्पष्ट करताना स्वामी एका वृक्षाचे उदाहरण देतात. जेव्हा आपण रोप लावतो तेव्हा जमीन किंचित विसविशीत करतो. कुंपण घालतो. त्या वाढणाऱ्या रोपाला फक्त पाणी, माती, हवा इ. गोष्टी देतो. तिथेच आपले काम संपते. रोपाला लागणाऱ्या साऱ्या गोष्टी ते आपोआप घेते. त्या आत्मसात करून आपापल्या प्रकृतीनुसार ते वाढते. हीच गोष्ट मुलाच्या बाबतीतही लागू होते. मूल स्वतःच शिकते. आपण शिकवीत आहोत ह्या कल्पनेने शिक्षक सारे काही बिघडवून टाकतो. ज्ञान सारे आतच वसत असते.



त्याला जागे करण्याचीच काय ती आवश्यकता ! आणि शिक्षकाचे काम ते एवढेच. स्वतःचे हात, पाय, डोळे इ चा योग्य उपयोग करण्यासाठी बुद्धी चालविण्याचे शिक्षण देणे एवढेच काय ते मुलांच्या संबंधात आपल्याला करावयाचे असते.

आज पालकांमध्ये आपल्या मुलाला सगळ्या गोष्टी याव्यात, तो प्रत्येक क्षेत्रात यशस्वी व्हावा म्हणून स्पर्धा लागली आहे. आपल्या मुलाने परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळवावे अशी पालकांची अपेक्षा असते. पण यातून मुलांच्या नैसर्गिक वाढीवर आपण अन्यायच करीत असतो. स्वामीजी या बाबतीत म्हणतात, ' गाढवाचा घोडा होईल अशा अपेक्षेने गाढवाला बेदम मारणाऱ्या माणसाच्या पद्धतीप्रमाणे असणाऱ्या आपल्या शिक्षण पद्धतीला आपण एकदम रजा दिली पाहिजे. आईबापांच्या सतत अवास्तव अधिकार गाजवण्यामुळे मुलांच्या स्वतंत्र वाढीला वाव मिळत नाही. आपणा प्रत्येकात, ज्यांना तुष्टीसाठी वाव हवा असतो अशा अनंत प्रवृत्ती असतात. जबरदस्तीने सुधारणेचा केलेला हा प्रयत्न सुधारणेतच अडथळा आणतो. सिंह होण्याच्या एखाद्याच्या मार्गात आपण जर धोंड आणली तर तो कोल्हा मात्र होईल. स्वातंत्र्य ही विकासाची पहिली अट आहे.

आज विद्यार्थ्यांवर विविध विषयांचा आणि त्यातील माहितीचा भडीमार होतो आहे. त्याचीच परीक्षा घेतली जात आहे. यातच विद्यार्थ्यांची सारी शक्ती खर्च होते. स्वामीजी म्हणतात, ' शिक्षण म्हणजे जन्मात कधी पचनी न पडणारे, डोक्यात निरंतर धुडगूस घालणारे आणि आपल्या मेंदूत ठासून भरलेले माहितीचे भेंडोळे नव्हे. आपल्याला आवश्यकता आहे जीवन सुसंघटित करणाऱ्या, माणूस घडविणाऱ्या, शील बनविणाऱ्या विचारांची. तुम्ही असे फक्त पाचच विचार जर अगदी आत्मसात केले असतील, ते जर आपल्या जीवनात, चारित्र्यात उतरविले असतील तर सारा ग्रंथसंग्रह रटून, कोळून पिऊन टाकणाऱ्या माणसापेक्षा तुम्ही खासच सुशिक्षित आहात. शिक्षणाचा अर्थ नुसता माहितीचा संग्रह असाच जर असता तर मग ग्रंथसंग्रहालये जगातील सर्वात मोठे साधू व ज्ञानकोश सर्वात मोठे ऋषी ठरले असते. जे शिक्षण सामान्य समाजाला उपयोगी पडू शकत नाही, जे शिक्षण भूतदयाभाव चेतवू शकत नाही, जे शिक्षण सिंहपराक्रम उद्दीप्त करू शकत नाही ते शिक्षण काय शिक्षण या संज्ञेला पात्र आहे ?' स्वामीजी म्हणतात,' दिवसभरातून एकदा तरी स्वतःशी संवाद साधा. तसे केले नाहीतर जगातील एका चांगल्या व्यक्तीला भेटण्याची संधी तुम्ही गमवाल. तुमच्या विचारांप्रमाणे तुम्ही घडता. तुम्ही जर स्वतःला दुर्बल समजाल तर दुर्बल बनाल. आणि सामर्थ्यवान समजाल तर सामर्थ्यवान बनाल. आपला स्वतःबद्दलचा विश्वास ही सगळ्यात मोठी गोष्ट आहे. आत्मविश्वास गमावाल तर सारे काही गमावले म्हणून समजा. '

आज लोकांमध्ये जातींवरून, धर्मावरून भांडणे होत आहेत. लोक शिक्षित झाले आहेत पण त्यांना सुशिक्षित म्हणता येईल का हा मोठा प्रश्न पडलेला आहे. माणूस हा इथूनतिथून एकच आहे हे मुलांच्या मनावर बिम्बवण्यात स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे झाली तरी आपली शिक्षणपद्धती अयशस्वी ठरली आहे. क्षुल्लक कारणावरून लोक एकमेकांच्या जीवावर उठले आहेत.

म्हणूनच स्वामी विवेकानंद म्हणतात की आपल्याला माणूस घडविणारे शिक्षण हवे आहे. साऱ्या शिक्षणाचे ध्येय माणूस निर्माण करणे हेच असले पाहिजे. माणूस घडविणारा धर्म आपल्याला हवा आहे. माणूस निर्माण करणारे सिद्धांत आपल्याला हवे आहेत. सर्व तऱ्हांनी माणूस निर्माण करणारे शिक्षण आपल्याला हवे आहे. ' मध्यंतरी WHATSAPP वर एक किस्सा वाचण्यात आला. एक नातू आपल्या आजोबांना विचारतो, " आजोबा, ज्या क्षेत्रात स्पर्धा नाही असे एखादे क्षेत्र आहे का हो करिअर करायला ? " यावर आजोबांनी दिलेले उत्तर फार सुंदर आहे. ते म्हणतात, " बाळा, माणूस होण्याचा प्रयत्न कर. त्या क्षेत्रात अजिबात स्पर्धा नाही." आजच्या काळात तरुणांनी स्वामीजींचे चरित्र व विचार अभ्यासण्याची गरज आहे. स्वामीजींचे चरित्र म्हणजे अखंड स्फूर्तीचा झरा आहे. प्रेरणास्रोत आहे. एकदा एका शिष्याने स्वामींना विचारले की, तुमच्यानंतर दुसरा विवेकानंद होईल का ? त्यावर स्वामींनी त्याला फार सुंदर उत्तर दिले. ते म्हणाले, तुमच्यापैकी प्रत्येकजण ठरवले तर विवेकानंद होऊ शकतो. आवश्यकता आहे ती त्यासाठी मनाची एकाग्रता करण्याची, ज्ञानसाधना करण्याची. मानवतेची सेवा करण्याची इच्छा हवी. आपल्या कामावर श्रद्धा हवी. मनगटात सामर्थ्य हवे. ते तरुणांना उपदेश करताना म्हणतात, ' माझ्या तरुण मित्रांनो, शक्तिशाली व्हा हाच माझा तुम्हाला संदेश आहे. गीतेच्या अध्यायानापेक्षा फुटबॉल खेळून तुम्ही स्वर्गाच्या अधिक जवळ जाऊ शकाल. शरीरात अधिक शक्ती संचारेल तर कृष्णाच्या प्रचंड प्रतिभेचे आणि शक्तीचे आकलन केव्हाही अधिक चांगले होऊ शकेल. शरीर सबळ आणि दृढ होऊन आपण मनुष्य आहोत असे जेव्हा तुम्हाला वाटू लागेल तेव्हाच तुम्हाला उपनिषदांचा अर्थ नि आत्म्याचा महिमा चांगल्या तऱ्हेने कळू लागेल.'

# एकात्मिक बाल विकास प्रकल्प सेवा योजनेअंतर्गत आयोजित मेळाव्यास जि.प.सी. ई. ओ.यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** राज्य शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत बाजार सावंगी (ताः खुलताबाद) परिसरातील अनेक गावांच्या 25 अंगणवाडी आशा कार्यकर्त्यांनी बालकांचा सर्वांगीण विकास संगोपनाचे ज्ञान कौशल्य वाढीसह सर्व कर्ष असा आरंभ नावाचा प्रकल्प महाराष्ट्र शासन व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने येथील जिल्हा परिषद हायस्कूल च्या भव्य प्रांगणात स्टार सजवून मंगळवार (ताः१०) आयोजित केला होता शून्य ते सहा वर्ष वयोगटातील बालकांचा खेळ संवाद स्पर्श घरगुती खेळणे या माध्यमातून शारीरिक मानसिक भावनात्मक व बौद्धिक विकासाबाबत मेंदू सशक्त होण्यास पालकांना संदेश देण्यासाठी ह्या पालक मेळाव्याचे आयोजन केले होते.

यावेळी विकासात्मक बाबींचे खेळ खेळणी साहित्य घरगुती स्वरूपाचे त्यांची एकत्रित मांडणीतून व प्रात्यक्षकातून दाखवण्यात आले आरोग्य विषयक संदेश देण्यात आला आशा व अंगणवाडी कार्यकर्त्या यांनी सुरेख स्टाईल उभारून सर्वांशी संवाद साधला व प्रबोधन केले. याप्रसंगी दिल्ली व महाराष्ट्र राज्याच्या सीनियर युनिसेफ कन्सल्ट डॉक्टर स्विमींग इराणी राजलक्ष्मी नायर शर्मिला मुखर्जी राजमाता जिजाऊ मिशनचे डॉक्टर गोपाळ पंडगे प्रोग्राम ऑफिसर करण पळसकर डॉक्टर ज्योती विभागीय प्रोग्राम अधिकारी ऐश्वर्या कोण कर औरंगाबाद जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले तालुका गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर बाल विकास प्रकल्प अधिकारी सविता बी व कटू डॉक्टर प्रणाली कोठेकर वर्धा पर्यवेक्षिका शोभा शिंदे यांच्यासह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून एका प्रतिनिधीची उपस्थिती होती.

प्रदर्शनी मेळावा पाहून मान्यवरांनी गौरव उद्गार काढले व आजचा कार्यक्रम राज्यात गौरवास्पद आहे. याप्रसंगी सरपंच आप्पाराव नलावडे उपसरपंच कारभारी नलावडे ग्राम विकास अधिकारी ए बी बनसोड प्रशालेचे मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका विमल दिवेकर माजी सरपंच वसंतराव नलावडे सदस्य पोपट काटकर कल्याण काटकर अरुण गायकवाड कृष्णा नलावडे प्रकाश नलावडे आदींनी मान्यवरांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे आयोजन पर्यवेक्षिका शोभा शिंदे यांनी करून सूत्रसंचालन शिक्षक ज्ञानेश्वर सुरडकर यांनी केले.

कन्हैया लाल जयस्वाल व प्रशालेचे सर्व शिक्षक आशा व अंगणवाडी कार्यकर्त्या महिला यांनी परिश्रम घेत मेळावा यशस्वी केला.

# विद्यार्थिनींनी सक्षम बनावे : मनीषा लटपटे



आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित, स्वा सावरकर माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय बीड विज्ञान कला व्यवसाय अभ्यास क्रम विभागा मध्ये भारतीय स्वातंत्र्याचा अमृत काल मराठवाडा मुक्ती लढा अमृत महोत्सवी वर्ष व योगी अरविंदो घोष सार्धशती वर्षानिमित्त अभ्यासपुरक विभाग वतीने आयोजित किशोरवयीन विद्यार्थिनीचे समुपदेशन याप्रसंगी डॉ. सिमा जोशी यानी वैद्यकीय मुलीचे प्रश्ना संबंधी मार्गदर्शन केले तसेच मनिषा लटपटे यानी सायबर गुन्हेगारी संबंधी माहिती दिली विविध कायदे याची माहिती दिली. स्वयंसिध्द होवुन समाजात जीवन जगावे विद्यार्थिनीनी सक्षम बनावे अन्यायास विरोध करावा यावेळी कार्यक्रम अध्यक्ष प्राचार्य विजेंद्र चौधरी, प्रमुख मार्दर्शक डॉ सिमा जोशी, पीएस आय मनिषा लटपटे, जयश्रीताई नेलवाडकर, अनिता तादंळे, प्रा. बाळासाहेब साळवे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. मनिषा कुलकर्णी यानी केले प्रास्ताविक प्रा निशा जेवुरकर व आभार प्रा. अनिता ताई तादंळे यानी मांनले विद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या यासाठी सर्व प्राध्यापक यांनी सहकार्य केले.

# योगी अरविंद घोष यांच्या जीवनचरित्रावर व्याख्यान व प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित , स्वा सावरकर माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय बीड विज्ञान कला व्यवसाय अभ्यास क्रम विभागामध्ये भारतीय स्वातंत्र्याचा अमृत काल मराठवाडा मुक्ती लढा अमृत महोत्सवी वर्ष व योगी अरविंदो घोष सार्धशती वर्षानिमित्त अभ्यासपुरक विभाग वतीने आयोजित व्याख्यान व प्रश्नमंजुषा विषय योगी अरविंद घोष यांचे चरीत्र प्रा. शशिकांत पसारकर यानी सांगीतले की योगी अरविंद यांचे शैक्षणिक विचार यात मानवता वादी दृष्टीकोन आजच्या शिक्षणात उपयुक्त आहे. याप्रसंगी अध्यक्ष प्राचार्य विजेंद्र चौधरी, प्रमुख व्याख्याते प्रा. शशिकांत पसारकर प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. बाळासाहेब साळवे सुत्रसंचलन तर प्रा. अंजली देशमुख यानी केले. आभार प्रा. मोहन मंकले ययानी मांनले विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. योगी अरविंद घोष चरित्रावरील प्रश्न मंजुषा स्पर्धेत सहभाग नोंदवला. यासाठी सर्व प्राध्यापक यांनी सहकार्य केले.

# धातुमिश्रित मांजाचा वापर टाळावा, वीजतारांपासून दूर राहा; महावितरण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** तीळ-गुळाच्या गोडव्यासह निळ्या आकाशी उंच भरारी घेणारे पतंग मकरसंक्रांतीचा आनंद द्विगुणित करतात. बालकांसह ज्येष्ठ मंडळीही पतंग उडविण्याची मौज लुटतात. परंतु पतंग उडवताना पतंग, पतंगाचा मांजा विद्युत खांब, रोहित्रे, विद्युत वाहिन्यांच्या संपर्कात आल्याने अपघाताच्या घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे पतंग उडवताना विद्युत यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखावे, असे आवाहन महावितरणच्या औरंगाबाद परिमंडल कार्यालयाने केले आहे.




शहरी व ग्रामीण भागात विद्युत वितरणासाठी आवश्यक पायाभूत सुविधांचे जाळे पसरलेले आहे. मात्र पतंग उडवताना या यंत्रणेपासून दूर राहावे. पतंगप्रेमींनी मोकळ्या मैदानात पतंग उडवावा. विद्युत वाहिन्या, खांबावर अडकलेली पतंग वा मांजा काढण्याचा प्रयत्न टाळावा. कारण विद्युत वाहिन्यांचे एकमेकावर घर्षणाने शॉर्टसर्किट होऊन जीवित वा वित्तहानीची शक्यता असते. घराच्या गच्चीवरून, रोहित्रांवर चढून विद्युत तारांमध्ये अडकलेला पतंग काढण्याचा प्रयत्न टाळावा. विद्युत वाहिन्यांत अडकलेले पतंग काढण्यासाठी दगडाला दोरा बांधून वाहिन्यांवर फेकणे चुकीचे आहे. धातुमिश्रीत मांजाचा वापर टाळावा. कारण धातुमिश्रीत मांजा विद्युत यंत्रणेच्या संपर्कात आल्यास त्यात विद्युत प्रवाहीत होऊन विजेचा धक्का लागण्याचा धोका असतो.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये महावितरणच्या संबंधित शाखा कार्यालयाशी संपर्क साधावा; जेणेकरून तात्काळ वीजपुरवठा खंडित करून तातडीची मदत करणे सोईचे होईल. महावितरणच्या ग्राहक सुविधा केंद्राच्या १९१२ किंवा १८००-२३३-३४३५ किंवा १८००-२१२-३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.



# बालमटाकळीच्या बालंबिका मंदिराचा 'क' वर्गात समावेश करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** तालुक्याच्या पूर्व भागातील बालमटाकळीचे ग्रामदैवत व परिसराचे आराध्य दैवत असलेल्या श्री बालंबिका देवी देवस्थानचा " क " वर्गात समावेश करावा अशी मागणी अहमदनगर दक्षिणचे भाजपाचे खासदार सुजय विखे पाटील देवी दर्शनासाठी आले असता त्यांना उपसरपंच तुषार वैद्य व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे, ज्ञानेश्वर कारखान्याचे माजी संचालक चंद्रकांत पाटील गरड आदीनी केली आहे. जानेवारी महिन्यातील पौष पौर्णिमेला देवीची तीन दिवस मोठी यात्रा भरवून दोन दिवस जंगी कुस्त्याचा हगमा भरविला जातो, महाराष्ट्रातील नामांकित पहिलवान या दोन दिवसीय कुस्ती हगाम्यात आवर्जून हजेरी लावतात , दोन दिवस कुस्ती हगाम्यामुळे नगर जिल्ह्यात ही यात्रा प्रसिद्ध आहे , देवी मंदिराचे माजी खासदार दिवंगत दिलीप जी गांधी यांच्या स्थानिक विकास निधीतून मंदिराला भव्य असे सभागृह तर उद्योगपती माणिकचंद धाडीवाल यांनी देखील मंदिराचे भव्य दिव्य असे काम करून दिले आहे.

बालंबिका देवी देवस्थान हे माहूरच्या रेणुकेचे साक्षात रूप असून या देवस्थानचा विकास व्हावा यासाठी शासनाने मंदिराचा " क " वर्गात समावेश करावा ,शासनाच्या मिळणाऱ्या निधीमुळे देवस्थानच्या परिसरात सोयी सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच भक्तांसाठी भक्त निवास होऊन सोय होऊन येथे शौचालय, पाणी, स्वच्छता यासारख्या सुविधा उपलब्ध होतील. देवस्थानला क वर्गाचा दर्जा मिळाल्याने देवस्थानांवरून गावाची ओळख निर्माण होत असते , यात्रा, जत्रा, उत्सवाच्या काळात गावाला त्यामुळे महसूल मिळण्यास मदत होते. परिणामी, गावाचे नाव जिल्हा, राज्यात पोहोचते. देवस्थानला येणाऱ्या भक्तांची गैरसोय होत असल्याचे वारंवार दिसून येत आहे. त्या ठिकाणी सोयीसुविधा असाव्यात अशा माफक अपेक्षा भक्तांच्या असतात. नवरात्रोत्सव व यात्रोत्सव काळात भक्तांना देवस्थान मध्ये गैरसोयीला सामोरे जावे लागते. त्यासाठी श्री बालांबिका देवी देवस्थानचा क वर्गात समावेश करावा अशा प्रकारची मागणी केली जात आहे.



# वैजापूर ते सिंदखेडराजा 'जिजाऊ रथ यात्रा' रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्ह्यातील वैजापूर-येथे ११ जानेवारी-२०२३, रोजी-राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त सिंदखेडराजा येथील जिजाऊ जन्म दिवस उत्साहात सहभागी होण्यासाठी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी या दिनाच्या एक दिवस पूर्वला, दि. ११जानेवारी,२०२३रोजी वैजापूर येथून "जिजाऊ रथ" सिंदखेडराजा येथे सकाळी सात वाजता रवाना झाला. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून निघालेल्या या रथाला सामाजिक कार्यकर्ते व स्वच्छतादूत धोंडीरामसिंह राजपूत यांनी ध्वज दाखविला,मराठा महासंघ शाखा वैजापूरच्या वतीने मोती भाऊ वाघ गेल्या आठ वर्षांपासून "जिजाऊ रथ"सिंदखेडराजा येथे नेतात व उत्सवात सहभागी होतात, राजपूत यांनी जिजाऊ यांच्या प्रतिमेला अभिवादन करीत या रथ यात्रेला शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी रथयात्रा प्रमुख मराठा सेवा संघाचे मोती भाऊ वाघ,राहुल मापारी व बाबासाहेब साळुंके हे सारथी ,दीपाली खैरनार, ऋतुजा चांगदेव खैरनार, शिवभक्त फकिरा गलांडे, अक्षय नजन यांच्यासह शिवभक्त उपस्थित होते.




# केळी पिकाच्या उत्पादन वाढीसाठी करपा रोगाचे नियंत्रण आवश्यक : कृषी अधिकारी एस.जी. वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील येथील प्रगतशील शेतकरी या.सभापती धरमसिंग चव्हाण यांच्या शेतात सोयगाव येथील तालुका कृषी अधिकारी एस.जी. वाघ यांनी केळी पिक पाहणी करता भेट दिली असता केळी पिकावर येणाऱ्या करपा या रोगाबद्दल चिंता व्यक्त करून या रोगाबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. केळी पिकावर करपा रोग येणे याचे लक्षणे म्हणजे खालील पानांवर सुरवातीला लक्षणे दिसतात. पानांवर लहान पिवळसर लंबगोलाकार ठिपके कालांतराने ते मोठे होऊन आतील भाग तपकिरी काळपट रंगाचा होतो. ठिपक्याभोवती पिवळ्या रंगाचे वण दिसतात.झाडावर पानांची संख्या कमी होते. त्यामुळे घडांचे पोषण व्यवस्थित होऊ शकत नाही. परिणामी घडावरील फळे आकाराने लहान राहतात.



फळातील गर अकाली पिकतो.
रोगास अनुकूल बाबी रोगग्रस्त बागेतील कंदांचा वापर. शिफारशीत बेणेप्रक्रियेचा अभाव. पीक फेरपालटीचा अभाव. शिफारशीपेक्षा कमी अंतरावर लागवड. पावसाच्या पाण्याचा अयोग्य निचरा. बागेमध्ये व सभोवताली सर्वसाधारण स्वच्छतेचा अभाव.कार्यक्षम नियंत्रण हा रोग एकात्मिक रोग नियंत्रण तंत्राच्या अवलंबनाने नियंत्रित होऊ शकतो. मशागतीत योग्य फेरपालट, रोगग्रस्त पानाचा नाश व योग्य बुरशीनाशकाचा वापर केल्याने रोगाचै व्यवस्थापन करता येऊ शकते.
मशागत केळीची लागवड ओढे, नदीनाले यांच्या काठावरील शेतात आणि चिबड जमिनीत करु नये.केळीची लागवड शक्यतो मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जुन महिन्याच्या पहिल्या आठवड्यात करावी अशे प्रतिपादन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी एस जी वाघ, कृषी सहाय्यक कर्मचारी मानसिंग भोळे, कृषी सहाय्यक अर्जुन सुरडकर, कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख यांनी उपस्थित शेतकऱ्यांना व गावातील ग्रामस्थांना केले.

# भव्य राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्री महारुद्र हनुमान मंदिर व वारकरी शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 22 जानेवारी रोजी सकाळी 8 वाजता एन 2 प्रकाशनगर येथिल महारुद्र हनुमान मंदिरात भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धा ही दोन वयोगटात आहे. छोटा गट 8 ते 15 वर्षे आणि मोठा गट 16 ते 60 वर्षे आहे.

प्रत्येक स्पर्धकांना वयक्तिक भजन सादर करावे लागेल, भजन हिंदी आणि मराठीत असावे, स्पर्धेचा निकाल लगेच लागेल, परीक्षकांचा निकाल अंतिम राहील, स्पर्धेचे शुल्क 200/- आहे. प्रथम बक्षीस 2999/-, द्वितीय 1555/-, तृतीय 1111/- आणि उत्तेजनार्थ 12 बक्षिसे आहेत. स्पर्धेत भाग घेण्यासाठी गोपाळ देशमुख मो. 9370649547, बाळासाहेब देशमुख मो. 9850725305, कोरडे महाराज मो. 9421695215, शिवाजी चिंताके मो. 7757908457 यांच्याशी संपर्क साधावा.

# डॉ. रमेश रोहीवाल ईएनटी सर्जन्सच्या राज्य फेडरेशनचे अध्यक्ष, औरंगाबादच्या वाट्याला मानाचे पद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वरिष्ठ नाक, कान, तज्ज्ञ आणि शल्यचिकित्सक डॉ. रमेश रोहीवाल यांची कान, नाक, घसा शल्यचिकित्सकांच्या महाराष्ट्र राज्य फेडरेशनच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. एफएमएसबी अर्थात फेडरेशन ऑफ महाराष्ट्र ब्रँचेस ऑफ ईएनटी सर्जन्स ही राज्यातील नाक, कान, घसा शल्यचिकित्सकांच्या विविध संघटनांची शिखर संघटना आहे. अशी माहिती औरंगाबाद संघटनेचे सचिव डॉ . रितेश भाग्यवंत आणि अध्यक्ष डॉ. श्रीकांत सावजी यांनी पत्रकार परिषदेत दिली.
डॉ.रमेश रोहीवाल राज्यातील वरिष्ठ नाक, कान, घसा शल्यचिकित्सक आहेत. जानेवारी १९८५ मध्ये त्यांनी औरंगाबाला कान, नाक, घसा तज्ज्ञ म्हणुन कार्य सुरु केले. मराठवाड्यातील पहिल्या पिढीचे इएनटी तज्ज्ञ म्हणून ते ओळखले जातात. डॉक्टरांनी केवळ व्यवसायवाढीकडेच लक्ष न देता ज्ञानाचे आदान प्रदान आणि नवीन डॉक्टर घडवण्यात पुढाकार घेतला पाहिजे यासाठी डॉ. रोहीवाल कायम आग्रही असतात. त्यासाठी ईएनटी क्षेत्रातील ज्ञान जास्तीत जास्त डॉक्टरांपर्यंत तसेच याक्षेत्रात येणाऱ्या वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यापर्यंत पोहचवण्याचा त्यांनी परिषदा आणि कार्यशाळांच्या माध्यमांतून सतत प्रयत्न केला. विशेषतः मराठवाड्यातील डॉक्टर आणि विद्यार्थ्यांसाठी त्यांचे हे प्रयत्न अतिशय मोलाचे ठरले.
कान, नाक, घसा तज्ज्ञांची परिषद मराठवाड्यात २५ वर्षात या ना त्या कारणाने होऊ शकली नव्हती. १९८६ मध्ये मराठवाड्यात नांदेड येथे पहिली कान, नाक, घसा तज्ज्ञांची भरवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. १९९२ मध्ये औरंगाबादमध्ये आयोजित कान, नाक, घसा तज्ज्ञांच्या चोविसाव्या परिषदेच्या संयोजन समितीचे ते सचिव होते. २००९ औरंगाबाद संघटनेची स्थापना त्यांनी केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेने अनेक महत्वाच्या कार्यशाळा आणि परिषदा औरंगाबादमध्ये घेतल्या आहेत. राज्यातील कान, नाक, घसा तज्ज्ञांची संकलीत माहिती उपलब्ध नव्हती. त्यामुळे परिषदा भरवताना अनेक अडचणी येत. २००४ मध्ये राज्यातील कान, नाक, घसा तज्ज्ञांचा संकलीत डाटा तयार करुन महाबळेश्वर येथे राज्यस्तरीय परिषदेत सर्वांना उपलब्ध डॉ. रमेश रोहीवाल यांनी करून दिले. सातत्याने औरंगाबाद आणि मराठवाड्यातील कान, नाक, घसा तज्ज्ञांना एकत्रित करून कानाच्या विविध आजारांसाठी गरीब रुग्णांसाठी मोफत शस्त्रक्रिया शिबीरे आयोजित करुन अनेकांना लाभ दिला. केंद्र सरकारने मूक बधिर रुग्णांसाठी वरदान असणाऱ्या कॉक्लीयर इम्प्लांट सर्जरीसाठी औरंगाबादेत केंद्र सुरु केले. मराठवाड्यातील हे पहिले केंद्र असून डॉ. रोहीवाल



यांनी या योजनेअंतर्गत आत्तापर्यंत २५ शस्त्रक्रिया गरजू रुग्णांवर केल्या आहेत. इंडियन मेडीकल असोसिएशनच्या औरंगाबाद शाखेचे ते २०१६-१७ मध्ये अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात औरंगाबाद शाखेला सर्वोत्कृष्ट शाखेचा बहुमान मिळाला आणि डॉ. रोहीवाल यांनाही त्यांच्या कार्यासाठी राष्ट्रीयस्तरावर सन्मानित करण्यात आले होते.
डॉ .रोहिवाल यांनी यावेळी ध्वनी प्रदूषण , लहान बाळातील कर्णबधिरता, बहिरेपणा दूर करण्यासाठीचे आधुनिक उवचार, हेडफोनचे दुष्परिणाम यावर सविस्तर मार्गदर्शन करत या संदर्भात करण्यात येणाऱ्या जमजागृती कार्यक्रमाची माहिती दिली.




# महाटी येथील मातंग समाजावर प्राणघातक हल्ला; आरोपींवर कारवाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुदखेड :** मौजे महाटी तालुका मुदखेड येथील मातंग समाजातील महिला व पुरुषांना शेतीच्या वादातून कुऱ्हाड, तलवारीने, लाठ्या-काठ्याने सात ते आठ जणांनी जीवघेणा हल्ला करून गंभीर जखमी केले. तुला खत्म करतो, असे म्हणून हल्ला चढवला. सदर घटना ही लोकस्वराज्य आंदोलनाचे प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे यांनी कळल्यावर त्यांनी मुदखेड पोलीस स्टेशनला कळविली. लोकस्वराज्य आंदोलनाचे नांदेड जिल्हाध्यक्ष अंकुशदादा गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष शिवराज केदारे बारडकर, पी.जी. केदारे, तालुकाध्यक्ष व कार्यकर्त्यांनी डीवायएसपी अशफत मॅडम भोकर व मनोज शर्मा पीआय मुदखेड यांना भेटून आरोपींविरूध कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच अनु जनजाती प्रतिबंधक कायदान्वये गुन्हा दाखल करून लवकरात लवकर अटक करण्याची मागणी केली.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# ग्रामसेवक प्रदीप पाटील यांचे घाणीकडे दुर्लक्ष

## गोकुळसिंग राजपूत यांचा ग्राउंड रिपोर्ट




आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नादांतांडा येथील अकार्यक्षम ग्रामसेवक प्रदीप पाटील नांदाताडा येथे महिन्यातून फक्त पंधरा दिवसात एकच चक्कर कशी तरी मारतात व पुन्हा येथील ग्रामस्थांना ग्रामपंचायतचे उंबरठे झिंजावावे लागत आहे.नेहमीच दांडी बहादर ग्रामसेवक प्रदीप पाटील यांना गावांचे वावडे असल्याचे दिसून येत असून मुख्यालयी राहण्याचा शासनाचा आदेश असतांना सुद्धा ते मुख्यालयी थांबत नाही. जाणीवपूर्वक नादांतांडा गावाकडे दुर्लक्ष करत असून गावातील नागरिक त्रस्त झाले आहे.
या बेजबाबदार ग्रामसेवकाला कुणाचा तरी आशीर्वाद असलेल्या ने ते बेजबाबदारपणाने वागत आहे.एकतर राज्यात कोविड-19 चे वारे वाहत असून राज्य सरकारने याची खबरदारी घेत राज्यातील सर्व आरोग्य यंत्रणेला, ग्रामपंचायतीला, एकंदरीत सर्वच विभागाला सतर्कतेचा इशारा दिला आहे. कोविडचे प्रमाण जरी राज्यात कमी असले तरीही नागरिकांनी आपली खबरदारी बाळगून गावात, परिसरात घाणीचे साम्राज्य दिसले नाही पाहिजेत त्यासाठी आपणच आपली स्वच्छता राखावी असे सर्व विभागांना यापूर्वीच निर्देश दिल्याचे अधिकृत सुत्राकडून माहिती मिळालेली आहे. परंतू सोयगाव तालुक्यातील नादांतांडा जि. प. प्रा. शाळेच्या संरक्षण भिंतीला लागूनच व मारोती मंदीराच्या भिंतीला आजूबाजूच्या लोकांनी उकीर्डे टाकलेले असल्याने शाळेत विद्यार्थ्यांना त्याच उकिर्ड्यातून घाण तुडवत येणे जाणे करावे लागत आहे. तसेच त्याच उकीर्ड्यावर रस्त्यामध्येच लहान मुले मुली शौचालयास बसतात त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. पुन्हा नादांतांडा जि. प. प्रा. शाळेच्या संरक्षण भीतीला लागून व मारोती मंदीराच्या जवळ बरेच लोकांनी बेकायदेशीर अतिक्रमण केलेले आहे. याकडे हे महाशय बेजबाबदार ग्रामसेवक प्रदीप पाटील हे मात्र जाणूनबुजून झोपेचे सोंग घेत असून दुर्लक्ष करत आहे. यासंदर्भात नागरिकांनी नादांतांडा ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक प्रदीप पाटील यांना सदरील अतिक्रमण हटवून, भिंतीजवळील साचलेली घाण हटवून विद्यार्थ्यांना शाळेत जाण्या येण्यासाठी रस्ता मोकळा करून दयावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# हेरंब कुलकर्णी, सुषमा पाध्ये यांना 'वसुधा परांजपे स्मृती पुरस्कार' जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी कार्यकारी विश्वस्त आणि





व्यासंगी संपादक स्वर्गीय वसुधा परांजपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'वसुधा परांजपे स्मृती पुरस्कार' हेरंब कुलकर्णी, सुषमा पाध्ये यांना जाहीर झाला आहे. कुलकर्णी यांना समाजसेवेसाठी, तर पाध्ये यांना शिक्षण सेवेसाठी हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. प्रत्येकी ५० हजार रुपये आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. परांजपे कुटुंबीय आणि विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मूलगामी स्वरूपाचे काम करणाऱ्या दोन व्यक्तीना पुरस्कार देण्यात येतात. तसेच या पुरस्कार सोहळ्यात समितीच्या पाच विद्यार्थिनींनाही प्रत्येकी दहा हजार रुपये आर्थिक साहाय्य देण्यात येईल.या पुरस्कारांचे वितरण रविवार, दि. १५ जानेवारी २०२३ रोजी सायंकाळी ५.३० वाजता विद्यार्थी साहाय्यक समितीच्या फर्ग्युसन रस्त्यावरील डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहातील मोडक सभागृहात होणार आहे. साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होईल, अशी माहिती प्रा. प्र. ना. परांजपे यांनी दिली.

# कवाडेंशी युती करताना विश्वासात घेतले नाही?

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष



प्रा. जोगेंद्र कवाडे यांना बाळासाहेबांची शिवसेना पक्षामार्फत महायुतीमध्ये प्रवेश देण्यात आल्यानंतर महायुतीमध्ये सहभागी आठवले गट नाराज झाला आहे. आठवले गटाच्या नेत्यांना विश्वासात घेतले नाही. त्यामुळे रिपाईच्या आठवले गटाचे नेते भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी याबाबत चर्चा करणार आहे.
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट हा भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली २०१२ पासून महायुतीमध्ये घटक पक्ष म्हणून सहभागी आहे.
शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पक्ष महायुतीमध्ये आला. आता शिंदे गटाने रिपाईच्या कवाडे गटाशी युती केल्याने आठवले गट नाराज झाला आहे. शिंदे यांनी कवाडेशी युती करण्यापूर्वी महायुतीतील घटक पक्षांना विश्वासात घ्यायला हवे होते, असे आठवले गटाचे राष्ट्रीय संघटन सचिव भूपेश थुलकर म्हणाले. याबाबत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# मातीसंवर्धन मोहिमेतील युवकांचा ज्येष्ठ नागरिक संघटनेतर्फे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कलकत्त्याचा साहिल झा (वय १७ वर्षे) उत्तर प्रदेशातील मोहित निरंजन (वय २१ वर्षे) हे दोन युवक गेल्या ९ महिन्यां पासून सायकलवरून १३ राज्यांमधून फिरत फिरत मातीचे संवर्धन व संरक्षण करण्याचा संदेश देत आहेत. अशा तळमळीने काम करणाऱ्या साहिल झा व मोहित निरंजन यांचा सत्कार समारंभ सिडको एन-४ मधिल उजळंबकर वाचनालयात ज्येष्ठ नागरिक संघटनेद्वारे पुष्प गुच्छ देवून करण्यात आला. कार्यक्रमात दोन्ही युवकांनी १३ राज्यांमधून आमच्या मोहिमेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे असे सांगितले. आपले अनेक अनुभव देखील त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वास काळे हे होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.सुनीता चंद्रशेखर पाठक यांनी केले.आभार प्रदर्शन प्रेमचंद तुल्ले यांनी केले. सविता कुलकर्णी या कवयित्रीनी आपले नुकतेच प्रकाशित केलेले तीन काव्यसंग्रह सगळ्यांना भेट दिले. त्यांनी वाढदिवस याविषयावर आपले विचार मांडले. त्यानंतर प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी स्वरचित अभंगाचे सादरीकरण केले.कार्यक्रमाच्या शेवटी प्रसिद्ध मिमिक्री कलाकार सुधीर कोर्टीकर यांनी विविध प्राण्यांचे, पक्षांचे, वाद्यांचे, वाहनांचे, हुबेहूब आवाज काढले. तसेच हास्यांचे विविध प्रकार सादर करुन उपस्थितांना मनमुराद हासवले. औरंगाबादचे ज्येष्ठ सायकलपटू जयंत सांगवीकर यांनीही आपले अनुभव सांगितले.या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती.शेवटी सगळ्यांना अल्पोपहार दिला गेला आणि पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




# देशातील आणीबाणी काळातील तुरुंगवास झालेल्यांना सरकारचे मासिक मानधन




आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** देशात आणीबाणी काळात वैजापूरातील आठ व्यक्तींना तुरुंगवास झाला होता.या तुरुंगवास भोगलेल्या आठ व्यक्ती किंवा त्यांच्या वारसांना सरकारने दर महिन्याला मानधन देणे सुरु केले असून हे मानधन मिळवून देण्यासाठी वैजापूरचे माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी कागदपत्रे पूर्तता करत शासन दरबारी वारंवार पाठपुरावा केला होता म्हणून या आठही व्यक्तींना त्यांनी शासनाकडून मानधन सुरू करून दिले असून यासाठी या आठही व्यक्ती नी सोमवार( ता.०९ )रोजी डॉ.दिनेश परदेशी व धोंडीरामसिंह राजपूत यांचा सत्कार केला. तसेच डॉ.दिनेश परदेशी यांनी ही या आठही व्यक्तींचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. याप्रसंगी नारायण लाडवानी, शेख हुसेन, लीलाबाई अनर्थे, सत्यभामाबाई पुणे, सोनुबाई शेलार, रुख्मिनी शिंदे,कमला श्रीवास्तव, यमुनाबाई जाधव यांचा समावेश आहे. या प्रसंगी माजी नगरसेवक दिलीप सिंह राजपूत,भास्कर मतसागर यांची उपस्थिती होती.

# रिक्षाने आले, दुकान फोडून ६ लाख ९० हजार लांबवले; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मोंढा परिसरातील सुका मेवा विक्रेत्याचे दुकान चौघांनी रिक्षाने येत पहाटे ३.२०च्या दरम्यान फोडले व गल्ल्यातील ६लाख ९० हजार रु. लंपास केले.या प्रकरणी जिन्सी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.
शिवनारायण मोतीलाल तोतला(५२) रा.मोंढा असे फिर्यादीचे नाव आहे. त्यांचे मोंढ्यातील इलेट्र्कीक डी.पी.जवळ ड्रायफुट व मसाला विक्री करण्याचे दुकान आहे व त्यांचे घर दुकानाच्या पहिल्या मजल्यावर आहे. घडलेला चोरीचा प्रकार हा सी.सी. टिव्हीमधे कैद झाला आहे. दुकान फोडून रक्कम लंपास करणारे हे रेकार्डवरचे चोरटे नसल्याचा दाट संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. शिवनारायण तोतला हे ९जानेवारी रोजी दुपारी ४वा.गेवराई येथे गेले होते. रात्री १२वा घरी परतले तेंव्हा दुकान व्यवस्थित बंद असल्याचे दिसले.१०जाने रोजी सकाळी १०वा.त्यांचा मुलगा वासू दुकान उघडण्यास खाली असता दुकानाचे शटर उचकटलेले दिसले.त्यानंतर शिवनारायण तोतला यांनी जिन्सी पोलिसांना संपर्क केला. घटनास्थळी सहाय्यक पोलिस आयुक्त, पोलिस निरीक्षक अशोक भंडारे, पीएसआय काकड, अनंता तांगडे यांनी भेट देत पाहणी केली. फिंगरप्रिंट तज्ञ, श्वानपथक घटनास्थळी येऊन गेले. पुढील तपास पोलिस निरीक्षक अशोक भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अनंता तांगडे करंत आहेत.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट



महावीर
घर संसार

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद